**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख,<br>रा.परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर. | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे स्वीय सहायक - श्री. प्रमोद वि.खराबे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - संचालक, शिक्षण व अधिष्ठाता, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०६.१०.२००९ रोजीच्या अर्जान्वये सन २००८-०९ या कालावधीतील त्यांना दिलेल्या

कारणे दाखवा नोटीसच्या संदर्भात कुलगुरुकडे मान्यतेसाठी केलेल्या टिपणीच्या प्रती मागितल्या आहेत. तसेच शिस्त व अपील,१९७९ नियमाबाबत काही नियमांची माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदरची मुद्दा ए व सी ची माहिती गोपनीय असल्याकारणाने नाकारली आहे. तसेच जी मुद्दा बी व डी संदर्भात माहिती महाराष्ट्र शिस्त व अपील नियम १९७९ मध्ये आहे, ते शासनाचे प्रकाशन विक्रीस उपलब्ध असल्यामुळे माहिती पुरविता येणार नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि.०७.१२.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, मुद्दा बी व डी मधील माहिती शासकीय पुस्तकात विक्रीस उपलब्ध असल्याने त्या माहितीतून देता येत नाही व ए व सी ची माहिती गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे तसेच माहिती अधिकार अधिनियम कलम ८(ञ) व (छ) प्रकट करण्यास अपवाद आहे, असे नमूद करुन अपील खारीज केले आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहे. तथापि आयोग जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी सहमत होऊ शकत नाही. अपिलार्थी यांनी मुद्दा ए मध्ये कार्यालयीन टिपणीच्या प्रतींची मागणी केली आहे. ज्यामध्ये त्यांनी कुलगुरुंकडे मंजूरीसाठी प्रस्तावित केलेल्या ताकीदीच्या प्रस्तावावर संबंधित अधिकाऱ्याचे शेरे आहेत.या टिपणीची प्रत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांना देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारण्याकरिता लावलेल्या कलम ८(ञ) व (छ) कलमे या प्रकरणी येथे लागू होऊ शकत नाहीत. कारण की ही माहिती वैयक्तिक स्वरुपाची नाही. त्याचप्रमाणे जीवितास धोका निर्माण होण्याचाही प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच कार्यालयीन कामकाजावर या टिपणीची निर्मिती झाल्यामुळे ही कागदपत्रे पब्लीक डोमेनमध्ये समाविष्ट होतात इतर तीन मद्दे - बी,सी व डी मधून अपिलार्थी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपील),१९७९ मधील काही कलमांच्या माहितीच्या प्रतींची मागणी केली आहे.संबंधित प्रकाशन महाराष्ट्र शासनाचे असून ते शासकीय ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे. ही बाब विचारात घेता अपिलार्थी ती प्राप्त करु शकतात, त्यामुळे ही माहिती देण्याची आवश्यकता नाही. असे जरी असले तरी एक विशेष बाब म्हणून संबंधित महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील संबंधित कलमांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस त्वरित संदर्भासाठी द्याव्या लागतील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित साक्षांकित प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०६-२०११**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख, घर क्र ७८७, प्लॉट ०९,भाग्यलक्ष्मी नगर,शंकराचार्य मंदिरासमोर, परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे स्वीय सहायक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक शिक्षण व अधिष्ठाता, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी,<br>रा.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>भूमी अभिलेख,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>भूमी अभिलेख,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक, भूमी अभिलेख,औरंगाबाद - श्री. चंद्रशेखर ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक,भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद- श्री. व्ही.टी.मुळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेबद्दल मागितलेली माहिती त्यांना नाकारण्यात आली

होती. तथापि जमाबंदी आयुक्त यांच्या सूचनेनुसार त्यांना माहिती मिळालेली आहे. ही बाब विचारात घेता आयोगाचे काहीही भाष्य नाही.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी,घर क्र. ३५६, वॉर्ड क्र.५,समीर एसटीडी जवळ,मोमीनपुरा,परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रोहिदास भोंडवे, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे.
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपनोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),
म.रा.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे - श्री. एम.एस.जावळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय),म.रा.पुणे-१- श्री. ए.आर.देवगुंडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे परिशिष्ट १ मधील अनुच्छेद ५,१९,४३ अन्वये मुद्रांकशुल्क व दंड किती वसूल केला, याबाबतची तसेच महाराष्ट्र राज्यातील रस्त्यावरील टोलनाका करारनाम्यासंदर्भात किती मुद्रांक शुल्क वसूल करण्यात आला, याबाबतची सन १९९९ ते दि. १५.०८.२००९ पर्यंत या विस्तृत कालावधीची माहिती एकूण दोन मुद्यांद्वारे मागितली आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी १५.०९.२००९ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस कळविण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, बरीचशी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसून जिल्हा स्तरावरील मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे व ती सर्व स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरणे असल्यामुळे त्यांच्याकडे उपलब्ध आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १०.११.२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांनी निर्णयामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे अपूर्ण मुद्यासंदर्भातील माहिती देण्यात यावी. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. १२.०१.२०१०, ३१.०५.२०११ रोजी उर्वरित माहिती देण्यात आलेली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.तथापि अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज दि.०९.०१.२०१० रोजीचा आहे. त्यानंतर त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रोहिदास भोंडवे, द्वारा सुप्रिया इलेक्ट्रीकल्स,सुभाषरोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय,पुणे -१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनोंदणी महानिरीक्षक,नोंदणी महानिरीक्षक

कार्यालय,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे (पाथरीकर), : अपीलकर्ता
रा.पाथरी, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,सेलू,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. एम.एल.पिंपळगावकर,लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी - प्रतिनिधी - सौ. जे.एस.वडकुते, कार्यालयीन अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष- श्री. प्रल्हाद रंगनाथ काळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सांगितले की, अपिलार्थी यांच्या दि. ३०.१२.२००९ रोजीच्या क्र.१६५६/०९ या द्वितीय अपिलावर आयोगाने दि. २२.१२.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे व निर्णय पारित केला आहे. या द्वितीय अपिलाचा मूळ अर्ज व आज रोजी विचाराधीन प्रकरणासंदर्भातील मूळ अर्ज एकसारखाच आहे. या द्वितीय अपिलाशी संबंधित माहितीसाठीच्या मूळ अर्जावर आयोगाने यापूर्वी निर्णय पारीत केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब योग्य आढळून येत आहे. यामुळे अपिलार्थी यांचे विचाराधीन दि. ०७.०१.२०१० रोजीचे द्वितीय अपील निष्प्रभ ठरत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक 	०१-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे (पाथरीकर),रा.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,सोनपेठ,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, सोनपेठ,जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. इंगळे जे.डी.लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,परभणी - प्रतिनिधी - श्री.के.व्ही.भोसले, तलाठी,सजा उखळी (बु.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०६.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये १९७२ ते २००५ या मोठया कालावधीमधील मौजे उखळी (बु.),ता.सोनपेठ येथील स.नं.२३२/१ मधील सन १९७२ ते १९७६ , सन १९८० ते १९८५ व सन २००० ते २००५ या कालावधीच्या ७/१२ च्या नकला मागितल्या

आहेत. सदरची माहिती अभिलेखामध्ये शोधून देण्याकरिता त्यांना काही कालावधी लागलेला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी दोन वर्षांचे ७/१२ वगळता उर्वरित ७/१२ च्या प्रती अपिलार्थीस दि.२९.०९.२००९ रोजी विनामूल्य देण्यात आलेल्या आहेत. तदनंतर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. २९.०९.२००९ रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयानंतर उर्वरित दोन वर्षाच्या ७/१२च्या नकला दि. २८.१०.२००९ रोजी घरपोच दूतामार्फत देण्यात आल्या आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन तसेच अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे जन माहिती व अपिलीय अधिकारी अपिलार्थीस माहिती देण्यास प्रयत्नशील होते, असेही दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनकर हरिश्चंद्र सावंत, 'पुष्पक', दत्तनगर,जिंतुर रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सोनपेठ,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरे बालाजी माधवराव,<br>रा.डीग्रस,पो.फरकंडा,ता.पालम,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव,<br>बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी, जि.परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कुरे बालाजी माधवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी सोमेश्वर येथील बळीराजा शिक्षण संस्थेविषयी, सन १९९१ ते मार्च २००९ या कालावधीची ३१ मार्च रोजीची बँकेच्या शिल्लक रकमेविषयीची विवरणपत्रे मागितली आहेत. ते या शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य आहेत. त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. या माहितीअर्जाच्या संदर्भात शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा

परिषद,परभणी हे प्रथम अपिलीय अधिकारी होतात. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद,परभणी यांच्याकडे प्रकरण (प्रथम अपिलाच्या प्रतीसह ) पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जि.प.परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव,रा.डीग्रस,पो.फरकंडा,ता.पालम,जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद,परभणी यांना (प्रथम अपिलाच्या प्रतीसह ) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वि. गो. जोशी, : अपीलकर्ता

व्दारा करंजीकर निवास, भगवान वाघमारेंच्या बाजूस, गणपती चौक, जिंतूर रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. पी. एस. राठोड, सहायक निबंधक (प्रशासन) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद<br>- श्री. व्ही. एस. साहोत्रे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्रमांक एक व दोन मध्ये अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०४-२००९ रोजी दिलेल्या अर्जाची सत्यप्रत तसेच त्यासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी यांनी त्यांनीच सादर केलेल्या अर्जांच्या सत्यप्रती मागितल्या असल्यामुळे त्या सत्यप्रती देणे शक्य नाही अशी जन माहिती अधिकारी यांची भूमिका आहे. तसेच मुद्दा क्रमांक तीन मध्ये जी कार्यवाही अपिलार्थीने अपेक्षित केली आहे ती अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसून अहवाल आलेला नाही त्यामुळे ही माहिती आतापर्यंत अपिलार्थीस पुरविण्यात आलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २६-११-२००९ रोजी सुनावणी घेतली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी स्वतः उपस्थित होते. सुनावणीनंतर सर्व बाबींचा विचार करुन त्यांनी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एक व दोनच्या माहितीच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात याव्यात व मुद्दा क्रमांक तीन बाबत अहवाल प्राप्त झाला असल्यास उपलब्ध करुन द्यावा व अहवाल प्राप्त झाला नसल्यास माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीने केलेल्या अर्जाच्या व जोडलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती ते मागत आहेत त्यामुळे सत्यप्रती ऐवजी त्यांना छायांकीत प्रती देण्यात याव्यात ही जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका आयोगास योग्य वाटते, त्यामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणीत दिलेल्या निर्णया-नंतर कार्यवाही करणे अपेक्षित होते परंतु तसे झालेले आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांना मुद्दा क्रमांक एक व दोनच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस तात्काळ पाठवाव्या लागतील व त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक तीनची सद्यस्थिती अपिलार्थीस अवगत करावी लागेल. त्याचप्रमाणे भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांचा निपटारा अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत होईल यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दक्ष राहावे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वि. गो. जोशी, व्दारा करंजीकर निवास, भगवान वाघमारेंच्या बाजूस, गणपती चौक, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, : अपीलकर्ता
'निशांत', वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थी यांच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, 'निशांत', वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दामोधर शंकरराव घुगे,<br>मु. पो. पांगरी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी - श्री. आर. एफ. शेख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. ए. जी. कौरवार, उप का. अ. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये ०१ फेब्रुवारी २००८ ते २९ फेब्रुवारी २००८ अखेरपर्यंत त्यांच्या उपविभागातील परभणी तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध लघुपाटबंधारे पाझर तलावांवर केलेल्या कामाबाबत

अंदाजपत्रकीय तरतूद, कामावर झालेला खर्च, कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, काम पूर्णत्वाचा दाखला, उपयोगिता प्रमाणपत्र, साप्ताहिक मजूर उपस्थिती अहवाल, जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मजुरीबाबतचे मागणीपत्रक, मजुराच्या हजेरीपत्रकाच्या (हजेरीपट) नाव व पत्ता झेरॉक्स इत्यादीसह विस्तृत माहिती मागितली आहे. त्यांच्या पूर्वी या उपविभागात दोन उप अभियंते कार्यरत होते त्या दोघांनाही ही माहिती एकत्र करणे शक्य झाले नाही त्यामुळे ती माहिती आजपर्यंत अपिलार्थीस देता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०९-०७-२००९ रोजी सुनावणी घेतली व निर्णय दिला आहे की, तीस दिवसाच्या आत नियमाप्रमाणे माहिती देण्यात यावी.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी फार मोठ्या प्रमाणात विस्तृत अशी माहिती मागितली आहे त्यामुळे उपविभागातील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात वळवावे लागणार आहे. अशा प्रकारची विस्तृत माहिती मागणे व्यवहार्य ठरत नाही व माहितीच्या अधिकाराचे उद्दिष्ट सफल होत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अभिलेखे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करुन देणे हे माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत ठरत आहे. तथापि ही बाब जन माहिती अधिकारी यांनी केली नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय देताना ही बाब विचारात घेतली नाही. म्हणून आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस निश्चित करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर शंकरराव घुगे, मु. पो. पांगरी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी,<br>बालाजी पान सेंटर, बसस्टँडसमोर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०३-२००९<br>फेरसादर दिनांक ०७-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जिल्हा परभणी यांच्याकडे दिनांक २०-११-२००८ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी, बालाजी पान सेंटर, बसस्टँडसमोर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. धोंडिबा नागोराव लाडके,<br>नवा मोंढा रोड, इठलापूर मोहल्ला, परभणी | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी (शहर) | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी | : |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी (शहर)<br>- श्री. संदिप डोईफोडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २१.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०७-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी जी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे व माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार देय आहे ती माहिती अपिलार्थीस दिनांक १३-०६-२००९ रोजी देण्यात आली आहे व

अपिलार्थी यांनी त्याची पोच दिलेली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांनी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांनी निर्णय दिला आहे की, सदरचे प्रकरण पोलीस अधिकार कक्षेत बसत नसून सदरची बाब दिवाणी व महसूल खात्याशी निगडीत असल्याने अर्जदार यांनी भूमी अभिलेख कार्यालयाशी संपर्क साधून सदर वादाच्या शेतीची मोजणी करुन घ्यावी अन्यथा संबंधित न्यायालयाशी संपर्क साधून आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटत असल्यास दाद मागावी, असे नमूद करुन सदरचे अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहे. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती देय होत आहे ती जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी (शहर) यांच्याकडून अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धोंडिबा नागोराव लाडके, नवा मोंढा रोड, इठलापूर मोहल्ला, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी (शहर) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती अन्नपूर्णा भगवान सिगेदार, : अपीलकर्ता
व्दारा, श्री.अरुण देवळे,
देवळे जिनिंग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. व्हि. ए. सोळंके (ग्राम विकास अधिकारी) | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०१-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०३-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत ही बाब गंभीर आहे. याची आयोग दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत त्यांना दिलेली नाही. याबाबतची संबंधित संचिका उपलब्ध होत नाही असे कागदपत्रावरुन दिसत आहे. ही बाब आयोगास गंभीर वाटते. संचिकेचा शोध घेऊन अपिलार्थीस माहिती देणे आवश्यक ठरते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान सिगेदार, व्दारा, श्री.अरुण देवळे, देवळे जिनिंग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोपाळराव वसंतराव कुलकर्णी, : अपीलकर्ता
व्दारा मु. अ. जि. प. प्रशाला, भोगाव (देवी),
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, सरस्वती विद्यालय (मा. वि.), धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सरस्वती विद्यालय (मा. वि.), धारुर,<br>तालुका धारुर, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला नाही.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळराव वसंतराव कुलकर्णी, व्दारा मुख्याध्यापक, जि. प. प्रशाला, भोगाव (देवी), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती विद्यालय (मा. वि.), धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुहास प्रभाकरराव धारासूरकर, : अपीलकर्ता
धारासूरकर कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बालाजी मंदिर जवळ, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,<br>जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १७-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | १६-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८-०२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२१-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना ती द्यावी लागेल. जन अपिलीय

अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १६-०२-२००९ रोजी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे माहिती दिली गेली नसल्यास माहिती देण्यासाठी जे कोणी अधिकारी / कर्मचारी जबाबदारी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई योजावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी या प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १६-०२-२००९ रोजी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे माहिती दिली गेली नसल्यास माहिती देण्यासाठी जे कोणी अधिकारी / कर्मचारी जबाबदारी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०६-२०११**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुहास प्रभाकरराव धारासूरकर, धारासूरकर कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बालाजी मंदिर जवळ, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रदिप सोपानराव कोकडवार,<br>मा. नगरसेवक, श्रीनगरेश्वर मंदिराजवळ, जिंतूर,<br>तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, स्नेहनगर, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रदीप सोपानराव कोकडवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी<br>- श्री. जी. एस. खाडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, स्नेहनगर, नांदेड<br>- प्रतिनिधी - श्री.एन.एस. चालिकवार, वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०६-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०९-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०१-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जिंतूर उपविभागाचे उप विभागीय अभियंता श्री. व्ही. जी. पाटील व शाखा अभियंता श्री. सोनार यांची दिनांक ०१ जानेवारी २००८ ते ३१ मे २००८ या कालावधीची कार्यकारी अभियंता, परभणी यांना सादर केलेली कामकाज दैनंदिनीची माहिती मागितली आहे. उप विभागीय अभियंता श्री. व्ही. जी. पाटील व शाखा अभियंता श्री. सोनार यांच्या कार्यालयात ज्या टूर डाय-या उपलब्ध होत्या त्या दिनांक ०३-१०-२००८ रोजी देण्यात आल्या. श्री. व्ही. जी. पाटील यांनी दैनंदिनी सादर केली नाही त्याऐवजी त्यांच्या सरकारी वाहनाचे लॉगबुकची प्रत देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब त्यांच्या युक्तिवादात मान्य केली.

अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जातील मागितलेली मुद्दा क्रमांक २ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये नमूद केलेल्या व्याख्येमध्ये येत नसल्यामुळे त्यांना ती देय होत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) नुसार माहिती देण्यास विलंब झालेला आहे असे दिसून येत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेले माहिती अर्ज भविष्यात विहित मुदतीत निकाली काढण्यास दक्ष राहावे अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप सोपानराव कोकडवार, मा. नगरसेवक, श्रीनगरेश्वर मंदिराजवळ, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, स्नेहनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पंढरीनाथ ग्यानोजी लाडे, : अपीलकर्ता

रा. बुध्दनगर, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लेखापाल, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत,<br>जिल्हा परभणी - श्री. यु. आर. दुधाने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण दोन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक दोनची माहिती अपिलार्थीस दिनांक २६-०५-२००९ रोजी पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे. मुद्दा क्रमांक एकबाबत संबंधित कर्मचारी निलंबीत झाले आहेत व त्यांच्या जागी आलेले दुसरे कर्मचारी सुध्दा निलंबीत झाले आहेत त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ ची माहिती मिळाली आहे व मुद्दा क्रमांक १ ची माहिती देण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत असे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक एकचे अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस निश्चित करुन, अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून, अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ शी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ ग्यानोजी लाडे, रा. बुध्दनगर, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वामन रंगनाथराव मोरे,<br>विवेकनगर,वसमतरोड,परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अतिरिक्त जिल्हाधिकारी,परभणी - श्री. बी.बी.चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२००९ (फेरसादर दि.२६.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड.वामन रंगनाथराव मोरे,बी-१५४, विवेकनगर,वसमतरोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>रा.पूर्णा, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,पूर्णा,जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,परभणी | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. तहसीलदार,पूर्णा यांनी दि. ०१.०६.२०११ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास विनंती केली आहे की, सुनावणीकरिता पुढील तारीख वाढवून देण्यात यावी. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, पूर्णा,ता.पूर्णा,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पूर्णा,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तानंद नारायण बोबडे, : अपीलकर्ता
रा.सोनपेठ,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी,मर्यादित,गंगाखेड,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,सोनपेठ, जि.परभणी - श्री. दाभाडे एस.पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,परभणी - प्रतिनिधी - श्री. के.एस.रंधे, सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०३.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ११.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २७.०१.२००९ (फेरसादर,दि.०२.१२.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०३.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी पहिल्या मुद्यासंदर्भात त्यांच्याकडे रु.१५,०००/- इतकी थकबाकी येणे बाकी असल्यामुळे त्यांचे वीज कनेक्शन सुरु करता आले नाही. त्यामुळे त्यांनी ग्राहक पंचायतीकडे प्रकरण दिल्यामुळे त्यांना कनेक्शन देण्यात आले आहे. या बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मुद्दा क्र २ द्वारे जी माहिती मागितली आहे, त्यासंदर्भात अपिलार्थीच्या माहितीसाठीचा अर्जाच्या तारखेस म्हणजे दि. ०३.०७.२००८ जी परिस्थिती होती, त्यावेळची माहिती अथवा त्या माहितीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पाठवाव्या लागतील.

अत: प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तानंद नारायण बोबडे, विठ्ठल मंदिरजवळ, सोनपेठ, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,सोनपेठ, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीधर माणिकराव गोवर्धन, : अपीलकर्ता
रा.पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, नूतन विद्यालय,सेलू, ता.सेलू, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.) जि.प.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीधर माणिकराव गोवर्धन | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२.०१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.०१.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०९.२००८ (फेरसादर दि.०९.०९.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना काही माहिती मिळालेली आहे. उर्वरित माहिती मिळालेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे

अवलोकन केले असता, त्यांच्या दि. ०२.०१.२००८ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जान्वये प्रश्नार्थक,खुलासेवजा किंवा स्पष्टीकरणात्मक माहिती मागितली आहे. ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)मधील 'माहिती' च्या व्याख्येत बसत नसल्यामुळे ती देय होऊ शकत नाही. त्याप्रमाणे मुद्देनिहाय विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

१) मुद्दा अ : शासनाची जाणीवपूर्वक फसवणूक करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवानिवृत्तीनंतर पुनर्नियुक्ती होऊ शकते काय?

   - प्रश्नार्थक स्वरुपाची - ही माहिती देय होत नाही.

२) मुद्दा ब - पुनर्नियुक्तीसंबंधीची नियमावली वा अधिनियम महाराष्ट्र शासनाने तयार केलेले आहेत काय?

   - याबाबतच्या निकषाबद्दल शासनाचे आदेश किंवा परिपत्रकाची प्रत देय होत आहे.

३) मुद्दा क : पुनर्नियुक्तीचे अधिकार शालेय समितीस आहेत काय?असतील तर शासनाच्या त्या नियमाचा वा अधिनियमाचा उल्लेख दि. २१.०६.२००७ च्या शालेय समितीच्या ठरावात का करण्यात आलेला नाही?

   - परिपत्रक,निर्णयाची प्रत द्यावी लागेल.

४) मुद्दा ड : पुनर्नियुक्ती संबंधित महाराष्ट्र शासनाची नियमावली असेल तर पुनर्नियुक्तीच्या नियुक्तीस शासनाची कार्योत्तर मान्यतेची गरज आहे काय? असल्यास कार्यालयाची मान्यता त्यास कोणत्या नियमाप्रमाणे आवश्यक आहे?

   - प्रश्नार्थक स्वरुपाची - ही माहिती देय होत नाही.

५) मुद्दा इः शासनाची जाणीवपूर्वक फसवणूक करुन सेवानिवृत्तीचा प्रस्ताव मंजूर (बेकायदेशीर) करुन घेणाऱ्या व शासनाची फसवणूक करणाऱ्या कर्मचाऱ्यांची शासनाच्या नियमाप्रमाणे त्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची सेवानिवृत्तीनंतर पुनर्नियुक्ती होऊ शकते किंवा काय?

   - प्रश्नार्थक स्वरुपाची ही माहिती देय होत नाही.

६) मुद्दा ई :जन माहिती अधिकारी यांना दि. १७.०७.२००४ ला पत्की सेवानिवृत्त हेण्यापूर्वी सर्व कागदपत्रांसह लेखी पूर्वकल्पना दिली असताना देखील पत्की यांचा सेवानिवृत्तीचा प्रस्ताव मान्यतेसाठी कोणत्या नियमांचा आधार सादर केला.

   - यासंदर्भात त्रयस्थ पक्षाच्या सेवानिवृत्तीचा प्रस्ताव मान्य केला, त्याबाबतच्या टिपणीच्या प्रती अपिलार्थीस देय होत आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देय होत आहे. ती या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जि.प.परभणी यांना व्यक्तिशः लक्ष घालून जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अतः प्रकरण निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे देय होत असलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीधर माणिकराव गोवर्धन,मु.पो.ता.पूर्णा (जं.),जि.परभणी - ४३१५११

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन विद्यालय,सेलू, ता.सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.) जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजय सोपानराव डावरे,<br>हडको कॉलनी, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन,<br>मुंबई - २३ | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>निरीक्षक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी -श्री. ह. भा. ढाकणे, निरीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद<br>- श्री. सुभाष हिरासिंग राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सम्राट अशोक वाचनालय, अचलेर, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद येथे

नोकर भरती प्रकरणी झालेल्या कार्यवाहीबाबत एकंदर ११ मुद्दयावर माहिती मागितली आहे. तथापि त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली मुद्दा क्रमांक १, २, १० व ११ ची माहिती अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२००९ रोजी देण्यात आली आहे. उर्वरीत माहिती देण्याकरिता संबंधित वाचनालयास कळविण्यात आले आहे व त्यांनी माहिती दिली आहे. तथापि दिलेली माहिती ते सोबत आणू शकले नाहीत असे त्यांनी आयोगास सांगितले. त्यामुळे यासंदर्भात आयोगास तपशील देऊ शकले नाहीत. अपिलार्थीचे प्रथम अपील ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या दिनांक २६-११-२००९ च्या पत्रान्वये सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे असे कागदपत्रावरुन दिसून येत आहे. तथापि यावर सुनावणी झाल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२०-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय सोपानराव डावरे, हाडको कॉलनी, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने,<br>प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा निवासी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघुसिंचन कामे, नांदेड - श्री. बालाजी नारायणराव सुरनर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघुसिंचन कामे, नांदेड<br>- श्री. आर. पी. पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये एकूण १५ मुद्दयावर प्रश्नार्थक व खुलासेवजा माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये नमूद केलेल्या माहिती या व्याख्यमध्ये

प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती बसत नाही तरीही त्यांच्या कार्यालयाने उपलब्ध असलेली माहिती दिनांक २८-०७-२०१० रोजी स्पीड पोस्टाने पुरविली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०१-२०१० रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. त्यानंतर दिनांक २८-०७-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे कागदपत्रावरुन आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. त्यामध्ये त्यांना अपूर्ण माहिती आढळून आल्यास जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत नेमके कळवावे लागेल व तदनंतर पुढील पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत डाकेने माहिती पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** | **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** | **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने, प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघुसिंचन कामे, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघुसिंचन कामे, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सय्यद शफिख उर रहेमान पिता सय्यद अमीर,<br>रा. आर. आर. टॉवर, महाराणी लक्ष्मीबाई रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, आयडीयल उर्दू प्राथमिक शाळा, जवाहर कॉलनी, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, आयडीयल उर्दू प्राथमिक शाळा, जवाहर कॉलनी, परभणी<br>- प्रतिनिधी - सचिव, श्री. एम. एस. सरवर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. अे. ई. आठवले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, आयडीयल उर्दू प्राथमिक शाळा, जवाहर कॉलनी, परभणी या शाळेस कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसल्याने ती विना

अनुदानित शाळा आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ या शाळेस लागू होत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये या शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांची यादी तसेच सन २००३-०४ ते २००९ या कालावधीत कोणकोणते शिक्षक कमी झाले त्याची कारणे याची माहिती मुद्दा क्रमांक १ व ३ व्दारे मागितली आहे व मुद्दा क्रमांक २ मध्ये सन २००३-०४ ते आजपर्यंत शाळेतील शिक्षकांची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी मोघम स्वरुपात मागितली आहे. त्यामुळे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही.

आयडीयल उर्दू प्राथमिक शाळा, जवाहर कॉलनी, परभणी ही शाळा विना अनुदानित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ त्यांना लागू होणार नाही तथापि कलम २ (च) मध्ये माहितीच्या व्याख्येत नमूद केल्याप्रमाणे जी माहिती सार्वजनिक प्राधिकरण खाजगी संस्थेकडून मागवू शकते ती माहिती या व्याख्येत बसते. याकरिता मुद्दा क्रमांक १ व ३ च्या याद्या अपिलार्थीस देय होत आहेत. या याद्या जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्या कार्यालयातने अपिलार्थीस एक विशेष बाब म्हणून पाठवाव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक विशेष बाब म्हणून मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती (याद्या) अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद शफिख उर रहेमान पिता सय्यद अमीर, रा. आर. आर. टॉवर, महाराणी लक्ष्मीबाई रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आयडीयल उर्दू प्राथमिक शाळा, जवाहर कॉलनी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. सुनिल मुरलीधरराव शेटे,<br>पंचायत समिती गेटजवळ, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सदस्य सचिव, जात पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद सिडको बसस्टँण्डसमोर, औरंगाबाद | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद विभाग, मोंढा रोड, जाफरगेटजवळ, औरंगाबाद | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद, सिडको बसस्टँण्डसमोर, औरंगाबाद<br>- श्रीमती छाया कुलाल | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद<br>- श्री. व्ही. बी. शिंदे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती दिनांक १८-०५-२०११ रोजी देण्यात आली आहे. माहितीची संचिका त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाही म्हणून माहिती देण्यास विलंब लागला तरीही सातत्याने प्रयत्न करुन संचिकेचा शोध घेण्यात आला व संचिका प्राप्त झाल्यावर अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिनांक १८-०५-२०११ रोजी व्यक्तिशः पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहणी केली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांना दिनांक ०१-०६-२०११ रोजी लिहिलेले पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, जात पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांच्याकडून मिळाली आहे त्यामुळे ते व्दितीय अपील मागे घेत आहेत.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल मुरलीधरराव शेटे, पंचायत समिती गेटजवळ, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद, सिडको बसस्टॅण्डसमोर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानोबा भिमराव भिसे, : अपीलकर्ता
ग्रामपंचायत सेवक तथा कोंडवाडा रक्षक वसुली कारकून, पिंपरी (झ ाोला) ग्रामपंचायत, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपरी (झोला),
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ज्ञानोबा भिमराव भिसे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपरी (झोला),<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी<br>- श्री. अंभोरे सदाशिव मारोती | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - श्री. गजभारे एन. एस., विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १५-०१-२०१० रोजी त्यामध्ये मुद्देनिहाय बाबी स्पष्ट केल्या आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी माहिती दिल्याचे कबूल केले आहे. तथापि त्यांना प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत मिळाली नाही असे आयोगास सांगितले. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणी होऊन जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, जिल्हा परभणी यांनी निर्गमीत केलेल्या प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानोबा भिमराव भिसे, ग्रामपंचायत सेवक तथा कोंडवाडा रक्षक वसुली कारकून, पिंपरी (झ ोला) ग्रामपंचायत, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपरी (झोला), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, : अपीलकर्ता
'निशांत', वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ब्रँच ऑफिस, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, परभणी<br>- श्री. डी. पी. कोळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. रंधे के. एस., सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०७-२००६ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ३१-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १५-०७-२००६ रोजी कळविली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांचे व्दितीय अपील तीन वर्षाच्या विलंबाने दाखल केले आहे. व्दितीय अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार ९० दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपील फेटाळण्यायोग्य आहे. तरी विशेष बाब म्हणून आयोग या व्दितीय अपिलाचा विचार करत आहे. अत्तः अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०१-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये आठ मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्दयावर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात माहितीच्या व्याख्येत बसत असलेली व प्रश्नार्थक तसेच खुलासेवजा माहिती वगळून उर्वरीत देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना कळवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, 'निशांत', वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विपूल नाथाजी देबाजे, : अपीलकर्ता
केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, मानवत,
तालुका मानवत, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा सह निबंधक, जिल्हा सह निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, मानवत,<br>तालुका मानवत, जिल्हा परभणी - श्री. एस. एस. गिराम | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी - श्री. एस. के. बोधगिरे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०९-२००९ च्या अर्जान्वये एकूण १३ मुद्दयावर सन २००१ ते २००९ या कालावधी-तील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे आणि त्यातील बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. यापैकी उपलब्ध असलेली माहिती दिनांक २४-०९-२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय असलेल्या माहितीकरिता रुपये ६३६ इतक्या शुल्काचा भरणा या कार्यालयात करावा याकरिता दिनांक २७-११-२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १९-११-२००९ रोजी निर्णय दिला आहे. यावरुन अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना एका मुद्दयावरील म्हणजे नोंदणी झालेल्या मालमत्तेचे खरेदीखत, गहाणखत, मालमत्ता बाजारमुल्य, पाच लाखापासून पुढे नोंदणी बाबत माहिती मिळाली नाही असे दिसून येत आहे. ही माहिती मोघम स्वरुपाची मागितली असल्यामुळे व नेमकी बाब नमूद केली नाही, नेमकी खरेदीदाराची नावे इत्यादी नमूद केलेले नाहीत. माहिती विस्तृत आहे. तरीही अपिलार्थी यांनी दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन संबंधित अभिलेख्याचे तपासणीकरिता प्रतिवर्ष प्रतिनोंद रुपये पंचवीस प्रमाणे फीस शासनास जमा करुन अपिलार्थीस हव्या असलेल्या दस्तऐवजाची नकल प्रतिपेज रुपये वीस एवढी सह जिल्हा निबंधक यांच्या कार्यालयात जमा करुन उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिला आहे. ही फीस नोंदणी अधिनियम १९०८ कलम ५७ प्रमाणे आहे. ही बाब महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील तरतुदीनुसार योग्य ठरत आहे.

अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन गांभीर्य नष्ट होते.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे अपील प्रकरण या स्तरावर बंद करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विपूल नाथाजी देबाजे, केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुहास वाल्मिक पंडित, : अपीलकर्ता

'सुरेख भवन', प्लॉट नं. ३२, गणेशनगर, नूतन कॉलेजच्या पूर्वेस, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

उपविभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहिती अर्जान्वये सन २००० ते २००९ या कालावधीतील तालुका कृषि कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या विविध कामाबाबतची विस्तृत अशी एकूण ९ मुद्दयावर माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती माहिती अधिकार अधिनियमामध्ये मागणी करण्याने अधिनियमाचा उद्देश सफल होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री वळवावी लागेल. याकरिता माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुहास वाल्मिक पंडित, 'सुरेख भवन', प्लॉट नं. ३२, गणेशनगर, नूतन कॉलेजच्या पूर्वेस, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कबीर अहेमद पिता नईमोद्दीन सरवरी,<br>रा. आरा मशीनजवळ, फरकंडा रोड, पालम,<br>तालुका पालम, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कबीर अहेमद पिता नईमोद्दीन सरवरी व त्यांचे वकील श्री. शेख एफ. डब्ल्यू. | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, गंगाखेड, जिल्हा परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. एस. आर. मांडवे, व. सहायक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,<br>जिल्हा परिषद, परभणी - श्री. के. एस. हिरेमठ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील श्री. शेख एफ. डब्ल्यू., जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी दोन अंदाजपत्रकाच्या प्रती मागितल्या आहेत.

१. भारत निर्माण योजनेअंतर्गत पालम येथे नळ योजनेकरिता पाईपलाईन व विहिरीकरिता करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाची प्रत.

२. मराठवाडा पॅकेज अंतर्गत विहिर पाईपलाईन व मोटारच्या अंदाजपत्रकाची नक्कल.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भारत निर्माण योजनेअंतर्गतच्या अंदाजपत्रकाची झेरॉक्स प्रत उपलब्ध आहे. ती आयोगाच्या निदेशाप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आली. मराठवाडा पॅकेज अंतर्गत अंदाजपत्रकाची प्रत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणा-या अर्जांवर विहित मुदतीत निर्णय घेण्याची दक्षता घ्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कबीर अहेमद पिता नईमोद्दीन सरवरी, रा. आरा मशीनजवळ, फरकंडा रोड, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, : अपीलकर्ता
'पुष्पक', दत्त नगर, जिंतूर रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, कै. अण्णासाहेब पाथ्रीकर माध्यमिक विद्यालय, कडेगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, कै. अण्णासाहेब पाथ्रीकर माध्यमिक विद्यालय, कडेगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-१०-२००९ रोजीच्या

प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, 'पुष्पक', दत्त नगर, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै. अण्णासाहेब पाथ्रीकर माध्यमिक विद्यालय, कडेगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गणेश तात्याराव घुमरे,<br>रा.वाघाळा, ता.पाथरी, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम, उपविभाग पालम,जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पालम,जि.परभणी - श्री. एम.ए.जलील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी - श्री.जी.एस.खाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०७.११.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दि.०१.०४.२००७ ते ३१.१०.२००९ या कालावधीमध्ये पालम उपविभागास प्राप्त झालेल्या पातळ व बंदिस्त डांबराबाबतची माहिती मागितली आहे. तथापि अपिलार्थी यांनी संदर्भित अर्जामध्ये नमूद केलेल्या दि. ०१.०४.२००७ ते ०९.०४.२००९ या कालावधीमध्ये उपविभागास पातळ व बंदिस्त डांबराचा कोणत्याही प्रकारचा पुरवठा झालेला नाही. त्यामुळे कार्यालयीन अभिलेखाप्रमाणे ही माहिती निरंक आहे. ही बाब अपिलार्थीस दि. १८.११.२००९ रोजी कळविण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की,पुरवठादाराकडून पालम उपविभागास खातेनिहाय पुरवठा झालेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश तात्याराव घुमरे, वाघाळा, ता.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पालम,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विलास विष्णूदास मोरे,<br>रा.गुगळीधामणगाव,ता.सेलू,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,गंगाखेड,<br>जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रभारी तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी - श्री. थोरात भाऊसाहेब | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय अधिकारी,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ६ | प्रथम प्राप्त झाल्याची अपील तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये दि. ०१.०१.२००८ ते ०२.१२.२००९ अशी दोन वर्षांची तहसील कार्यालय व स्वस्त धान्य दुकानाबद्दलची एकूण १२ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहेत. या माहितीपोटी किती पृष्ठसंख्या होत आहे, याचा आढावा घेऊन

त्याकरिता अंदाजे रु.२५,०००/- शुल्क लागेल, ही बाब दि.०१.०१.२०१० रोजी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविण्यात आली आहे. तथापि या बाबीची जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णय घेताना नोंद घेतल्याचे आढळून येत नाही व जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पुरवावी, असे दि. १६.०२.२०१० रोजी घेतलेल्या निर्णयाद्वारे कळविले आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पाहता, त्याचा कालावधी मोठा असून माहितीची व्याप्ती व्यापक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीचे सर्व अभिलेखे पाहण्याकरिता उपलब्ध करुन देणे योग्य ठरत होते. तसे केल्याचे आढळून येत नाही.याकरिता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात दोन दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. विलास विष्णूदास मोरे, मु.पो.गुगळी धामणगाव, ता.सेलू, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेळके वसंत तुकाराम,<br>रा.तुरा, ता.पाथरी, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>पाथरी, जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>पाथरी, जि.परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत तुरा,ता.पाथरी,जि.परभणी - सौ. व्ही.बी.पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विस्तार अधिकारी (पं),पंचायत समिती,पाथरी,जि.परभणी - श्री. एस.एस.पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दि. १८.०१.२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात

आलेली आहे. त्याबाबत अपिलार्थी यांनी दि. १८.०१.२०१० रोजी पोच दिलेली आहे. ही बाब कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेळके वसंत तुकाराम, रा.तुरा,ता.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत तुरा,ता.पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),पंचायत समिती, पाथरी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शे.जावेद अ.सत्तार,<br>रा.मानवत,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय पोलीस अधिकारी,सेलू,जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शे.जावेद अ.सत्तार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू, जि.परभणी -प्रतिनिधी - श्री. आर.व्ही.साळवे, पोलीस उपनिरीक्षक, मानवत पोलीस स्टेशन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर पोलीस अधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली माहिती व त्यांना देण्यात आलेली माहिती यामध्ये फरक आहे व त्यांना जी माहिती हवी आहे, ती देण्यात आलेली नाही. त्यापृष्ठयर्थ त्यांनी सुनावणीच्या वेळी त्यांचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. या निवेदनाची प्रत व आयोगास सादर केलेल्या दि. ०३.०३.२०१० रोजी दाखल केलेल्या

द्वितीय अपील अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. या द्वितीय अपिलासंदर्भातील प्रथम अपिलावर दि.१८.०१.२०१० रोजी सुनावणी घेतल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी नमुद केलेले मुद्दे व आयोगापुढे सादर केलेले दि. ०२.०६.२०११ रोजीचे निवेदन याचा विचार करुन पुन्हा एकदा सुनावणी घेणे आवश्यक ठरत आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात द्वितीय अपिलातील व अपिलार्थीने दि.०२.०६.२०११ रोजीच्या सादर केलेल्या अर्जातील मुद्दे व अधिनियमातील कलम ८(१) (छ) व ८(१)(ज) मधील तरतुदी विचारात घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे. यास्तव एक विशेष बाब म्हणून जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यासाठी प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांनी अपिलार्थीच्या दि.१८.०१.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत पुनश्च् सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अब्दुल सत्तार, तकिय्या मोहल्ला, मानवत, मु.पो.ता.मानवत,जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय प्रभाकरराव लव्हांडे, : अपीलकर्ता
रा. परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
श्री राजीव गांधी प्राथमिक विद्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा),जिल्हा परिषद,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला

निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१८.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय प्रभाकरराव लव्हांडे,शांताबाई चौधरी यांचा वाडा, शनिमंदिराच्या पाठीमागे,सरकारी दवाखान्याजवळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री राजीव गांधी प्राथमिक विद्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्रकुमार वामनराव भुतकर,<br>रा.मुरुमखेडा, ता.जिंतूर, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा येलदरी कँम्प,<br>ता.जिंतूर,जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, महाराष्ट्र ग्रामीण बँक मुख्य कार्यालय,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | अध्यक्ष,महाराष्ट्र ग्रामीण बँक मुख्य कार्यालय,नांदेड - प्रतिनिधी - श्री. उदय कि.कुर्वलकर, क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अध्यक्ष व सरव्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, नांदेडतर्फे श्री. उदय कि.कुर्वलकर, क्षेत्रीय व्यवस्थापक,औरंगाबाद उपस्थित आहेत.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, महाराष्ट्र ग्रामीण बँकेची निर्मिती रिजनल रुरल बँक ॲक्ट,१९७६ (दि.०९.०२.१९७६) नुसार झाली आहे. या बँकेमध्ये ५०% सहभाग केंद्र सरकारचा असून ५०% सरकारच्या इतर उपक्रमांचा - बँक ऑफ महाराष्ट्रचा ३५% व राज्य शासनाचा १५% सहभाग आहे. या पार्श्वभूमीवर बँकेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. बँक केंद्रीय कायद्याखाली निर्माण झाली असल्यामुळे या प्रकरणाशी संबंधित द्वितीय अपील केंद्रीय माहिती आयोगाकडे करावे लागेल. अपिलार्थी यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०३.२०१० रोजी केलेले आहे. प्रस्तुत अपिलावर विचार करणे राज्य माहिती आयोगाच्या अधिकारकक्षेच्या बाहेर आहे. अपिलार्थी यांना आवश्यक वाटल्यास केंद्रीय आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्रकुमार वामनराव भूतकर,मु.मुरुमखेडा, पो. येलदरी कॅम्प, ता. जिंतूर, जि.परभणी

२. सरव्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक,केंद्रीय कार्यालय,शिवाजीनगर, नांदेड -४३१६०२

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिंदे बालासाहेब बन्शीधर, : अपीलकर्ता
रा.कानसूर,ता.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
१) ग्रामसेवक, कानसूर,ता.पाथरी,जि.परभणी
२) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पाथरी जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -<br>(१) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कानसूर, ता.पाथरी, जि.परभणी<br>(२)गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पाथरी, जि.परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : अनुपस्थित |
| ३.४ | विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, पाथरी,जि.परभणी - श्री. स्वप्नील पवार | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.०२.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५.०३.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती,पाथरी,जि.परभणी उपस्थित आहेत.

विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती,पाथरी,जि.परभणी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होण्याकरिता वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्याकरिता पुढील तारीख वाढवून देण्याकरिता विनंती केली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंदे बालासाहेब बन्शीधर, रा. कानसूर, ता.पाथरी,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कानसूर, ता. पाथरी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२.१. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामभाऊ भिवसेन आठवले, : अपीलकर्ता
मु.खेर्डा (दु.कि.),ता.सेलू,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,सेलू,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत,खेर्डा (दु.की.) ता.सेलू, जि.परभणी - श्री. एस.बी.तोटेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी - श्रीमती के.पी.कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० (फेरसादर,दि.०६.०३.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०१.०१.१९८० ते ३१.०८.२००९ अशी २९ वर्षांची चार

मुद्यांद्वारे मौजे खेर्डा (दु.की.) या गावाच्या ग्रामसभेबाबतच्या विस्तृत माहितीच्या छायाप्रती मागितल्या आहेत. दि. ०४.०९.२००९ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलूमार्फत अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना कळविण्यात आले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही ग्राम पंचायत मौ.खेर्डा या स्तरावरील असल्याकारणाने व ग्रामसेवक जन माहिती अधिकारी असल्याने माहिती संबंधित ग्रामसेवकाकडून प्राप्त करुन घ्यावी. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी वयोवृध्द(वय वर्षे ८५)होते व त्यांचे माहे फेब्रुवारी,२०१० मध्ये देहावसान झाले आहे. ही बाब विचारात घेता, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू यांच्या कार्यालयातील व कार्यक्षेत्रातील ग्रामसेवक मौजे खेर्डा यांनी अपिलार्थीने जी माहिती मागितली होती व जी त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे त्या माहितीच्या प्रती त्यांच्या कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावाव्यात व माहिती जाहीर प्रगट करावी. ही कार्यवाही आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय होत असलेली माहिती आयोयगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत त्यांच्या कार्यालयातील नोटीस बोर्डवर जाहीरपणे प्रगट करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामभाऊ भिवसेन आठवले,मु.खेर्डा (दु.कि.),ता.सेलू,जि.परभणी

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,खेर्डा (दु.की.) ता.सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष मदनसिंह चंदेल, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
विभागीय जात प्रमाणपत्र,
पडताळणी समिती,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष,
जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.-१,औरंगाबाद - कु.छाया कुलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०८.०६.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००७ सालातील अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १९.०२.२००७ रोजी दाखल केलेल्या अपील अर्जासंदर्भातील स्थिती काय आहे, ती कळवावी, अशी माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दि. ०१.०७.२००९ रोजी सद्यस्थिती कळविली आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०८.१०.२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. त्यामध्ये पुन्हा अपिलार्थीस माहितीची एक प्रत पाठविण्यात यावी, असे सूचित केले आहे. तदनंतर अपिलार्थीस दि. १९.०२.२००७ रोजीच्या अपील अर्जाची तत्कालीन स्थिती कळविलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील युक्तिवाद व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भातील सद्यस्थितीची माहिती त्यांना कळविण्यात आल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोषसिंह मदनसिंह चंदेल,द्वारा हि.गु.चंदेल, "निशांत", वैभवनगर, जिंतूररोड, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. शिला दत्तात्रय शेटे, : अपीलकर्ता
रा. परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर - श्री.संदीप डोईफोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर पोलीस अधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालय,परभणी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात दि. १२.०१.२०१० रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली आहे. ती माहिती संबंधित नानलपेठ पोलीस स्टेशनकडून दि. १४.०१.२०१० रोजी मागविण्यात आली. ती संबंधित पोलीस स्टेशनकडून दि. ०१.०२.२०१० रोजी प्राप्त झाली. जन

अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांच्याकडे प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, असा दि. २०.०२.२०१० रोजी निर्णय घेण्यात आला. अपिलार्थीस दि. २८.०२.२०१० रोजी माहितीपोटी शुल्क ₹८/- व टपालखर्च ₹२५/- असे एकूण ₹३३/- चा भरणा करण्याचे सूचित केले.अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. ३०.०४.२०१० रोजी अपिलार्थीस चार पृष्ठांची माहिती दिली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात काही माहिती अपुरी मिळाली असे अपिलार्थीस आढळल्यास त्यांनी हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व तदनंतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित माहिती द्यावी लागेल.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार अर्जदारास तीस दिवसांचे आत त्यांनी मागितलेली माहिती सशुल्क देय होते अन्यथा अर्जदारास कलम ७(६)नुसार विनामूल्य द्यावी लागते. या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटी ₹३३/- विहित मुदतीनंतर स्वीकारण्यात आले असल्याचे दिसून येत आहे. यास्तव सदर शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परत करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क ₹३३/- इतके त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत परत करावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. शिला दत्तात्रय शेटे, रेणुका माता मंदिर, शनिवार बाजार,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रायभोळे मिलींद देवराव,<br>म. फुलेनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी - श्री. भाऊसाहेब थोरात | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये रॉकेल परवाने, नुतनीकरण इत्यादीबाबतची प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती लेखी स्वरुपात

मागितली आहे. प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती द्यावी असा निर्णय दिनांक १७ फेब्रुवारी २०१० रोजी दिला आहे. संबंधित अव्वल कारकून यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे तथापि काही कालावधीपासून ते वैद्यकीय रजेवर आहेत आणि अपु-या कर्मचाऱ्यामुळे माहिती देणे राहून गेले आहे ती तात्काळ अपिलार्थीस देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना असे निदेश आहेत की, अपिलार्थी यांना ही माहिती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी. त्याचप्रमाणे भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांवर विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती देण्यात येईल याबाबत दक्ष राहण्याबाबत संबंधित कर्मचा-यांना सूचना देण्यात याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी-नुसार प्राप्त झालेल्या अर्जांवर विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती देण्यात येईल याबाबत दक्ष राहण्याबाबत संबंधित कर्मचा-यांना सूचना द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रायभोळे मिलींद देवराव, म. फुलेनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितीन चंपतराव आजबे, : अपीलकर्ता
मु. निपाणी टाकळी, पो. ठेंगळी पिंपळगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू,<br>जिल्हा परभणी - श्री. सतीश सोनी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू,<br>जिल्हा परभणी - डॉ. प्रताप काळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०-०२-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १६-१२-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये निपाणी टाकळी येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडील धान्य पुरवठा, रॉकेल इत्यादीबाबतची सन २००० ते २००९ या कालावधीची विस्तृत स्वरुपाची व व्यापक अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी तहसील कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थीस दिनांक ३१-१२-२००९ रोजी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०८-०१-२०१० रोजी त्रयस्थ स्वस्त धान्य दुकानदार, निपाणी टाकळी यांना अपिलार्थी यांना सन २००० ते २००९ या कालावधीतील शिधापत्रिका धारकांना धान्याचे वाटप केलेल्या रजिस्टरच्या प्रती दाखविण्याकरिता कळविले आहे. त्याच्या छायांकीत प्रती शुल्क घेऊन देण्यात याव्यात असे कळविले आहे. अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील आहेत असे त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेले नाही.

वरील बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीअन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस निश्चित करुन व ही बाब अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून त्यावेळी संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराला त्यांच्याकडील सर्व माहितीचे रजिस्टर घेऊन अपिलार्थीस अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडील सर्व माहितीचे रजिस्टर त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन चंपतराव आजबे, मु. निपाणी टाकळी, पो. ठेंगळी पिंपळगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनबंधु सुदामराव हत्तिअंबिरे, : अपीलकर्ता
महात्मा फुले नगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी<br>- श्री. व्ही. जी. पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. बी. बी. सोनवणे, सहायक अभियंता श्रेणी-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० मुंबई कार्यालया-कडे प्राप्त |

१७-०३-२०१०
रोजी औरंगाबाद
कार्यालयाकडे
प्राप्त

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २८-०४-२००९ च्या माहिती अर्जावर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठापुढे केलेल्या व्दितीय अपिलावर दिनांक २२.१२.२०१० रोजी सुनावणी झाली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे व राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई कार्यालयाकडे वेगवेगळी व्दितीय अपिले दाखल केली आहेत. तथापि दोनही व्दितीय अपिलांचा मूळ अर्ज एकच आहे. या पार्श्वभूमीवर यापूर्वीच या मूळ अर्जाच्या संदर्भात आयोगाने दिनांक २२-१२-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला असल्याकारणाने आज रोजीचे व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे त्यामुळे सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनबंधु सुदामराव हत्तिअंबिरे, महात्मा फुले नगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सिध्दार्थ आत्माराम किर्तने,<br>विश्वासनगर, अंबिका नगर जवळ, वांगी रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. एन. जी. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० मुंबई कार्यालयाकडे प्राप्त<br>१७-०३-२०१० औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यात आली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०९-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-११-२००९ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी दिनांक १८-११-२००९ रोजी प्रथम अपील केले आहे. तथापि या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. याकरिता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक ठरत आहे. याकरिता सदरचे प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. प्रथम अपिलावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा लागेल असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ आत्माराम किर्तने, विश्वासनगर, अंबिका नगर जवळ, वांगी रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राऊत विजयकुमार शिवाजीराव,<br>पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. सुरेश गंगाधर केंद्रे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. अंकुश रामराव दहिफळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २७-१०-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २००८-२००९ व २००९-२०१० या कालावधीतील कनिष्ठ लेखाधिकारी पदाबाबत स्वतःच्या पदोन्नतीबाबत विविध माहितीच्या साक्षांकीत प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीस माहितीपोटी रुपये १०० इतक्या शुल्काचा कार्यालयात भरणा करण्याकरिता दिनांक ११-११-२००९

रोजी कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक २९-०१-२०१० रोजी रुपये १०० चा भरणा केला आहे. अपिलार्थीस दिनांक २९-०१-२०१० रोजी माहिती देण्यात आली. माहिती संबंधित नस्ती विभागीय आयुक्त कार्यालयात असल्याकारणाने परत प्राप्त झाल्यावर दिनांक २५-०३-२०१० रोजी उर्वरीत माहिती देण्यात येऊन अशा प्रकारे अपिलार्थीस सर्व माहिती देण्यात आली अहे. अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याची पोच दिनांक २५-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांना दिली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता सदरचे व्दितीय अपील प्रकरण बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राऊत विजयकुमार शिवाजीराव, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हाजी अ. गफार खुरेशी, : अपीलकर्ता
मदिना नगर (वॉर्ड ९), परभणी, तालुका जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हाजी अ. गफार खुरेशी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, कार्यालय समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. एस. ई. गोडगोडवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्रीमती सय्यदा फरिदा बेगम स. अमिन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ यांची बाजू ऐकून घेण्यात आली.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांना ती घ्यावी लागेल. अपिलार्थी त्रयस्थ पक्षाची माहिती मागत आहेत. त्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यानंतर कलम ८ (१) मधील तरतुदीनुसार सार्वजनिक व्यापक जनहिताच्या कसोटीवर अपिलार्थीस माहिती देण्याबाबतची बाब विचारात घेऊन प्रथम अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी यांना अपिलार्थीच्या दिनांक २३-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा लागेल. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा समाज-कल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हाजी अ. गफार खुरेशी, मदिना नगर (वॉर्ड ९), परभणी, तालुका जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, कार्यालय समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल,<br>निशांत, वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक, भूमि अभिलेख, परभणी<br>- श्री. ए. एस. कदम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, परभणी<br>- श्री. एम. जी. शहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०२-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>१९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत

नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी यांनी अपिलार्थी-च्या दिनांक २४-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, निशांत, वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख बिलालोद्दीन शेख मैनोद्दीन, : अपीलकर्ता
मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख बिलालोद्दीन शेख मैनोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी - श्री. अवधूत प्रसादराव बन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी - प्रतिनिधी - श्री. रंधे के. एस., सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख बिलालोद्दीन शेख मैनोद्दीन, मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय रामकृष्णराव कुलकर्णी, : अपीलकर्ता
व्दारकाई, नानलपेठ, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड<br>- श्री. एस. एस. हाशमी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये सन १९८८ ते २००९ अशी २१ वर्षाच्या कालावधीची मंडळाअंतर्गत वसूल केलेल्या पाणीपट्टी, महसूलचा गैरवापर याबाबतच्या सहा पत्राचा संदर्भ देऊन माहिती मागितली आहे. ही

माहिती अभिलेख कक्षात शोध घेऊनही उपलब्ध झाली नाही त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला आहे. अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००९ रोजी माहिती प्राप्त झाल्यावर देण्यात येईल असे कळविले आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी दिनांक ३०-११-२००९ ला सुनावणी घेतली आहे त्यामध्ये प्रकरण जुने असल्याकारणाने प्रयत्न करुनही जन माहिती अधिकारी यांना अभिलेखे आतापर्यंत मिळाले नाहीत याची नोंद घेण्यात आली आहे व लवकरात लवकर अभिलेखे शोधून अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात यावा असा निर्णय दिला आहे. अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीस उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या कागदपत्राच्या वेगवेगळया नस्त्या आता प्राप्त झाल्या असून त्यांना आवश्यक असलेली एकूण १८ पृष्ठांची माहिती दिनांक ०१-०६-२०११ रोजी नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली आहे. आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. या पार्श्वभूमीवर सदरचे अपील बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय रामकृष्णराव कुलकर्णी, व्दारकाई, नानलपेठ, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय सोपानराव डावरे, : अपीलकर्ता
हडको कॉलनी, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद - श्री. राठोड एस. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,

लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय सोपानराव डावरे, हडको कॉलनी, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यकांत विश्वनाथराव भाले,<br>रा.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी (तत्कालीन) - उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली - श्री. पी.जी.नाईकवाडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन तसेच अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावरुन असे दिसून येत आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या जोडरस्ता फाळा

प्रजिमा ४४ वरील पुलाचे जोडरस्त्याचे कामाचे ८ वे व अंतिम बिल पारीत करण्याचा दिनांक मिळालेला नाही. उर्वरित माहिती मिळाली असल्याचे दिसून येत आहे. याकरिता अपिलार्थीस ही माहिती कार्यकारी अभियंता यांनी ८ वे व अंतिम बीलाची नोंद ज्या रजिस्टरमध्ये अथवा अभिलेखामध्ये केली असेल त्या नोंदीवरुन त्याचप्रमाणे मोजमापपुस्तिकेवरुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल. संदर्भित कामाचे देयक पारीत केल्याचा दिनांक अपिलार्थीस आवश्यक आहे, कारण की, त्यांना या बीलाचा धनादेश जानेवारी,२०१० मध्ये मिळालेला आहे, असे दिसून येत आहे. सदरची माहिती अपिलार्थीस एका महिन्याच्या आत विनामूल्य द्यावी लागेल. त्याचप्रमाणे ८ वे व अंतिम बीलाची प्रत अपिलार्थीस द्यावी लागेल. संदर्भित बील पारीत केल्याचा व धनादेश अदा केल्याचा दिनांक एकच असेल तर तसे कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील उर्वरित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सूर्यकांत विश्वनाथराव भाले, प्लॉट नं. १०४, लक्ष्मीनगर,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भाऊसाहेब ज्ञानोबा पाटील, : अपीलकर्ता
रा.पाथरी,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक,
नगर परिषद,पाथरी,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक कार्यालय निरीक्षक, न.प.पाथरी,जि.परभणी - श्री. डी.बी.चिंचाणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी, जि.परभणी - श्री. ए.ए.माळी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीबाबत दि. १२.०१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर

दि. ०६.०३.२०१० व ११.०३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. याबाबत सविस्तर पाहणी करुन जन अपिलीय अधिकारी या निर्णयाप्रत आले आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीच्या आत माहिती दिली आहे.तसेच सन १९६५ ते २००९ ते १० या कालावधीचा मालकीबाबतचा खुलासा अपिलार्थीस विनामूल्य देण्यात यावा. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी ती व्यक्तिशः प्राप्त करुन घेतली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,न.प.पाथरी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, प्रथम अपिलाच्या वेळी त्यांनी मागितलेल्या माहितीचे संपूर्ण अभिलेखे त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते व ते अपिलार्थी यांनी पाहिले आहेत.

अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांच्या दि. ०३.०४.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुक,खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, असे नमूद केले आहे व त्याप्रमाणे घर क्र.९६/१६४४ नियमबाहय हस्तांतर झाले आहे, असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांना मुख्याधिकारी,नगर परिषद,पाथरी यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे, ती देण्यात आली आहे. या माहितीच्या आधारे ते पुढील प्रशासकीय कार्यवाहीकरिता सक्षम प्राधिकरणाकडे पाठपुरावा करु शकतात, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब ज्ञानोबा पाटील, पाटील गल्ली, पाथरी, ता.पाथरी जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालय निरीक्षक ,नगर परिषद,पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बनसोडे भोजाजी एकनाथराव, : अपीलकर्ता
पिंपळगाव (बा.), ता.पूर्णा, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक,सहकारी संस्था, ता.पूर्णा
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.पूर्णा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बनसोडे भोजाजी एकनाथराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक सहकारी संस्था,ता.पूर्णा, जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. ए.बी.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,पिंपळगाव (बा.) | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच सहकारी संस्थेचे प्रतिनिधी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे विभागीय सहनिबंधक यांची विशेष साक्ष नोंदवून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यासाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना अधिनियमातील कलम १८ (३) (ङ) [Sec 18(3)(e)]मधील तरतुदीनुसार पुढील सुनावणीस विशेष साक्षीकरिता उपस्थित राहावे लागेल. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी त्याचप्रमाणे विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद व संबंधित सहकारी संस्थेचे सचिव/अध्यक्ष यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बनसोडे भोजाजी एकनाथराव,पिंपळगाव (बा),पो.काल्लेश्वर,ता.पूर्णा, जि.परभणी,

२. जन माहिती अधिकारी, सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगाव (बा.),ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था,ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिवाजी कचरु दिपके,<br>रा.पिंपळगाव (बा.),ता.पूर्णा,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,सहकारी संस्था,पूर्णा,जि.परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था,पूर्णा,जि.परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक निबंधक,सहकारी संस्था,ता.पूर्णा,जि.परभणी यांचे कार्यालय | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक,सहकारी संस्था,ता.पूर्णा,जि.परभणी - प्रतिनिधी - श्री.ए.बी.चव्हाण, सहकारी अधिकारी श्रेणी - १ | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,पिंपळगाव (बा.) | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच सहकारी संस्थेचे प्रतिनिधी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे विभागीय सहनिबंधक यांची विशेष साक्ष नोंदवून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यासाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना अधिनियमातील कलम १८ (३) (ङ) [Sec 18(3)(e)]मधील तरतुदीनुसार पुढील सुनावणीस विशेष साक्षीकरिता उपस्थित राहावे लागेल. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी त्याचप्रमाणे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद व संबंधित सहकारी संस्थेचे सचिव/अध्यक्ष यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी कचरु दिपके, रा.पिंपळगाव (बा.), पो. काल्लेश्वर,ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी,सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.पूर्णा, जि.परभणी यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,पिंपळगाव (बा.), ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. फकरोद्दीन मैनोद्दीन सिद्दीकी,<br>रा. परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग,बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ व स),नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग,बीड - श्री. पं.रं.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उसं),नांदेड -श्री. भा.भ.सरवैया | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०५.०९.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती देण्याकरिता रु.६०/- इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. ३०.०९.२००९ रोजी

अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्याचदिवशी माहिती व्यक्तीशः घेऊन त्यासंदर्भात पोच दिली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २५.०१.२०१० रोजी त्यांनी निर्णय निर्गमित केलेला आहे. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना दिलेली माहिती अपुरी,चुकीची व दिशाभूल करणारी नाही, असे अपिलार्थीचे मत झाले व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळालेली आहे, असे सांगितले व तसे या निर्णयामध्ये नमूद केलेले आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली आहे व तसे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे स्तरावर अपील बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. फकरोद्दीन मैनोद्दीन सिद्दीकी,द्वारा श्री. शफियोद्दीन मैनोद्दिन सिद्दिकी यांचे राहते घर आमीन कॉलोनी, धार रोड, ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नगर रोड,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उसं),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माणिक दिगांबरराव आस्वले, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे. तथापि अपुरी उपलब्ध करुन दिली आहे, असे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(म.),तहसील कार्यालय,परभणी यांना अपुऱ्या माहितीबाबत नेमके कळवावे लागेल. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत त्यांना नेमकी कोणती माहिती अपुरी मिळाली आहे, त्यासंदर्भात कळवावे व तदनंतर पुढील पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ

अर्ज विचारात घेऊन उर्वरित नेमकी माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून काही मुद्यांबाबत संदर्भ प्राप्त झाल्यास, पुढील पंधरा दिवसांचे आत अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माणिक दिगांबरराव आस्वले, रा. प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(म.),तहसील कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विलास विष्णूदास मोरे, : अपीलकर्ता
रा.गुगळी धामणगाव,ता.सेलू,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णुदास मोरे, मु.पो.गुगळीधामणगाव, ता.सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद शामीर पिता सय्यद कुलसूम,<br>रा.उखळद,पो. पिंपरी दे., ता. जि.परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्राम पंचायत, उखळद,ता.जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,पंचायत समिती,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद शामीर पिता सय्यद कुलसूम-<br>प्रतिनिधी - श्री.स.महेबुब पिता शामीर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत, उखळद,पो. पिंपरी दे.,ता.जि.परभणी - श्री. आर. एम.मालेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, परभणी - श्री. एस.आर.चिलगर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दिनांक नाही. |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यांच्या

द्वितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, प्रथम अपिलावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती,परभणी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. ही सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. या प्रकरणी गट विकास अधिकारी,श्रेणी-१,पंचायत समिती, परभणी यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,श्रेणी-१,पंचायत समिती,परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,श्रेणी-१,पंचायत समिती,परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद शामीर पिता स.कुलसूम, रा. उखळद,पो. पिंपरी दे., ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, उखळद,पो. पिंपरी दे.ता.जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,श्रेणी-१,पंचायत समिती,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साळवे विठ्ठल किशनराव, : अपीलकर्ता
रा.पाथरी, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर

संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १५.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साळवे विठ्ठल किशनराव, गौतमनगर, पाथरी, ता.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शे. जावेद अ.सत्तार, : अपीलकर्ता
रा.मानवत,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद,मानवत,
जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद,मानवत,जि.परभणी

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३३
२ सुनावणीची तारीख दि. ०३-०६-२०११
३ आज रोजीची उपस्थिती :
३.१ अपिलार्थी - श्री. शे. जावेद अ.सत्तार : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी - लेखापाल, नगर परिषद, मानवत, जि.परभणी : अनुपस्थित
३.३ जन अपिलीय अधिकारी- मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत,जि.परभणी - श्री. जे. एस.सोनवणे : उपस्थित

४ जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१.०१.२०१०
५ जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख -
६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०१.०२.२०१०
७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८.०४.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.०१.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये नगर परिषद मानवत शहरातील मेनरोड ते बौध्दवाडा पर्यंत टाकण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन संदर्भात एकूण ५ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती दि. ०१.०२.२०१० रोजी अपिलार्थी यांना मिळालेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या

युक्तिवादात आयोगास सांगितले की, सदरची माहिती त्यांना दि. १०.०२.२०१० रोजी मिळाली आहे व त्यामधील अपूर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) मुद्दा क्र. ३ मध्ये त्यांनी नकाशाची मागणी केली आहे. तो नकाशा त्यांना अप्राप्त आहे.

२) मुद्दा क्र.६ मध्ये एकूण किती जोडणी कॉक यांची संख्या दिली नाही. - याबाबत एकूण जोडणी कॉकची संख्या द्यावी लागेल.

३) मुद्दा क्र.७ मधील विविध कामांवर झालेल्या खर्चाचा तपशील दिला नाही. - जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, असा वेगळा खर्च नाही. - याबाबत आयोगाने सूचित केले की, त्यांना शेवटच्या बीलाची प्रत देण्यात यावी.

मुख्याधिकारी, नगर परिषद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून वर नमूद केलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविली जाईल, याकडे व्यक्तिशः पहावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अ.सत्तार,रा.तकिय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय मार्ग,मानवत,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद,मानवत,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,मानवत, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पंढरीनाथ गोपाळराव बोबडे, : अपीलकर्ता
रा. वाघी (बो.), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, चारठाणा, तालुका जिंतूर,<br>जिल्हा परभणी - श्री. जी. डी. कल्याणकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते दिनांक ०७-१२-२००९ या कालावधीतील राष्ट्रीय फलोत्पादन योजना व विविध योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या किटकनाशक यांची वाटप यादी व देण्यात आलेले अनुदान याबाबत मागितली मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे व त्याची पोच अपिलार्थीने दिलेली आहे. ही बाब अपिलार्थीच्या तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांना लिहिलेल्या दिनांक २५-०२-२०११ च्या पत्रावरुन दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ गोपाळराव बोबडे, रा. वाघी (बो.), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, चारठाणा, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद जावेद स. वाजेद, : अपीलकर्ता
रा. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,<br>तालुका जिंतूर, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - श्री. एल. पी. जोशी, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. बी. एस. ठाकूर, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. एस. एच. मेत्रेवार, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व श्री. एस. एच. मेत्रेवार, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कौसडी, तालुका जिंतूर उपस्थित आहेत.

श्री. एस. एच. मेत्रेवार, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कौसडी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १४-१२-२००९ च्या अर्जान्वये दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिनांक २५-०३-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. (तसेच ग्रामसेवक यांना अपिलार्थीचा अर्ज दिनांक २३-०३-२०१० रोजी प्राप्त झाला आहे व लगेच माहिती दिली आहे)

जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २९-०३-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कौसडी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या दिनांक २०-०३-२०१० रोजीच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे ग्रामपंचायतकडून कार्यवाही अपेक्षित केली आहे. सदरची बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. तथापि ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कौसडी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद जावेद स. वाजेद, रा. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भिमराव तुळशीराम साळवे, | : | अपीलकर्ता |
| मु. पो. कृष्ण नगर, कोद्री रोड, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - श्री. एम. व्ही. दलाल, नायब तहसीलदार | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ रास्त भाव दुकानदार यांच्याकडील विविध सात मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्रयस्थ रास्त भाव दुकानदार यांना दिनांक २०-०१-२०१० रोजी कळविण्यात आले. त्याप्रमाणे त्रयस्थ रास्त भाव दुकानदार यांनी दिनांक २६-०२-२०१० रोजी सर्व माहिती एकत्रित झाल्यानंतर अर्जदाराला मागणी केलेल्या संदर्भात पृष्ठ संख्या गणना करुन रुपये ५००० खर्च येत असल्याबाबत तहसीलदार, गंगाखेड यांना कळविले. त्यानुसार तहसीलदार, गंगाखेड यांनी दिनांक ०५-०३-२०१० रोजी अपिलार्थीस शुल्क भरण्याचे कळविण्याचा प्रयत्न केला. तथापि अपिलार्थी यांनी सदरचे पत्र घेण्यास नकार दिला आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १५-०४-२०१० रोजी निर्णय दिला आहे त्यामध्ये सुध्दा या बाबी आढळून येत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. अपिलार्थी यांना द्यावयाची माहिती उपलब्ध असल्याचे वरील बाबीवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आलेली नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तहसील कार्यालयात पाहणीकरिता उपलध करुन देणे आयोगास योग्य वाटते. यास्तव जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भिमराव तुळशीराम साळवे, मु. पो. कृष्ण नगर, कोद्री रोड, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. धवन गजानन नानाराव, | : | अपीलकर्ता |
| | रा. कावलगांव, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग), जिल्हा परिषद, परभणी | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग), परभणी - प्रतिनिधी - श्री. डी. बी. चिद्रेवार, उप अभियंता | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये जिल्हा परिषदे अंतर्गत कावलगांव सर्कलमध्ये झालेल्या विकास कामांची माहिती मागितली आहे. सदरची माहिती एकत्र करण्यास काही कालावधी लागला. त्यानंतर दिनांक १३-०४-२०१० रोजी अपिलार्थीस नि:शुल्क माहिती देण्यात आली. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः घेतली.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने दिनांक ०५-०५-२०१० च्या व्दितीय अपिला-मध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे. याकरिता अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली हे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत कळवावे लागेल व त्यानंतर पुढील पंधरा दिवसाच्या आत मूळ माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने उर्वरीत माहिती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने जन माहिती अधिकारी यांना पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धवन गजानन नानाराव, रा. कावलगांव, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप राधाकिशन मोगल, : अपीलकर्ता
रा. कुंडी, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप राधाकिशन मोगल, रा. कुंडी, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अशोक हरिभाऊ कु-हाळे, रचना नगर, कारेगाव रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, परभणी - श्री. ए. एम. कुरेशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), परभणी - श्री. एस. के. बोधगिरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. प्रकरणात अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक हरिभाऊ कु-हाळे, रचना नगर, कारेगाव रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, परभणी यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), परभणी, प्रशासकीय इमारत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुनिरोद्दीन पिता शेख शमशोद्दीन, : अपीलकर्ता
रत्नप्रभा (गोदावरी दुधना) साखर कारखाना, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी, :
गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०२-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी कडील वाहन विभागासंबंधीची माहिती मागितली आहे. शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०२-२०१० रोजी कळविले आहे की, कारखान्याचे सर्व अभिलेखे अवसायक मंडळ यांना हस्तांतरीत केले असल्यामुळे प्रकरणाशी संबंधित माहिती अध्यक्ष, अवसायक मंडळ, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांच्याशी पत्रव्यवहार करुन मागवून घेण्यात यावी. यावर दिनांक १५-०३-२०१० रोजी कार्यालय अधीक्षक, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा यांनी अपिलार्थीस कळविले आहे की, उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मागितलेली माहिती अभिलेख्यामध्ये नाही. त्यामुळे माहिती देता येत नाही.

अपिलार्थीच्या दिनांक ०६-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून उप संचालक (साखर), नांदेड यांना आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (साखर), नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घ्यावी. याकरिता सदरचे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

उप संचालक (साखर), नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुनिरोद्दीन पिता शेख शमशोद्दीन, साखर कारखाना, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, देवनांद्रा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उप संचालक (साखर), कार्यालय प्रादेशिक सह संचालक (साखर), नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. युनूसखाँ चाँदखाँ पठाण, : अपीलकर्ता
मदिनानगर, मेनरोड (मदिनापाटी), परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, कार्यालय अधीक्षक अभियंता दक्षता पथक व परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद<br>- श्री. सु. म. राऊत | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद - श्री. सु. ह. खरात | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये कालवा निरीक्षक, दप्तर कारकून, मोजणीदार इत्यादी रिक्त पदाबाबत तसेच नियुक्तीच्या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती मागितली आहे. अपिलार्थीस दिनांक ३१-०४-२०१० रोजी ३० पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २५-०३-२०१० रोजी सुनावणी घेतली. त्यानंतर पुन्हा अपिलार्थीस दिनांक १७-०४-२०१० रोजी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही असे कळविल्यानुसार अपिलार्थीस पुन्हा दिनांक ११-०५-२०१० रोजी व्यक्तिशः माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना संख्यात्मक माहिती देण्यात आली होती तथापि त्यांनी यादी मागितली होती त्याबाबत माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही व इतर कार्यालयाकडून घ्यावी असे दिनांक ०६-०७-२०१० रोजी कळविले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांच्या-कडून अपिलार्थीस वेळोवेळी माहिती पुरविण्यात आली आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०५-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये दिनांक ०८-०८-२००८ रोजी प्रजावाणी वृत्तपत्रात पदांची संख्या ३४ दाखविण्यात आली आहे व त्यात दक्षता पथक यांनी अनुसूचित जमाती / अंशकालीन उमेदवार अशी भरती न केल्याबाबत नमूद केले आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळवावे असे आयोगाने सूचित केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. युनूसखॉं चॉंदखॉं पठाण, मदिनानगर, मेनरोड (मदिनापाटी), परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, कार्यालय अधीक्षक अभियंता दक्षता पथक व परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वि. गो. जोशी, | : | अपीलकर्ता |
| | व्दारा, करंजीकर निवास, भगवान वाघमारेंच्या बाजूस, गणपती चौक, जिंतूर रोड, परभणी | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास शाखा (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. आर. जी. चव्हाण | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. पी. व्ही. बनसोडे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनाक २५-०१-२०१० च्या अर्जान्वये तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. तथापि मुद्दा क्रमांक १ व ३ मधील जावक नोंदवहीमध्ये नोंद केलेल्या सत्यप्रती विषयी नमूद केलेल्या तारखे-बाबत संभ्रम होत असल्याकारणाने नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याबाबत कळवावे असे दिनांक १०-०२-२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक २ मध्ये नमूद केलेली बाब ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०५-०४-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, अपिलार्थीच्या माहिती अर्जामधील तारखेमध्ये संभ्रम असल्यामुळे नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याबाबत बोध होत नाही. तरी याबाबत जन माहिती अधिकारी यांना कळविण्यात यावे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक १ व ३ यामध्ये जावक नोंदवहीमधील नोंद केलेल्या पत्राच्या सत्यप्रती मागितल्या असल्याचे दिसून येत आहे. आयुक्त कार्यालयात पत्रव्यवहार दररोज मोठ्या प्रमाणावर असतो. त्या सर्व संचिका शोधून काढाव्या लागतील व त्यातील नेमकी माहितीची प्रत शोधावी लागेल. यासाठी कार्यालयातील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. आयुक्त कार्यालयातील पत्रव्यवहार विचारात घेता अशा प्रकारे माहिती मागणे व्यवहार्य नाही व माहिती अधिकाराचे उद्दिष्ट साध्य होत नाही व व त्यामुळे मागितलेली माहिती कलम ७ (९) अन्वये देय होणार नाही. अपिलार्थी यांच्या दिनांक १५-०५-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही असे मोघमपणे नमूद केलेले दिसून येत आहे. याकरिता अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करुन त्यांना नेमकी बाब मूळ अर्जाच्या संदर्भात १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावी लागेल. त्यानंतर पुढील १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली मूळ अर्जाच्या संदर्भातील उर्वरीत माहिती पुरवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०७-०६-२०११**

------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वि. गो. जोशी, व्दारा, करंजीकर निवास, भगवान वाघमारेंच्या बाजूस, गणपती चौक, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास शाखा (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने, : अपीलकर्ता
प्रतापनगर, नादखेडा रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, परभणी<br>- श्री. पुंडलीक जयराम जोपळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी - श्री. किशोर वसंतराव मसने | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सदरचे व्दितीय अपील आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार विहित मुदतीत दाखल केलेले नाही. ते ११५ दिवसाच्या विलंबाने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहे. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलाच्या

विलंबाकरिता कारणे अपिलार्थी यांनी दिल्याचे दिसून येत नाही. याकरिता दाखल स्तरावर अपील खारीज करण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने, प्रतापनगर, नादखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोरताटे आप्पाराव भिमराव (वाडीकर), रा.परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय,परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य, उच्च आणि तंत्रशिक्षण,पुणे | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय,परभणी - डॉ. सुनंदा गो.रोडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे-१ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०८.०९.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये शासकीय अध्यापक

महाविद्यालय,परभणी येथील विविध विषयावरील एकत्रित १९ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. यावर जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय,परभणी यांनी दि. २९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे की, माहिती कोणत्या विभागाची मागितली आहे याचा बोध होत नाही. ते कळविण्यात यावे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, बहुतांश माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची मागितली आहे. जी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मधील 'माहिती' च्या व्याख्येत येत नाही. त्याचप्रमाणे एकंदर १९ मुद्यांवर विविध विषयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. इतक्या मोठया प्रमाणावर माहिती मागणे हे सुध्दा माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदीनुसार व्यवहार्य ठरत नाही. कारण की यामध्ये उद्दिष्ट साध्य होत नाही. शासकीय यंत्रणेला मोठया प्रमाणावर मनुष्यबळ तसेच साधनसामग्री वळवावी लागणार आहे,जे कलम ७(९) अन्वये अभिप्रेत नाही. याकरिता अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करुन आवश्यक असलेल्या माहितीसंबंधीचे नेमके काही मुद्दे जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागतील. तदनंतर पुढील एक महिन्याचे आत जन माहिती अधिकारी यांना त्या अनुषंगाने अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून काही मुद्यांबाबत नेमके कळविण्यात आल्यास अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन त्यासंदर्भातील माहिती तदनंतर एक महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोरताटे आप्पाराव भिमराव (वाडीकर),द्वारा- कार्यालय, समाजवादी जन

परिषद,राजनगर पाटी, काद्राबाद प्लॉट, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी.एल.भायेकर, : अपीलकर्ता
रा.पूर्णा, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
पूर्णा पाटबंधारे विभाग,वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बी.एल.भायेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली - श्री. एस.एस.लाठकर, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या दि. २९.०१.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये दि. ०१.०८.२००८ ते जन माहिती

अधिकारी यांनी माहिती देण्याच्या तारखेपर्यंत अशी एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी काही माहिती मिळाली आहे. तथापि त्यांना खालीलप्रमाणे माहिती अप्राप्त आहे.

मुद्दा क्र. १ : ज्यामध्ये त्यांनी स्वतःच्या प्रस्तावित चौकशीच्या अहवालाची व त्यापृष्ठयर्थ सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती अशी माहिती मागितली आहे.

मुद्दा क्र. ४ : मधील गोपनीय जावक रजिस्टरची प्रत आवश्यक आहे.

मुद्दा क्र. ६ : यामधील पत्रव्यवहार त्यांना प्राप्त झाला आहे. तथापि दि. २४.११.२००९ रोजी कार्यकारी अभियंता यांना सहायक माहिती अधिकारी यांना लिहिलेल्या पत्राची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की,अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती उपलब्ध आहे, ती ते देऊ शकतात. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती द्यावी, असे आयोगाने सूचित केले. या माहितीची अपिलार्थीस पाहणी करावी लागेल व त्यांना काही अपूर्ण माहिती आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना त्यासंदर्भात अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील माहिती- गोपनीय जावक रजिस्टरची प्रत व मुद्दा क्र.६ च्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राची प्रत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.४ व ६ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.त्याचप्रमाणे मुद्दा क्र.१ संदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून काही संदर्भ प्राप्त झाल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. एल.भायेकर, यशोदिप, न्यु आदर्श कॉलनी, पूर्णा, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार (महसूल),विभागीय आयुक्त
कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर विभागीय आयुक्त,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (महसूल),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद - श्री. आर.एल.सिंगारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. आर.एम.साळोक, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांचा दि. २० मे, २०१० रोजीचा द्वितीय अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०५.२०१० रोजी विहित मुदतीपेक्षा विलंबाने प्राप्त झाला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये अपिलार्थीस विहित मुदतीत द्वितीय अपील सादर करणे आवश्यक होते. विलंबाकरिता समर्थनीय कारण सादर केलेले नाही. म्हणून अपिलार्थी यांचे अपील फेटाळण्यायोग्य आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दि. १६.०९.२००९ रोजी अपिलार्थीचा अर्ज पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस वेळोवेळी त्यांनी मागितलेल्या माहितीबाबतची सद्यस्थिती कळविण्यात आली आहे, असे आढळून येत आहे. जसे निवासी उपजिल्हाधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांनी दि. १९.०९.२००९,३०.०९.२००९ व दि. २१.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहितीसंदर्भात प्रतिसाद दिला आहे. तसेच २८.०१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांनी त्यांच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून प्राप्त झालेले दि. ०७.०१.२०१० रोजीचे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत आहे. यावरुन अपिलार्थीस प्रकरणाची सद्यस्थिती अवगत झाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हिरासिंग गुलाबसिंग चंदेल,निशांत,वैभवनगर,जिंतूर रोड,परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तम ज्ञानोबा फड, : अपीलकर्ता
रा.गंगाखेड,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
प्रेरणा प्राथमिक विद्यालय,गंगाखेड,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०२.२०१० रोजीच्या प्रथम

अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम ज्ञानोबा फड,चंदन निवास,भंडारी कॉलनी, गंगाखेड,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,प्रेरणा प्राथमिक विद्यालय, गंगाखेड, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा. डिग्रस, ता.पालम, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
बळीराजा शिक्षण संस्था,
सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी, :
बळीराजा शिक्षण संस्था,
सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, बळीराजा शिक्षण संस्था,सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | सचिव, बळीराजा शिक्षण संस्था,सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी - श्री. सं.गो.येलमोटे | : | उपस्थित |
| ३.४ | अध्यक्ष, बळीराजा शिक्षण संस्था,सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी - श्री. आबासाहेब दत्तरावजी पवार | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.६ | संस्थेचे वकील - ॲड.सी.के. शिंदे व ॲड. जायगुडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सचिव व अध्यक्ष, बळीराजा शिक्षण संस्था,सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी उपस्थित आहेत. बळीराजा शिक्षण संस्था,सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी या संस्थेतर्फे वकील श्री. सी.के.शिंदे व श्री. जायगुडे यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, संत मोतीराम महाराज, शिक्षण संस्था, वडगाव सुक्रे या शाळेचे बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर ता.पालम यांच्याकडे व्यवस्थापनाचे हस्तांतरण झाले आहे. या हस्तांतरणास शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांच्याकडून रितसर मान्यता प्राप्त झाली आहे. व्यवस्थापनाच्या हस्तांतरणाच्या वेळी जी कागदपत्रे हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करताना तयार होतात, ज्यांना हस्तांतरण कागदपत्रे म्हणता येऊ शकेल, अशी कागदपत्रे अपिलार्थी त्यांच्या दि. १५.०१.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागत आहेत. तथापि या अर्जावर अपिलार्थी यांची स्वाक्षरी नाही. त्यासंदर्भात संस्थेकडून दि. १०.०२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी स्वतः येऊन माहिती घेऊन जावी, असे कळविले आहे. यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. पुढे त्यांनी असेही आयोगास अवगत केले की, त्यांनी प्रथम अपील दाखल केले ज्यावर अर्जदाराची स्वाक्षरी दिसून येत नाही.याबाबत अपिलार्थीस संस्थेतर्फे दि. १०.०४.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. दि. २४.०४.२०१० रोजी संस्थेने पुन्हा अपिलार्थीस कळविले आहे की, दि. १०.०५.२०१० रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयात येऊन कागदपत्रांची पूर्तता करावी म्हणजे योग्य ती कार्यवाही करणे सोयीचे होईल अन्यथा मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य नाही असे गृहित धरण्यात येईल.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये माहिती दिली नाही, असे नमूद केले आहे. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्याकरिता संस्था प्रयत्नशील होती, असे आढळून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता एक शेवटची संधी द्यावी. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती देण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यासाठी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालद्वारे कळवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक/सचिव, बळीराजा शिक्षण संस्था,सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, अध्यक्ष, बळीराजा शिक्षण संस्था,सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शंकरराव रामराव गरुड,<br>रा.पिंगळी, ता.जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत. त्यांनी त्यांच्या दि. २४.०५.२०११ रोजीच्या पत्राद्वारे उपस्थित राहता येणार नाही, असे कळविले आहे. संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाही. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना घ्यावा लागेल व त्यांचेविरुध्द योग्य कार्यवाही करावी लागेल.

अपिलार्थी यांनी दि. २६.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मु.पो.पिंगळी, ता. जि.परभणी या गावातील शेततळयाचे काम व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीच्या कामाची संचिका पाहणीकरिता मागितली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे अथवा माहितीचे अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,श्रेणी-१,पंचायत समिती,परभणी यांना विशेष बाब म्हणून त्यांच्या कार्यालयात अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे अभिलेखे अपिलार्थी व त्यांच्या सहकाऱ्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील.यासाठी एक दिवस सुनिश्चित करुन द्यावा व याबाबत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य कळवावे लागेल.

प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आतापर्यंत माहिती पुरविलेली नाही तसेच आयोगासमोर सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अटी व नियमांचे पालन करण्यात कसूर केला आहे, असे आयोगास आढळून येत आहे. याद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २०(१) अन्वये ₹ २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत,असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना तामिल होईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना पहावे लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,श्रेणी-१ यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहितीचे अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व याबाबत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य कळवावे. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी यांनी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थितीबद्दलचा खुलासा घेऊन यथायोग्य कार्यवाही करावी.

३) तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ₹ २५,०००/-शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर तत्कालीन सहायक

अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तामिल करावयाची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी यांची राहील.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शंकरराव रामराव गरुड,रा.मु.पो.पिंगळी, ता.जि.परभणी इ ४३१ ०२

२. जन माहिती अधिकारी,पंचायत समिती, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गंगाधरराव रामभाऊ दहिवाळ, : अपीलकर्ता
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर अभियंता,
बांधकाम विभाग, नगर परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -<br>१) नगर अभियंता, नगर परिषद, परभणी - श्री. आर.के.पवार<br>२) नगररचनाकार, नगर परिषद, परभणी - श्री. वळसे पी.आर. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी - श्री. डी.डी. पुजारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २९.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी दोन मुद्यांद्वारे (मुद्दा क्र.२ व ३)अपिलार्थीने स्पष्टीकरण तसेच भविष्यकाळाशी संबंधित माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. ही माहिती नगर अभियंता यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे व त्याबाबत दि. ११.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. मुद्दा क्र.१ ची माहिती नगर रचना कार्यालयाशी संबंधित आहे. ती अद्याप द्यावयाची आहे. या बाबी विचारात घेता मुद्दा क्र. १ मध्ये ज्या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत माहिती मागितली आहे. त्याचा विकास आराखडा व मंजूर ले-आऊटची प्रत द्यावी लागेल व त्याचप्रमाणे त्यांना रस्त्याच्या रुंदीमध्ये काही बदल झाला असल्यास, नगर पालिकेच्या अथवा शासनाच्या मंजूरीचे आदेश द्यावे लागतील, असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीस माहिती पाठविण्यास विलंब झाला आहे, ही बाब संबंधितांनी लक्षात घ्यावी व भविष्यात माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाचा वेळीच निपटारा करण्याबाबत सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेल्या माहितीतील अद्याप द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना या कायद्याचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाधरराव रामभाऊ दहिवाळ, ऑडीटनगर,पाथरी रोडचे बाजूला,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, परभणी  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, नगर परिषद, परभणी  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुलाम अहमद पिता गुलाम मुर्तजा, : अपीलकर्ता
रा. पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला,वालूर,ता.सेलू,
जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गुलाम अहमद पिता गुलाम मुर्तजा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, जिल्हा परिषद,प्रशाला,वालूर,ता.सेलू, जि.परभणी - श्री. आर.आर.वाचाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी - प्रतिनिधी - श्री. डी.एल.निलपत्तेवार, शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.परभणी श्री. आठवले अनुपस्थित आहेत. त्यांनी या प्रकरणी वैयक्तिक लक्ष पुरविणे आयोगास आवश्यक वाटत आहे. याकरिता अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहिती पैकी त्यांना कोणती माहिती देण्यात आली व कोणती देय होत आहे व देय होत असलेली माहिती कोठून प्राप्त होऊ शकेल, याची पाहणी करुन संपूर्ण माहितीनिशी (statement of facts) जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम अहमद पिता गुलाम मुर्तजा,रा.आखाडा मोहल्ला,मेनरोड पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला,वालूर,ता.सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बालाजी किशनराव शिंदे,<br>रा.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालाजी किशनराव शिंदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्या,महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड, जि.नांदेड- डॉ. निर्मला एस.कोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर - प्रतिनिधी - श्री. शेख एन.आय., सहा. शिक्षण संचालक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांच्या दि. १२.११.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती मिळालेली आहे. तथापि ती

अपुरी आहे. ती खालीलप्रमाणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे भाष्य व आयोगाचे आदेश नमूद करण्यात येत आहेत.

४) मुद्दा क्र.१: शिक्षणाधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयामार्फत म.ज्योतिबा फुले महाविद्यालय यांच्याकडे त्यांच्या दोन प्राध्यापकांना जांब बू.येथे तपासणीसाठी पाठविण्याकरिता दिलेल्या पत्राची/आदेशाची प्रत मागितली आहे, ती अप्राप्त आहे.

- जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, असे लेखी आदेश किंवा पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. तथापि तोंडी आदेशान्वये कार्यवाही करण्यात आली - ही बाब जन माहिती अधिकारी यांना पुन्हा एकदा अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावी लागेल.

५) मुद्दा क्र.२: उपरोक्त दोन प्राध्यापकांच्या रजेच्या अर्जाची प्रत अप्राप्त आहे.

- याबाबत जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे खुलासा केला की, तोंडी आदेशान्वये कार्यवाही केल्यामुळे संबंधितांचे रजेचे अर्ज नाहीत.

६) मुद्दा क्र. ३: संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी ज्या मस्टरवर घेतात, त्याची साक्षांकित प्रत.

- याबाबत जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती अवगत केली की, संबंधित प्राध्यापक कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर मस्टरवर स्वाक्षरी केल्यानंतर तोंडी आदेशान्वये कार्यवाही केलेली आहे.

या सर्व बाबी पाहता,जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ संदर्भात वस्तुस्थिती कळवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ संदर्भात माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी किशनराव शिंदे, आर्यवृत्त कॉलनी, प्लॉट नं. १५, जिंतूर रोड, परभणी ३ ४३१४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या,म.ज्योतीबा फुले महाविद्यालय,मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. खाडे किसनप्रसाद धोंडिबा,<br>रा. चारठाणा, ता.जिंतूर,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,सेलू,जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,सेलू,जि.परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, सेलू,जि.परभणी - श्री. सतीश सोनी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा दि.०२.१२.२००९ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज नायब तहसीलदार,सेलू यांना उद्देशून पाठविला असल्याकारणाने तहसीलदार यांच्याकडे प्राप्त झाला नाही. तहसीलदार हे जन माहिती अधिकारी आहेत. अपिलार्थी यांनी तहसीलदार,सेलू, जि.परभणी

यांच्याकडे दि. २३.०३.२०१० रोजी प्रथम अपील पाठविले. त्यावेळी त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही, असे आढळले आहे. त्यांनी प्रथम अपिलाच्या संदर्भात अपिलार्थीस दि. ३०.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही त्यामुळे माहिती देता आली नाही त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सन २००७-२००८ व २००९ ते २०१० या कालावधीची आहे व विस्तृत असल्याकारणाने अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीचे नेमके वर्णन करावे, म्हणजे माहिती देणे सुलभ होईल, असे कळविले आहे. त्यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. पुढे जन माहिती अधिकारी यांनी असेही अवगत केले की, अपिलार्थीस द्यावयाची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस देऊ शकतात. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खाडे किसनप्रसाद धोंडिबा,रा. चारठाणा, ता.जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपीलकर्ता
बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. मो. मुमताज अली, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी - प्रतिनिधी - श्री. रंधे के. एस., सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सन १९९४ मध्ये बसविण्यात आलेल्या रोहित्राबाबत त्याचप्रमाणे ६८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या संदर्भात बसविण्यात आलेल्या रोहित्राबाबत एकूण ११ मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीचा शोध त्यांच्या कार्यालयात घेण्यात येत आहे व त्याकरिता कालावधी लागेल ही बाब अपिलार्थीस दिनांक २६-०२-२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे. माहिती उपलब्ध होताच दिनांक २६ मे २०११ च्या पत्रान्वये अपिलार्थीस ११ मुद्दयाची माहिती पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन असे दिसून येते की, त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या माहिती या शब्दाच्या व्याख्येमध्ये प्रश्नार्थक खुलासे, स्पष्टीकरणात्मक माहिती येत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केलेला आहे. अपिलार्थीस प्राप्त झ ाालेल्या माहितीची पाहणी अपिलार्थी यांनी करावी व त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपैकी काही अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यास तसे जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत कळवावे लागेल. पुढील १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलाथीस त्यांच्या माहिती अर्जाच्या संदर्भात देय असलेली माहिती पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांडुरंग वामनराव सुर्यवंशी, : अपीलकर्ता
मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पांडुरंग वामनराव सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी - श्री. देशमुख जयराज सदाशिव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी<br>- डॉ. प्रताप काळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहिती अर्जान्वये गट नंबर ७२४ मौजे कौसडी येथील गायरान जमिनीमधील गौण खनिजाबाबत एकूण सहा मुद्दयावर प्रश्नार्थक माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती ही माहिती या शब्दाच्या व्याख्येत येत नाही. अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक ३ मधील ज्या वेळेपासून गौण खनिज काढणे चालू झालेले आहे त्या वेळेपासून आजपर्यंत किती ब्रास दगड विक्री केला अशी माहिती शोध घेऊनही सापडली नाही. आज रोजी त्यांच्याकडे ग्राहकाची यादी व गौण खनिज उचलले आहे याची यादी उपलब्ध आहे. शासनाच्या खजिन्यामध्ये जमा झालेल्या व उपलब्ध झालेल्या चलनाच्या प्रती उपलब्ध आहेत त्या अपिलार्थीस देऊ शकतात.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही व त्यांनी एकूण सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली सहा मुद्दयावरील माहितीमध्ये त्यांना काय अपेक्षित आहे ही बाब सुनावणीच्या वेळी ठरविण्यात आली आहे. त्यानुसार सहा मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे आज उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात येत आहे. अपिलार्थीने ती स्विकारली आहे. अपिलार्थी यांनी मिळालेल्या माहितीची पाहणी करावी व त्यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी-च्या मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग वामनराव सुर्यवंशी, मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गायकवाड छगन यादवराव, : अपीलकर्ता
जायकवाडी वसाहत, मु. पो. पिंगळी, तालुका जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गायकवाड छगन यादवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी - श्री. दराडे आर. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी - श्री. खोरगडे एच. एम. | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी - श्री. डावरे आर. जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी येथील शासकीय गाळयाच्या संदर्भात काही माहिती मागितली आहे व ती अपिलार्थीशी संबंधित आहे. अपिलार्थीच्या या अर्जावर दिनांक १२-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी यांनी माहितीचे शुल्क कार्यालयात भरण्यात यावे म्हणजे माहिती देता येईल असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक २२-०३-२०१० रोजी रुपये ७६ इतक्या शुल्काचा भरणा केल्याचे दिसून येत आहे व त्या अनुषंगाने दिनांक २२-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांना गाळा वाटपाबाबत प्रशासकीय अडचणी आहे असे दिसून येते याकरिता त्यांना स्वतंत्रपणे सक्षम अधिका-याकडे पत्रव्यवहार करावा लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गायकवाड छगन यादवराव, जायकवाडी वसाहत, मु. पो. पिंगळी, तालुका जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स्वामी भुजय्याप्पा बापुराव, : अपीलकर्ता
जायकवाडी वसाहत, निवास क्रमांक ५०, तालुका पालम, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सदस्य सचिव, जात पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, सिडको बसस्टँण्डसमोर, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, सिडको बसस्टँण्डसमोर, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये त्यांच्या स्वतःच्या जाती दावा सेवा प्रकरण संबंधात कागदपत्रे मागितली आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी व्दितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०६-२०११ चे पत्र आयोगास दिले आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, जात पडताळणी समिती क्रमांक १, विभाग औरंगाबाद यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील ते मागे घेत आहेत व अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स्वामी भुजय्याप्पा बापुराव, जायकवाडी वसाहत, निवास क्रमांक ५०, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, सिडको बसस्टँण्डसमोर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कदम गिरीश विठ्ठलराव, : अपीलकर्ता
मु. पो. पूर्णा (गणपती मंदिराजवळ), तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कदम गिरीश विठ्ठलराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. एस. आर. चिबडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. कैलासचंद्र वाघमारे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती प्राप्त झाली आहे परंतु ती अपूर्ण आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१. पूर्णा गॅस एजन्सीकडे गॅस सिलेंडरचे भरुन आलेल्या ट्रकचे नंबर, ड्रायव्हरचे नाव व सिलेंडर संख्या.

२. सदर कालावधीमध्ये किती गॅसधारकांनी वितरणासाठी नंबर लावले त्याची यादी.

३. मुद्दा क्रमांक ६ मधील गॅस ग्राहकांने केलेल्या तक्रारी अर्जाच्या प्रती.

४. मुद्दा क्रमांक ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राहकांचा आपघाती विमा काढणे बंधनकारक आहे किंवा कसे याबाबत शासन निर्णयाची प्रत.

५. मुद्दा क्रमांक ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे देण्यात आलेल्या पावत्याच्या छायांकीत प्रती.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी तसेच तहसीलदार, पूर्णा यांनी ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास नोंदणीकृत टपालाने एक महिन्याच्या आत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. उपलब्ध नसल्यास भारत सरकारच्या ज्या उपक्रमाकडे ही माहिती उपलब्ध होऊ शकते त्यांचा पत्ता व नाव इत्यादी तपशील अपिलार्थीस द्यावा म्हणजे अपिलार्थी त्यांच्याकडे अर्ज करु शकतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०६-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कदम गिरीश विठ्ठलराव, मु. पो. पूर्णा (गणपती मंदिराजवळ), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख शकील अहेमद शेख रहिम, : अपीलकर्ता
मीलन सायकल स्टोअर्स, अष्टभूजा देवीसमोर, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, त्यांना माहिती मिळाली आहे. तथापि ही माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी आहे असे मोघमपणे अपिलार्थीने नमूद केले आहे. अपिलार्थी यांना

नेमकी कोणती माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी मिळाली ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात प्रश्नार्थक, खुलासेवजा व स्पष्टीकरणात्मक माहिती वगळून उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख शकील अहेमद शेख रहिम, मीलन सायकल स्टोअर्स, अष्टभूजा देवीसमोर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानोबा बाबाराव पवार, : अपीलकर्ता
यादव निवास, कडबी मंडी रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. एस. आर. चिबडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. कैलासचंद्र वाघमारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये मौजे वझूर तालुका पूर्णा येथील स्वस्त धान्य व

केरोसीन दुकानाबाबत जानेवारी २००७ ते नोव्हेंबर २००९ या कालावधीतील प्रत्येक महिन्यात किती धान्य व केरोसीन देण्यात आले इत्यादीबाबतची विस्तृत चार मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येणा-या माहितीपोटी रुपये १५६०० इतक्या रकमेचा भरणा कार्यालयात करावा असे अपिलार्थीस दिनांक १५-१२-२००९ रोजी कळविले आहे. त्यामध्ये एकूण पृष्ठांची संख्या, पोस्टेज इत्यादी दर्शवून शुल्क कोणत्या लेखाशीर्षाखाली भरणा करावे याचा तपशीलही अपिलार्थीस कळविलेला आहे. अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १४-०१-२०१० च्या प्रथम अपिलावर दिनांक २२-०३-२०१० रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. यावरील दिनांक २३-०३-२०१० रोजीच्या निर्णयामध्ये या बाबी नमूद केलेल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा यांनी विहित मुदतीत शुल्काचा भरणा करण्याकरिता अपिलार्थीस कळविले असल्याकारणाने व अपिलार्थीने प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीचे अपील अमान्य केले आहे व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीने शुल्क भरणा केल्यानंतर देण्यात यावी असा निर्णय घेतला आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची काही आवश्यकता नाही असे आयोगास आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानोबा बाबाराव पवार, यादव निवास, कडबी मंडी रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. माणिकराव माधवराव मुलगीर,<br>व्दारा, बी-५, पोलीस मुख्यालय वसाहत, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माणिकराव माधवराव मुलगीर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी दिनांक ०८-०१-२०१० च्या अर्जान्वये समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी यांच्या कार्यालयातील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ अंतर्गत एक ते सतरा मुद्दयांची माहिती मागितली आहे. ती

अद्यापपावेतो त्यांना मिळाली नाही. त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली तथापि निर्णयाची प्रत त्यांना देण्यात आलेली नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०८-०१-२०१० रोजीच्या माहिती अर्जावर समाजकल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०१-२०१० च्या पत्राने कळविले की, मागितलेल्या माहितीचे संकलित करण्याचे काम चालू आहे व सदरची माहिती परीपूर्ण करण्यास विलंब होणार आहे तरी माहिती पूर्ण होताच कळविण्यात येईल. त्याप्रमाणे दिनांक २५-०१-२०१० च्या पत्राने अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी देय माहिती आहे त्याकरिता रुपये ४२ चा भरणा कार्यालयात केल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले असून प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती अनुज्ञेय नाही तसेच आपणास कोणते शासन निर्णय, निर्देश, परिपत्रक, नियम व राजपत्र याची माहिती हवी याचा बोध होत नाही त्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा असे कळविले. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही या सर्व बाबी विचारात घेता तसेच अपिलार्थीने विस्तृत माहिती मागितलेली असल्याकारणाने जन माहिती अधिकारी, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी दोन दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. जन माहिती अधिकारी या आदेशाची पुर्तता करतील ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना पहावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी दोन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. जन माहिती अधिकारी या आदेशाची पुर्तता करतील ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी पहावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माणिकराव माधवराव मुलगीर, व्दारा, बी-५, पोलीस मुख्यालय वसाहत, परभणी.

२. जन माहिती अधिकारी, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बशीर अहेमद खान अ. रहेमान खा. तडवी, : अपीलकर्ता

जुना सिंधखाना, आंबेगाव नाका, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी - डॉ. प्रताप काळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, परभणी - श्री. बी. बी. चव्हाण | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०९-१०-२००९ च्या अर्जान्वये जातीची प्रमाणपत्रे, हद्दपारीच्या केसेस, अकृषिक धारासंबंधी तसेच विविध संचिकेच्या नकला मिळण्याबाबत अशी माहिती सन २००० पासून ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत एकूण ५३

मुद्दयावर मागितली आहे. या माहितीची व्याप्ती इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की, त्याचा अंदाज घेतला असता केवळ जातीच्या प्रमाणपत्राच्या ४९१९० संचिका होतात व त्या प्रमाणात दुस-या विषयाबाबत संचिका अंदाजे असू शकतात. एवढ्या मोठ्या संचिका संकलित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ व साधनसामग्रीचा वापर करावा लागेल. ही माहिती संकलीत करणे सुध्दा अशक्य बाब आहे. एका महिन्यात उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. याकरिता कार्यालयीन कामकाज काही दिवस बंद करावे लागेल ही बाब विचारात घेऊन जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन दिनांक ३१ मार्च २०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस संपूर्ण माहितीची पाहणी द्यावी. त्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक १४-०४-२०१० रोजी कार्यालयात उपस्थित राहून मागितलेल्या माहितीची पाहणी करावी असे कळविले आहे. अपिलार्थी दिनांक २९-०४-२०१० रोजी कार्यालयात उपस्थित होते. त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी उपलब्ध आहे ती पाहणीकरिता उपलब्ध करुन दिली तथापि अपिलार्थी यांनी ५३ मुद्दयांच्या माहितीच्या प्रती पाहिजेत अशी मागणी केली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू तसेच जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी अपिलार्थी यांनी अव्यवहार्य, प्रचंड व्याप्तीची अशी माहिती मागितली असताना सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे व अभिलेखे पाहणीकरिता उपलब्ध करुन दिलेली आहेत. अपिलार्थी यांनी एकूण ५३ मुद्यांवर माहिती मागितली आहे. यापैकी साधारणत: सात मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांची वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वैयक्तिक माहिती देय होणार नाही कारण यामध्ये व्यापक जनहित काही दिसून येत नाही. या अर्जाव्दारे मागणी केलेल्या विविध माहितीशी संबंधित कालावधी हा सन २००० ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत म्हणजे दिनांक ०९-१०-२००९ म्हणजे सुमारे दहा वर्षे फार मोठा असा असल्याचे दिसून येत आहे. या माहितीतील माहितीची प्रचंड व्याप्ती विचारात घेता, हा माहितीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मागील मूळ भूमिकेशी तसेच त्यातील उद्दिष्टांशी सुसंगत नाही, असे दिसून येते. अशा माहिती अर्जांमुळे माहिती मागण्याचा उद्देश कसा सफल होईल, हाही प्रश्न उपस्थित होतो. या कायद्यान्वये नागरिकांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता एक व्यवहार्य शासन प्रणाली अंमलात आणावी, असे अभिप्रेत आहे. अशाप्रकारे माहिती मागणे की, ज्यामधून शासकीय यंत्रणेचे मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागणे, हे अपेक्षित नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही व गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे. प्रसंगी असे माहितीसाठीचे अर्ज केंद्रीय माहिती आयोगाने फेटाळले आहेत. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जास्तीत जास्त माहिती पाहणीसाठी उपलब्ध करुन प्रतिसाद दिलेला दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता प्रस्तुत द्वितीय अपील आयोगाच्या स्तरावर फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०६-२०११**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बशीर अहेमद खान अ. रहेमान खा. तडवी, जुना सिंधखाना, आंबेगाव नाका, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तात्रय हरिभाऊ लोखंडे, : अपीलकर्ता
मु. पो. बोरी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी - श्री. देशमुख जयराज सदाशिव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी - डॉ. प्रताप काळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सर्व्हे नंबर ४०, गट नंबर ८६ मध्ये मौजे मूडा वसले त्या जमिनीच्या अवॉर्डची नक्कल मागितली

आहे व मौजे मूडा गावठाण विस्तार, पुनर्वसन किंवा अतिक्रमणा- आधारे वसले अशी माहिती मागितली आहे. तथापि अशी माहिती त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध झालेली नाही व ही बाब दिनांक ०६-०३-२०१० रोजी अपिलार्थीस कळविलेली आहे. उप विभागीय अधिकारी, सेलू यांच्याकडून पूरक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यामुळे माहिती पुरविणे शक्य होईल तथापि अशी माहिती मिळाली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध नसल्याने कोणत्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल याबाबत विचार करणे आवश्यक ठरत आहे. जसे जिल्हा पुनर्वसन अधिकारी, भूसंपादन अधिकारी, उप विभागीय अधिकारी (गावठाण विस्तार). त्याप्रमाणे जुन्या ७/१२ वरुन काही माहिती मिळू शकेल काय ही बाबही पाहणे योग्य ठरेल. तसेच अपिलार्थीकडून माहितीच्या संदर्भात नेमके वर्ष, संपादन इत्यादी अनुषंगिक माहिती, जसे बाजूच्या जमिनीचा तपशील, त्याचे संपादन झाले आहे काय, रुमाला जमिनीची तलाठ्याने केलेली नोंदवही त्यामध्ये शोध घेणे योग्य राहील. त्याप्रमाणे सर्वांचा शोध करुन अपिलार्थीस माहिती विनामूल्य देण्यात यावी व माहिती उपलब्ध न झाल्यास तसे कळवावे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय हरिभाऊ लोखंडे, मु. पो. बोरी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी,<br>रा.सेलू, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>महावितरण कंपनी कार्यालय,सेलू,जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी,<br>महावितरण कंपनी जिल्हा कार्यालय,परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता, महावितरण कंपनी कार्यालय,उपविभाग सेलू, जि.परभणी-प्रतिनिधी-श्री. डी. टी. चौधरी,वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,म.परभणी-प्रतिनिधी -श्री. के. एस.रंधे,सहा.अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती दि. ०२.०१.२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०३.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी सांगितले की, मुद्दा क्र. ४ व ५ ची माहिती अपूर्ण आहे. त्यानुसार दि. १३.०४.२०१० रोजी मुद्दा क्र. ४ ची माहिती (६२ पृष्ठे) व मुद्दा क्र. ५ ची माहिती (७३ पृष्ठे) देण्यात आलेली आहेत.अपिलार्थी यांनी याबाबतची पोच दिली आहे. आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि वीज चोरी बाबत कार्यवाहीचा तपशिल, पंचनामा, मिटर तपासणी अहवाल याबाबतची माहिती त्यांना दि. १३.०४.२०१० रोजी अपूर्ण मिळाली, असे त्यांच्या द्वितीय अपिलात नमूद केल्याचे दिसून येत आहे.

वरील बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांना मागितलेली माहिती व त्यांना देण्यात आलेली माहिती याची पुन्हा एकदा छाननी करावी व काही माहिती द्यावयाची राहिली असल्यास ती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती द्यावयाची राहिली असल्यास ती माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी, बालाजी पान सेंटर, बस स्टॅण्डसमोर,सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण कंपनी कार्यालय,उपविभाग सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी,म.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाजीराव सत्यनारायण शेंद्रे, : अपीलकर्ता
रा.भारस्वाडा,ता.जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
समाजकल्याण अपंग विभाग,
जिल्हा परिषद,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
समाजकल्याण अधिकारी,
गट-अ,जिल्हा परिषद,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाजीराव सत्यनारायण शेंद्रे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद, परभणी - श्री. एस.ई.गोडगोडवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - समाज कल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, परभणी - श्री. यु.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला नाही, असे

दिसून येत आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये परभणी जिल्हयातील अनुदानीत व विनाअनुदानीत सर्व प्रवर्गाच्या अपंग शाळांसंदर्भात व्यापक माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,गट-अ जिल्हा परिषद,परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील त्यांना देय होत असलेली माहिती अपिलार्थीस देण्याबाबत सुस्पष्ट निर्णय घेणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाजीराव सत्यनारायण शेंद्रे,मु. पो. भारस्वाडा, ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भगवानदास शिवप्रसाद मुंददा, : अपीलकर्ता
रा.पूर्णा,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,वसमत,जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,वसमत,जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १४.०६.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे की, नेमकी कोणती माहिती अपूरी/चुकीची आहे, याबाबत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) यांना कळवावे. तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन

जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भगवानदास शिवप्रसाद मुंदडा,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वसमतनगर,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एस.जी.नाईकनवरे, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, नगर परिषद, परभणी - श्रीमती जे. के. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी,नगर परिषद,परभणी - प्रतिनिधी - श्री. मुजीबखान, उपमुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे नगर परिषदेतील शिक्षण विभागातील सर्व कार्यरत शिक्षकांबाबत दोन मुद्यांवर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि. १०.०६.२०१० रोजी अधिनियमातील कलम ७(१)नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे असे नमूद केल्याचे दिसून येत आहे. याबाबत आयोगाने पृच्छा केली असता, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, मुद्दा क्र. १ संदर्भात अपिलार्थीने शिक्षकांची नियुक्ती कोणत्या प्रवर्गातून केली आहे, त्यांचे प्रमाणपत्र व प्रथम नेमणुक दिनांक याविषयी माहिती मागितली असून या सर्व शिक्षकांच्या नियुक्त्या जिल्हा परिषदेमार्फत झालेल्या आहेत व त्यानंतर त्यांना नगर परिषदेकडे वर्ग करण्यात आले आहे त्यामुळे त्यांची नेमणूक कोणत्या प्रवर्गात झाली, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ संदर्भात अस्थायी शिक्षकांचे प्रथम नेमणूक दिनांक व नगरपरिषद मधून दिलेल्या वेतनाचा शिक्षकनिहाय तपशील अपिलार्थीस देण्यात आला आहे. आयोगापुढील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस.जी.नाईकनवरे, काद्राबाद प्लॉट, गुंडाळे भवनजवळ, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गंगाभिष्म कोंडिबा तुपसमिंद्रे, : अपीलकर्ता
विटा (खु.),ता.सोनपेठ,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,सोनपेठ,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय,सोनपेठ,जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. सी.डी.सरवदे, लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,सोनपेठ,जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी -श्री. प्रविण धरमकर,उपविभागीय अधिकारी, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सध्याचे जन अपिलीय अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व उपविभागीय अधिकारी, परभणी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०२.०१.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ

अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचा आवाका मोठा असल्याकारणाने माहिती देण्याकरिता आवश्यक खर्चाची मागणी करण्यात आली आहे, निधी प्राप्त होताच माहिती देण्यात येईल, असे दि. १३.०४.२०१० रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी, संगायो विभाग, तहसील कार्यालय, सोनपेठ यांनी कळविले आहे. त्याचप्रमाणे कार्यालयात समक्ष येऊन माहितीची पाहणी करु शकतात व त्याकरिता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असेही कळविले आहे. त्यावर अपिलार्थी यांचा प्रतिसाद दिसून येत नाही. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस संपूर्ण माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी, असा दि. ०४.०६.२०१० रोजी निर्णय दिला आहे. त्यानुसार दि. १५.०६.२०१० रोजी एकूण ८४ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन असे दिसून येत आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे, तथापि माहिती चुकीची व अपूर्ण दिली आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो) यांना पंधरा दिवसांच्या आत नेमकी कोणती चुकीची व अपूर्ण माहिती मिळाली आहे, याचा तपशील द्यावा लागेल. त्यावर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाभिष्म कोंडिबा तुपसमिंद्रे,विटा (खु.),ता.सोनपेठ,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय, सोनपेठ, जि.परभणी  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,सोनपेठ,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. स.जावेद स.वाजेद,<br>रा.कौसडी,ता.जिंतूर,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद,परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. स.जावेद स.वाजेद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी,जिल्हा परिषद (पंचायत विभाग),परभणी - श्री.डी.जी.देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद,परभणी-श्री.अशोक सिरसे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १७.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये, औरंगाबाद खंडपीठातर्फे द्वितीय अपील क्र. ६८९ या अपिलावर दि. २४.०६.२००९ रोजी दिलेल्या आदेशावर कोणती कार्यवाही केली, या बाबतची माहिती मागितली आहे. अपिलार्थीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) यांनी दि. ३०.०४.२०१० रोजी त्यावेळची स्थिती कळविलेली आहे.अपिलार्थी यांनी

त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आयोगाच्या संदर्भित आदेशामध्ये नमूद केलेल्या प्रत्येक बाबीवरील सद्यस्थिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कळवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर अपील या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आयोगाच्या संदर्भित आदेशामध्ये नमूद केलेल्या प्रत्येक बाबीवरील सद्यस्थिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य कळवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स.जावेद स.वाजेद, रा.कौसडी,ता.जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,जिल्हा परिषद (पंचायत विभाग),परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत नागनाथराव खिंडरे, : अपीलकर्ता
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप अवेक्षक, नगर परिषद, परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी-प्रतिनिधी - श्री. मुजीबखान, उपमुख्याधिकारी,न.प.परभणी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर

प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत नागनाथराव खिंडरे,रामकृष्णनगर, गणपती मंदिराजवळ, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपअवेक्षक (सब ओवरशीअर), नगर परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळाजी बाबासाहेब चौधरी, : अपीलकर्ता
रा.जैन्दीपुरा,ता.गंगाखेड,जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,नगर परिषद,गंगाखेड, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,नगर परिषद,गंगाखेड, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लिपीक, बांधकाम विभाग,नगरपरिषद, परभणी - श्री.संभाजी साळवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड,जि.परभणी-प्रतिनिधी -श्री. एस.एम.काळे उपमुख्याधिकारी, नगर परिषद,गंगाखेड, जि. परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २८.०६.२०१० (फेरसादर,१५.०७.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी नगरपरिषद हद्दीतील अनधिकृत भूखंडावर बांधकाम

करता येते का व त्यासाठी कोणते सक्षम प्राधिकरण परवानगी देते, याचा खुलासा माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च)नुसार, मागितलेला खुलासा हा, माहितीच्या व्याख्येत येत नाही. तथापि अपिलार्थी यांना दि.०६.०६.२०११ रोजी उपस्थित केलेल्या दोन मुद्यांवर कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी या पत्राची पोच दिली आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळाजी बाबासाहेब चौधरी,रा.जैन्दीपुरा,ता.गंगाखेड,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, बांधकाम विभाग,नगरपरिषद,गंगाखेड,जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिगंबर साहेबराव देशमुख, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.(सं व सु.), परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी प्रविभाग,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.परभणी - प्रतिनिधी - श्री. मो.मुमताज अलि,कनिष्ठ अभियता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.परभणी - प्रतिनिधी - श्री.के.एस.रंधे, सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि.१६.०७.२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपुरी माहिती मिळाली आहे, असे नमूद केले आहे. उपरोक्त कागदपत्रांवरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्यासंदर्भातील माहिती मिळाली असून मुद्दा क्र.२ व ३ द्वारे मागितलेल्या पत्राच्या प्रती त्यांना मिळाल्याचे दिसून येत नाही. यावर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास खुलासा केला की,ही माहिती सन १९९९ सालची आहे व सदर पत्राच्या प्रती शोध घेऊनही त्यांना मिळाल्या नाहीत, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यासह अपिलार्थीने त्यांना मागितलेल्या माहितीतील संदर्भित दोन पत्रांचा पुन्हा एकदा कसोशीने शोध घ्यावा लागेल व शोध घेऊनही उपलब्ध न झाल्यास जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस स्पष्टपणे कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिगंबर साहेबराव देशमुख,सहकारनगर, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आंधळे महादेव कोंडिबा, : अपीलकर्ता
रा.कावी, ता.जिंतूर, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती,जिंतूर, जि.परभणी.
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कावी, ता.जिंतूर, जि.परभणी - श्री. एस.एम.मुंजे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जि. परभणी - प्रतिनिधी - श्री. एल. पी. जोशी, विस्तार अधिकारी (पं.) | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात सन

२००१ ते २००४ या कालावधीची मौ. कावी ता.जि.परभणी येथील घर क्र. ९९ बाबत फेरफाराबाबतच्या सत्यप्रती तसेच नमुना नंबर ८ ची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस दि. २५.०५.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांना या माहितीची पाहणी करावी लागेल.त्यांनी मागितलेल्या माहितीबाबत काही माहिती त्यांना अपूर्ण वाटत असल्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांचे आत कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांचे आत अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन अपिलार्थीस त्यासंदर्भातील माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना मिळालेल्या माहितीबाबत त्रूटी कळविल्यास त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील उर्वरित माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आंधळे महादेव कोंडिबा,रा.कावी, ता.जिंतूर, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, कावी, ता.जिंतूर, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर, : अपीलकर्ता
नेहरु रोड, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. बी. एल. भायेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली - श्री. गणेश वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. बी. एल. भायेकर व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये मौजे ब्रम्हवाडी, मौजे बोडखा, मौजे तांदळवाडी, मौजे आमदरी, मौजे

लिंबाळा तांडा, मौजे येलदरी, मौजे चिंचखेडा व मौजे चिखलासर येथील संपूर्ण जमिनीच्या ७/१२ उता-याची यादी, सर्व्हे नंबर, गट नंबर, मालकी क्षेत्र, शेतक-यांची नावे इत्यादी माहितीच्या छायांकीत प्रती मागितल्या आहेत. या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस दिनांक १८-०७-२०१० च्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाने ही माहिती पाठविली आहे. या माहितीमध्ये ३५९ पृष्ठांचा समावेश आहे. ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्यात आली आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये सर्व नागरिकांना दिलेल्या अधिकारानुसार माहिती मागताना अधिनियमाच्या प्रस्तावनेत दिलेली उद्दिष्टे साध्य होत आहे हे पाहणे गरजेचे आहे. एवढ्या मोठया प्रमाणावर माहिती मागवून ही उद्दिष्ट्ये साध्य होत नाहीत असे आयोगाचे मत आहे. तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस उर्वरीत माहिती बघावयाची असल्यास त्याकरिता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीसंदर्भातील उर्वरीत अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर, नेहरु रोड, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सतीश प्रभाकरराव दिवाण, : अपीलकर्ता

१ 'शिवप्रसाद', शिक्षण कॉलनी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी - प्रतिनिधी -श्री. एस. व्ही. वांबुरकर, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. पी. पी. वाकोडकर, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०७-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात प्रथमतः दिनांक १७-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १९-०७-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक ३ व ४ बाबत अवलंब केलेल्या प्रक्रियेबाबतची माहिती व तसेच मुद्दा क्रमांक ५ बाबत त्यांच्या स्तरावर केलेली कार्यवाही याबाबतची माहिती पंधरा दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०८-२०१० रोजी कळविले आहे. अपिलार्थीच्या व्दितीय अपिलानुसार त्यांना समाधानकारक माहिती मिळाली नाही असे दिसून येत आहे. त्यावर पर्याय असा आहे की, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. ही माहिती जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्या कार्यालयात आहे त्याबद्दल त्यांनाही अशीच प्रक्रिया जन माहिती अधिकारी क्रमांक २ म्हणून अवलंबावी लागेल असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी क्रमांक १ तथा उप विभागीय अधिकारी, सेलू, जिल्हा परभणी व जन माहिती अधिकारी क्रमांक २ तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया संबंधित जन माहिती अधिकारी क्रमांक १ व २ यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सतीश प्रभाकरराव दिवाण, १ 'शिवप्रसाद', शिक्षण कॉलनी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किरण रमेश स्वामी, : अपीलकर्ता

स्वामी इलेक्ट्रीक अँड वर्क्स, नगर परिषद समोर, सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. व्ही. बी. जज्जरवार, लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी - प्रतिनिधी - श्री. पी. पी. वाकोडकर, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की,अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती मिळाली आहे तथापि काही माहिती अप्राप्त आहे. या अप्राप्त माहितीच्या संदर्भात अपिलार्थी यांनी राज्य

माहिती आयोग खंडपीठ औरंगाबादकडे केलेल्या त्यांच्या दिनांक ०९-०८-२०१० च्या व्दितीय अपील अर्जान्वये कळविले आहे की, प्रकाश रमेश स्वामी जातीचे प्रमाणपत्राची प्रत अद्याप मिळालेली नाही.

सदरची कागदपत्रे त्यांना देता आली नाहीत कारण त्यांच्या कार्यालयात ती उपलब्ध नाहीत असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले. याकरिता या बाबीकडे जिल्हाधिकारी, परभणी यांचे लक्ष वेधण्यात येत असून त्यांनी या कागदपत्रांचा शोध घेण्याकरिता एक पथक (दोन कर्मचा-यांचे) नेमून माहिती शोधून काढण्यात यावी व माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस त्यांच्या प्रती विनामूल्य देण्यात याव्यात. माहिती प्राप्त झाली नाही तर तसेही अपिलार्थीस कळवावे लागेल. त्याचप्रमाणे याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी चौकशी करुन चौकशीत संबंधित कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कार्यवाही करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण रमेश स्वामी, स्वामी इलेक्ट्रीक अँड वर्क्स, नगर परिषद समोर, सोनपेठ, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. केशव नामदेव गिराम,<br>मु. पो. देऊळगाव दुधाटे, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा देऊळगाव दुधाटे, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा देऊळगाव दुधाटे, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी - श्री. ए. एम. गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना दिनांक २१-०४-२०१० रोजी तलाठी, सजा देऊळगाव (दु.), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांनी माहिती पाठविली आहे. या

माहितीची पाहणी अपिलार्थी यांनी करावी व त्यावर काही माहिती अपूर्ण आढळून आल्यास तसे तहसीलदार, पूर्णा यांना पत्र द्यावे व मूळ अर्जाच्या अनुषंगाने उर्वरीत माहिती तहसीलदार, पूर्णा यांना संबंधित तलाठ्याकडून मागवून घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. याचप्रमाणे अपिलार्थीस दिलेली माहिती तपासणी करुन योग्य आहे ही पाहणी करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार, पूर्णा यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. केशव नामदेव गिराम, मु. पो. देऊळगाव दुधाटे, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा देऊळगाव दुधाटे, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरे बालाजी माधवराव, | : | अपीलकर्ता |
| रा. डिग्रस, पो. फरकंडा, तालुका पालम, जिल्हा परभणी | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी | | |
| जन अपिलीय अधिकारी, | : | |
| बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी - यांचेतर्फे ॲड एस. व्ही. जायगुडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर, तालुका पालम जिल्हा परभणी तर्फे ॲड एस. व्ही. जायगुडे उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांच्यातर्फे त्यांचे प्रतिनिधी ॲड एस. व्ही. जायगुडे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये १९७८ ते डिसेंबर २००९ या कालावधीची कार्यकारी मंडळ व सभासदाची यादी मागितली आहे. ती त्यांच्याकडे उपलब्ध आहे तथापि अपिलार्थी

व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अपिलार्थीस त्याप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जावी असे कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिलेला नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीस एक दिवस कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जाण्याचे नोंदणीकृत टपालाने कळवावे. त्याप्रमाणे अपिलार्थी उपस्थित झाल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने कळवावे व अपिलार्थीस उपस्थित झाल्यास त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा. डिग्रस, पो. फरकंडा, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिरसाठ बालाजी एकनाथ,<br>ज्ञानेश्वर विद्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, राजमाता जिजामाता विद्यालय, लातूर<br>- श्री. केंद्रे डी. एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक लातूर विभाग, लातूर -<br>प्रतिनिधी - श्री. शेख एन. आय., सहा. शिक्षण संचालक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजमाता जिजामाता विद्यालय, लातूर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकंदर १९ मुद्दयावर तीन त्रयस्थांची माहिती मागितली अहे. या माहितीपैकी मुख्याध्यापक, राजमाता जिजामाता विद्यालय, लातूर यांच्याकडे उपलब्ध असलेल्या दोन मुद्दयावरील माहिती (मुद्दा क्रमांक १४ व १७) दिनांक ०५-१०-२०१० रोजी अपिलार्थीस पाठविली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी दिनांक १९-०९-२००९ रोजी सुनावणी घेतली. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी दिनांक २४-०९-२००९ रोजी माहिती देण्याचे मान्य केले आहे व अपिलार्थीने दिनांक २४-०९-२००९ रोजी माहिती घेण्याचे मान्य केले आहे. अपिलार्थी यांचे व्दितीय अपील दिनांक २६-०८-२०१० रोजीचे आहे. अपिलार्थी यांनी दिनांक २४-०९-२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेतली नसल्यास जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्‍चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्‍चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिरसाठ बालाजी एकनाथ, ज्ञानेश्‍वर विद्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजमाता जिजामाता विद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेक नगर, वसमत रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी, सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०६-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १५-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १९-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १०-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेक नगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी, सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. काजी मोहमद आतेफोद्दिन, : अपीलकर्ता
काद्राबाद प्लॉट, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळालेली आहे तथापि माहिती अपूर्ण आहे. अपिलार्थी यांना हातपंपांची खोली किती, किती पाईप टाकण्यात आले ही माहिती अप्राप्त आहे असे दिसून येत आहे. सदरची माहिती देय होत आहे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने व विनामूल्य पुरवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काजी मोहमद आतेफोद्दिन, काद्राबाद प्लॉट, परभणी.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विपूल नाथाजी देबाजी, : अपीलकर्ता
केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा सह निबंधक, जिल्हा सह निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, सेलू,<br>तालुका सेलू, जिल्हा परभणी - श्री. मो. मोबीशोदीन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि. श्रे.), सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी - श्री. एस. के. बोधगिरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०९-२००९ रोजी असाच हुबेहुब अर्ज मानवत, पाथरी तालुक्यासाठी केलेला आहे. माहिती अर्जात त्यांनी विविध अशा एकूण १३ मुद्दयावर व्यापक अशी सन २००१ ते २००९ या कालावधीतील माहिती मागितली आहे. सदरची माहिती एकत्रित करण्यास जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री तसेच मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात वळवावे लागणार आहे. त्याचप्रमाणे बरीच माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेताही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांनी दिनांक १८-०९-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने सादर केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १९-११-२००९ रोजी निर्णय दिला आहे व त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी काही मुद्दयावर माहिती दिलेली असून उर्वरीत माहितीकरिता शासनास शुल्क जमा करावे असे कळविले आहे व हे शुल्क नोंदणी कायदा १९०८ चे कलम ५७ अन्वये मागितले आहे असे अपिलार्थीस कळविले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना एका मुद्दयावरील म्हणजे नोंदणी झालेल्या मालमत्तेचे खरेदीखत, गहाणखत, मालमत्ता बाजारमुल्य, पाच लाखापासून पुढे नोंदणी बाबत माहिती मिळाली नाही असे दिसून येत आहे. ही माहिती मोघम स्वरुपाची मागितली असल्यामुळे व नेमकी बाब नमूद केली नाही, नेमकी खरेदीदाराची नावे इत्यादी नमूद केलेले नाहीत. माहिती विस्तृत आहे. तरीही अपिलार्थी यांनी दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन संबंधित अभिलेख्याचे तपासणीकरिता प्रतिवर्ष प्रतिनोंद रुपये पंचवीस प्रमाणे फीस शासनास जमा करुन अपिलार्थीस हव्या असलेल्या दस्तऐवजाची नक्कल प्रतिपेज रुपये वीस एवढी सह जिल्हा निबंधक यांच्या कार्यालयात जमा करुन उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिला आहे. ही फीस नोंदणी अधिनियम १९०८ कलम ५७ प्रमाणे आहे. ही बाब महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील तरतुदीनुसार योग्य ठरत आहे.

अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन गांभीर्य नष्ट होते.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे अपील प्रकरण या स्तरावर बंद करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विपूल नाथाजी देबाजी, केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तम ज्ञानोबा फड, : अपीलकर्ता
चंदन निवास, भंडारी कॉलनी, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक विभागीय कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. शेख एन. आय., सहा. शिक्षण संचालक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. शंकर सिताराम वाघमारे, उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे एका सार्वजनिक न्यासात कार्यरत आहेत त्याबाबत त्यांनी, वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घेतली असल्यास त्याची सत्यप्रत व ज्या आदेशाने राजपत्रित अधिका-

याला सार्वजनिक न्यासात राहता येते त्याबाबत शासनाच्या अधिसूचना / नियमावली / परिपत्रक याच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या व्याख्येत येत असल्याने देय होत आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना सदरची माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन देण्याची व्यवस्था करावी लागेल व अशी अनुमती घेतली नसल्यास तसे अपिलार्थीस स्पष्टपणे कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी व अशी अनुमती घेतली नसल्यास तसे अपिलार्थीस स्पष्टपणे कळवावे लागेल. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम ज्ञानोबा फड, चंदन निवास, भंडारी कॉलनी, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश यादवराव अडागळे, : अपीलकर्ता
रा.पाथरी,जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग,जिल्हा परिषद, परभणी - श्री. एस.ई.गोडगोडवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, परभणी | : अनुपस्थित |
| ३.४ | श्री. लियाकत अली खान- प्रतिनिधी - जिल्हा परिषद प्रशाला पाथरी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जिल्हा परिषद प्रशाला पाथरीचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण कार्यालय,जि.प.परभणी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे सन २००४-२००७ या कालावधीमध्ये सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटप केल्याबाबतची माहिती मागितली आहे. यापैकी सन २००७-२००८ या कालावधीमध्ये शिष्यवृत्ती वाटप केलेल्या मुलींची यादी त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे व ती अपिलार्थीस देऊ शकतात. तथापि २००४-२००५ व २००५-२००६ या कालावधीत शिष्यवृत्ती मान्यतेकरिता संबंधित शाळेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मान्य करण्याची व शिष्यवृत्ती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांच्या द्वितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळालेली नाही, असे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटप केलेल्या मुलींची यादी नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी व उर्वरित माहितीकरिता वर नमूद केल्याप्रमाणे पुन्हा एकदा खातरजमा करुन अपिलार्थीस सुस्पष्ट कळविण्यात यावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली सुस्पष्ट माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश यादवराव अडागळे, मु. पो. इंदिरानगर, पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लोखंडे शशिकांत किशनराव, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लेखाधिकारी,जिल्हा परिषद,परभणी - श्री. सुरेश गंगाधर केंद्रे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी - श्री. अंकुश रामराव दहिफळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०८.०५.२०१० रोजी घेण्यात आलेल्या वरिष्ठ सहायक (लेखा) परीक्षेच्या आसन क्र.FD-

१६६ या स्वतःच्या प्रश्नपत्रिकेची छायाप्रत मागितली आहे. या परीक्षेच्यावेळी प्रश्नपत्रिका याच उत्तरपत्रिका होत्या.त्यामुळे तसेच सर्व उमेदवारांच्या प्रश्नपत्रिका जिल्हाधिकारी कार्यालयात होत्या. ही बाब अपिलार्थीस दि. ३१.०५.२०१० रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्राची प्रत देऊन कळविण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ज्यावेळी प्रश्नपत्रिका परत प्राप्त झाल्या त्यावेळी दि. १४.१०.२०१० रोजी अपिलार्थीस प्रश्नपत्रिका दि. १८.१०.२०१० रोजी कार्यालयात उपस्थित राहून पाहणीकरिता उपलब्ध असल्याचे कळविण्यात आले. त्यावेळी अपिलार्थी कार्यालयात उपस्थित झाले. तथापि त्यांनी प्रश्नपत्रिका पाहण्यास नकार दिला व प्रतीची मागणी केली. याची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात करुन ठेवली आहे. यापुढे जन माहिती अधिकारी यांनी असेही अवगत केले की, शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून दि. ०२.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन प्राप्त झाले आहे की, उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्यात येऊ नयेत. तथापि अपिलार्थीस पाहणीसाठी संधी देण्यात आली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील युक्तिवाद व अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ङ) नुसार उत्तरपत्रिका देय होत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लोखंडे शशिकांत किशनराव, आशिर्वादनगर, सागर बालक मंदीरजवळ, कारेगावरोड, देशमुख हॉटेलच्या पाठीमागे, परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी,जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**


राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१


श्री. अब्दुल मुकीम अब्दुल कयुम शेख, : अपीलकर्ता
रा.मानवत, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.परभणी - श्री. इंगोले डी.के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, परभणी-प्रतिनिधी - श्री.एस.जे.थोरात, वरिष्ठ सहायक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दुसऱ्या लग्नाच्यासंदर्भात

शासनाचे नियम इ. विचारले असून जानेवारी,२००८ पासून ऑगस्ट, २०१० पर्यंत परवानगी न घेता दुसरे लग्न केल्याबाबत किती अर्ज प्राप्त झाले आहेत, याची जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे माहिती मागितली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि. ०६.०६.२०११ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आली आहे. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. १३.०८.२०१० रोजीचे आहे. अपिलार्थीस दि. ०६.०६.२०११ रोजी माहिती पाठविण्यात आली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल मुकीम अब्दुल कय्युम शेख, रा. नवा मोंढा, मानवत, ता. मानवत, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद महेबुब पिता शामीर,<br>रा.उखळद,ता.जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत, उखळद, ता.जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (श्रेणी-१), पंचायत समिती,परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामवेसक, ग्रामपंचायत उखळद, ता.परभणी - श्री.आर.एम.भालेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती,परभणी-श्री.एस.एच.छडीदार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २७.०४.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती दि.०७.१२.२००९ रोजी अन्य अर्जाच्या अनुषंगाने देण्यात आली आहे.

त्यासंदर्भात अपिलार्थीने पोच दिलेली आहे. तथापि विचाराधीन अर्जासंदर्भात त्यांना पुन्हा माहिती पाठविण्यात आलेली नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. दि. २८.०२.२०१० रोजीच्या द्वितीय अपिलात नमूद केले आहे की, ग्राम पंचायत उखळद येथील घर क्र. २४६ च्या फेर आकारणीच्या छायांकित प्रती व ग्रामपंचायतीच्या मूळ ठराव रजिस्टरच्या छायांकित प्रती मागितल्या आहेत. त्या त्यांना अद्याप मिळालेल्या नाहीत. याची आयोग गंभीर दखल घेत आहे. गट विकास अधिकारी हे कार्यालय प्रमुख आहेत. त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठवतील याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे त्यांचे अधिनस्त सर्व कर्मचारी/अधिकारी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्रत्येक अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम ७ नुसार विहित मुदतीत कार्यवाही करतील यासाठी दक्ष राहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवतील याची दक्षता घ्यावी.

२) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,परभणी यांना त्यांचे अधिनस्त सर्व कर्मचारी/अधिकारी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्रत्येक अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम ७ नुसार विहित मुदतीत कार्यवाही करतील यासाठी दक्ष राहावे लागेल.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद महेबूब पिता शामीर, मु.उखळद, पोस्ट पिंपरी दे.ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामवेसक, ग्रामपंचायत उखळद, ता.जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रायभोळे मिलींद देवराव, : अपीलकर्ता
रा.गंगाखेड, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,गंगाखेड,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,गंगाखेड,जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शाखा अभियंता(बांधकाम), पंचायत समिती,गंगाखेड,जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,गंगाखेड,जि.परभणी -प्रतिनिधी - श्री.आर.व्ही.चकोर, अनुरेखक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर प्रथम दि. १३.०८.२०१० रोजी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,गंगाखेड यांनी दि. २८.१२.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता (बांधकाम) यांनी त्यांच्यासंदर्भात जवाहर विहिरी व घरकुल योजनेबाबत माहिती दिली आहे व या योजनांचे कोणतेही काम केले नसल्यामुळे माहिती निरंक आहे ही बाब सुनावणीच्यावेळी नमूद करण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मिळाली असल्याचे कबूल करुन संपूर्ण समाधान झाल्याचे सुनावणीच्या वेळी सांगितले आहे. त्याची नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या इतिवृत्तांतात घेतली आहे. अपिलार्थीच्या द्वितीय अपिलाचा दि. १७.०९.२०१० असा आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रायभोळे मिलींद देवराव, सा.बलदंड कार्यालय, महात्मा फुले नगर,गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता(बांधकाम),पंचायत समिती,गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वाव्हाळे गोविंद आप्पाराव, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,जिंतूर,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
कृषि विकास अधिकारी,जिल्हा परिषद,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, जिंतुर,जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कृषि विकासअधिकारी, जिल्हा परिषद,परभणी प्रतिनिधी- डॉ.मोहम्मद फारुक, जिल्हा कृषि अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत

केले की, अपिलार्थीस द्यावयाची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ते ती अपिलार्थीस देतील. या बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे तीस दिवसांच्या आत पाठवाव्या लागतील. त्याचप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता अधिनियमातील कलम ७ नुसार विलंब झालेला आहे. याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करावी लागेल. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांना संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करण्याची अधिनियमातील कलम २०(२) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित मुदतीत माहिती द्यावयाच्या कलमाचा भंग झाला असल्यामुळे कलम २०(२) नुसार त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वाव्हाळे गोविंद आप्पाराव,द्वारा बोंबले पाटील निवास,डॉ.पठाडे दवाखाना पाठीमागील गल्ली, परसावतनगर,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, जिंतुर,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. काजी रजीयोद्दीन अब्दुल खादर, : अपीलकर्ता
रा.जिंतूर,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, औंढा (नागनाथ),
जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औंढा
(नागनाथ),जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. काजी रजीयोद्दीन अब्दुल खादर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही. अपिलार्थी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेले दि. २८.०१.२००८ व ०५.०८.२००८ चा अर्ज यावर

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागत आहेत व यावर कार्यवाही करण्यास विलंब झाला असल्यास त्याची कारणे मागत आहेत. युक्तिवादात आयोगास असे आढळून आले की, अपिलार्थी यांना संदर्भित जागेच्या नमूना नं.८ची प्रत अभिप्रेत आहे. एक विशेष बाब म्हणून अपिलार्थी यांना नमुना नं.८ ची प्रत देण्यात यावी, असे आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना निर्देश आहेत. याबाबत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसह नमुना नं.८ ची प्रत हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काजी रजियोद्दीन अब्दुल खादर,मिशकीन शाह प्लॉट, बकरा मार्केट मागे, जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, औंढा (नागनाथ),जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औंढा (नागनाथ),जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मस्के संजय मारोती, : अपीलकर्ता
रा.बोरगाव बु.,ता.पालम,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पालम,
जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
जिल्हा परिषद (पंचायत विभाग),परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत, बोरगाव(बु.), ता.पालम,जि.परभणी - श्री.डी.एस.पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पालम, जि.परभणी - श्री.के.एम.बागुल | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी -उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद,परभणी - श्री. अशोक सिरसे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व सध्याचे व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००६ ते २०१० या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत, बोरगाव बु. येथील संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेची संपूर्ण माहिती - जसे कामाचे नाव, एकूण रक्कम, खर्च केलेली रक्कम, कामाचे अंदाजपत्रकाच्या व मूल्यांकनाच्या प्रती, कामापूर्वीचे व कामानंतरचे फोटो, कामावरील मजुरांची संख्या, मजुराच्या हजरीपटाच्या झेरॉक्सप्रती, मजुरांना प्रतीदिन मजूरीच्या स्वरुपात देण्यात येणाऱ्या अन्नधान्याचे प्रमाण, रोख रक्कम, रोख रक्कम वाटप रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, मजुरांच्या कुपनच्या झेरॉक्स प्रती,मजूरांना धान्य वाटप केलेल्या स्वस्तधान्य दुकानदाराचा दुकानाचा संपूर्ण पत्ता, या योजनेबाबात मराठवाडा ग्रामीण बँक राणिसावरगाव येथे ग्रामसेवक व सरपंच यांचे खाते उघडल्याचा दिनांक, या खात्यावर ग्रामपंचायतीने केलेल्या आर्थिक व्यवहाराची माहिती, पासबुकाची छायांकित प्रती, वरील कालावधीत गीरी ग्रामसेवक,पवार ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत बोरगाव (बु.)चा पदभार (चार्ज) घेतल्याचा दिनांक व चार्ज सोडल्याचा दिनांक, सदरील योजनाचे मार्च, २००८ मध्ये खाते बंद केले असतानाही दिनांक २२.०२.२०१० रोजी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेची ८१७२४/- रुपये ग्रामपंचायतनी म.ग्रा.बँ.राणिसावरगाव येथे ऊचललेल्या रकमेच्या तपशीलवार माहितीच्या प्रती इ.बाबीची सविस्तर अशी माहिती मागितली आहे. माहितीची व्याप्ती व कालावधी फार मोठा आहे. त्यामुळे ती एकत्रित करण्यास कालावधी लागला आहे. त्यामुळे ते देऊ शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २४.०५.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी आहे, असे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये सर्व नागरिकांना दिलेल्या अधिकारानुसार माहिती मागताना अधिनियमाच्या प्रस्तावनेत दिलेली उद्दीष्टे साध्य होत आहेत हे पाहणे गरजेचे आहे. एवढया मोठया प्रमाणावर माहिती मागवून ही उद्दीष्टे साध्य होत नाहीत, असे आयोगाचे मत आहे.तसेच यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामग्री व मनुष्यबळ याचा मोठया प्रमाणावर वापर होणार आहे. या बाबी विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार दोन दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध

करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मस्के संजय मारोती, मु. बोरगाव (बु.), पो.चाटोरी,ता.पालम, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, बोरगाव(बु.), ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालासाहेब गंगाधर काळे, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, विज वितरण कं.लि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
विज वितरण कं.लि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, म.रा.विज वितरण कं.लि.परभणी -प्रतिनिधी - श्री. एन.डी.गालफाडे, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,म.रा. विज वितरण कं.लि.परभणी -प्रतिनिधी - श्री. के.एस.रंधे, सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे बी.एस.एन.एल. व इतर कंपनीच्या मोबाईल टॉवरला (मनोरा) विद्युत पुरवठा केल्याबाबतची एकूण ५ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे व ही माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेणार, असे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये नमूद केले आहे. सदरची माहिती एकत्रित करण्यास वेळ लागला. या माहितीची एकूण ४७४ पृष्ठे एकत्रित करुन अपिलार्थीस दि. २७.०५.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज दि. ०९.०८.२०१० रोजीचा आहे. अपिलार्थी यांना दि. २७.०५.२०११ रोजी माहिती पाठवली आहे.

या बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब गंगाधर काळे, शांतीनगर,दर्गाह रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,म.रा.विज वितरण कं.लि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,म.रा.विज वितरण कं.लि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मीकांत गणपतराव देशपांडे, : अपीलकर्ता
रा.बामणी (बु.),ता.जिंतूर,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या.,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या.जिंतूर, जि.परभणी. | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,परभणी - प्रतिनिधी - श्री. के.एस.रंधे, सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत गणपतराव देशपांडे,मु.पो.बामणी (बु.),ता.जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,जिंतूर, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जितेंद्र नागोराव इचके, : अपीलकर्ता
मु. पो. रमाबाई नगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, निळानाईक तांडा, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, निळानाईक तांडा, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी - श्री. टाकरस व्ही. एन. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी - श्री. चकोर आर. व्ही. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी निळानाईक तांडा ग्रामपंचायत येथील सन २००८ ते २०१० पर्यंत झालेल्या ग्रामसभेच्या अहवालाच्या प्रती व ठराव रजिस्टरच्या प्रती मागितल्या आहेत. त्यांच्याकडे इतर ग्रामपंचायतीचा कार्यभार असल्याकारणाने सदरची माहिती संकलीत करुन अपिलार्थीस पाठविण्यास थोडासा उशीर झाला आहे. अपिलार्थीस दिनांक २५-१०-२०१० रोजी व्यक्तिशः माहिती दिली आहे व अपिलार्थीने याबाबत पोच दिलेली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जितेंद्र नागोराव इचके, मु. पो. रमाबाई नगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, निळानाईक तांडा, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख बुढन शेख गुलाब, : अपीलकर्ता
रा. पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा परिषद कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख बुढन शेख गुलाब | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी - श्री. पी. जे. पाटील | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. पी. जे. पाटील | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती तथा जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २६-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये पाथरी येथील मोकळ्या जागेवर जिल्हा परिषदेतर्फे बांधकाम करण्यात येत आहे याबाबतची माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी यांना मागितलेली आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी यांनी सांगितले की, सदर माहिती जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे असल्यामुळे त्यांनी आपल्या स्तरावरुन मागितलेली माहिती देण्यात यावी असे दिनांक ३१-०५-२०१० रोजी कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी मोठ्या प्रमाणात विविध मुद्दयावर माहिती मागितली आहे. ती एका महिन्यात देणे शक्य नव्हते म्हणून ती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व जी उपलब्ध होती ती देऊन जी उपलब्ध नाही तसे अपिलार्थीस कळवून प्रतिसाद दिलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, दिनांक २५-१०-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध माहिती देण्यात आली आहे व जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत अपिलार्थीस कळविण्यात आले. अपिलार्थीने या पत्राची पोच त्याच दिवशी दिलेली आहे.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली नाही. त्यांना माहिती देण्यात आली तथापि त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले ती खालीलप्रमाणे आहे.

१. नगरपालिका बांधकाम परवान्याची प्रत.

२. नगर रचना विभागाने संरचनेस (आर्किटेक्चर प्लॅन) मान्यता दिलेल्या मान्यतेची प्रत.

३. सार्वजनिक बांधकाम विभागाचे राष्ट्रीय महामार्गापासून योग्य अंतर असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४. जमिनीच्या मालकी हक्काबाबतच्या कागदपत्राची प्रत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांना वर नमूद केलेल्या मुद्दयावरील माहिती देय होत आहे व ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एका महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख बुढन शेख गुलाब, रा. पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पतंगे गंगाधर बापुराव | : | अपीलकर्ता |
| रा. रुढी, तालुका मानवत, जिल्हा परभणी | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | | |
| जन अपिलीय अधिकारी, | : | |
| समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पतंगे गंगाधर बापुराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी - श्री. एस. ई. गोडगोडवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता रुपये तीस इतक्या शुल्काचा भरणा कार्यालयात करण्यात यावा म्हणजे माहिती पुरविता येईल असे अपिलार्थीस दिनांक २५-०५-२०१० च्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम ७ (३) अन्वये कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी दिनांक ०७-०९-२०१० रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली असून त्याबाबत त्यांनी समाजकल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद, परभणी यांना दिनांक २४-०२-२०११ रोजी पत्र लिहिलेले आहे व यासंदर्भात त्यांचे कामही झाले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पतंगे गंगाधर बापुराव रा. रुढी, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. खंदारे भिमराव गणपतराव,<br>मु. लिंबाळा, पो. पाचेगांव, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,<br>तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खंदारे भिमराव गणपतराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,<br>तालुका जिंतूर, जिल्हा परभणी - श्री. एम. पी. कदम | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, लिंबाळा, तालुका जिंतूर,<br>जिल्हा परभणी - श्री. व्ही. के. कांगणे | | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी -<br>प्रतिनिधी - श्री. बी. एस. ठाकूर, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी यांचेमार्फत आतापर्यंत त्यांना देण्यात आली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमधील खालील माहिती त्यांना अपेक्षित आहे असे सुनावणीच्या वेळी आढळून येत आहे.

१. जिल्हा परिषद परभणी, समाजकल्याण, पंचायत समितीकडून लिंबाळा ग्रामपंचायतला देण्यात आलेल्या सन १९९२-९३ ते २००२ पर्यंतच्या साहित्याचा तपशील.

२. ग्रामपंचायतीने पंचायत समिती, जिंतूरकडे जमा केलेल्या सन १९९३-९४ ते २००२ पर्यंतच्या साहित्याचा तपशील.

३. बालवाडीच्या जागेवरील झालेल्या अतिक्रमणाचा तपशील.

४. बालवाडीच्या जागेवरील झालेल्या अतिक्रमणाबाबत पंचायत समितीस ठराव दिला याबाबतच्या प्रती.

५. जिंतूर शहरात न्यायालयात अभिलेखे दाखल केल्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांना वर नमूद केलेल्या मुद्दयावरील माहिती देय होत आहे व ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एका महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. माहिती अधिकार अर्ज व्यवस्थित हाताळण्यात आला नाही असे आयोगाच्या दृष्टीस आले आहे याकरिता संबंधित लिपिक श्री. कांबळे यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांनी ताकीद द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अर्ज व्यवस्थित न हाताळल्याबद्दल संबंधित लिपिक श्री. कांबळे यांना ताकीद द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खंदारे भिमराव गणपतराव, मु. लिंबाळा, पो. पाचेगांव, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, लिंबाळा, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोज दत्तोपंत धानोरकर, : अपीलकर्ता
गणपती गल्ली, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, शारदा विद्या मंदिर, नेमगिरी रोड, काजी गल्ली, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
सचिव, ग्राम विकास संस्था, मेन रोड, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनोज दत्तोपंत धानोरकर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, शारदा विद्या मंदिर, नेमगिरी रोड, काजी गल्ली, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, ग्राम विकास संस्था, मेन रोड, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी<br>- प्रतिनिधी - ॲड डी. व्ही. कातनेश्वरकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड डी. व्ही. कातनेश्वरकर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास बाजू मांडण्या-करिता पुढील तारीख मिळण्याची विनंती केली.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०६-२०११**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोज दत्तोपंत धानोरकर, गणपती गल्ली, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शारदा विद्या मंदिर, नेमगिरी रोड, काजी गल्ली, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सचिव, ग्राम विकास संस्था, मेन रोड, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना प्रथम अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गंगाधर संभाजी जोगदंड,<br>मु. पो. येलदरी कॅम्प, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी वसाहत, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी वसाहत, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गंगाधर संभाजी जोगदंड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी वसाहत, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी<br>- श्री. नागेश नारायणराव महेंद्रकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी वसाहत, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१०-२०१०<br>फेरसादर दिनांक ०४-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १०-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाधर संभाजी जोगदंड, मु. पो. येलदरी कॅम्प, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी वसाहत, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलविद्युत निर्मिती केंद्र, येलदरी वसाहत, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. चौहान एच. आय. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. गिरी एच. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये पूर्णा तालुक्यातील गतीमान व पाणलोट योजने बाबतची संपूर्ण विस्तृत

माहिती सुमारे दिड वर्षाची मागितली आहे. ही माहिती एक महिन्यात संकलीत करणे शक्य नव्हते. उपलब्ध माहिती संकलीत करुन मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २५-०८-२०१० अन्वये पोस्टाने देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२०१० च्या प्रथम अपिलावर दिनांक ०१-०९-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली आहे त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी असा निर्णय घेण्यात आला की, दिनांक १३-०९-२०१० पर्यंत अपिलार्थीस उर्वरीत माहिती देण्यात यावी व अपिलार्थी ती व्यक्तिशः घेतील. दिनांक ३०-०९-२०१० रोजी अपिलार्थीस उर्वरीत माहिती समक्ष देण्यात आली त्याची पोच अपिलार्थीने दिनांक ३०-०९-२०१० रोजी दिलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलात त्यांना अपूर्ण व खोटी माहिती मिळाली आहे असे मोघमपणे नमूद केले आहे. अपिलार्थी यांना अपूर्ण व खोटी म्हणजे नेमकी कोणती ही बाब जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. तसेच माहितीची व्याप्ती पाहता जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आढळून येत असल्याने शास्ती लावण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पूर्णा,

तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिगंबर साहेबराव देशमुख, : अपीलकर्ता
सहकार नगर, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, स. व सु. विभाग, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, महावितरण प्रविभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. रंधे के. एस., सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या विचाराधीन माहिती अर्जावर यापूर्वी व्दितीय अपील क्रमांक ७७२/२०१० मध्ये सुनावणी झाली असून

आयोगाने दिनांक ०८-०६-२०११ रोजी निर्णय दिलेला आहे. अपिलार्थीचा तो माहितीचा अर्ज व आज रोजीच्या व्दितीय अपिलातील माहिती अर्ज एकसारखाच आहे त्यामुळे आयोगास पुन्हा सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. यामुळे सदरचे व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे. त्यामुळे आयोग सदरचे प्रकरण बंद करीत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिगंबर साहेबराव देशमुख, सहकार नगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुशिलकुमार बालाजी दळवी,<br>बसस्टँण्ड रोड, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महावितरण, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महावितरण, उपविभाग पूर्णा,<br>तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. महेश शंकरराव औरादे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महावितरण, विभाग परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. रंधे के. एस., सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१०-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>२५-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २४-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये मार्च २००३ ते मार्च २०१० या कालावधीतील ग्राहकांना कृषि पंप कोटेशन दिल्याबाबतची सविस्तर अशी एकूण सहा मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणावर असल्याने सर्व माहिती एकत्रित करण्याकरिता व माहितीचा शोध घेऊन एकत्र करण्याकरिता कालावधी लागला. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सुमारे ८००० पृष्ठे इतकी होते. यानंतर अपिलार्थीस दिनांक १९-०७-२०१० रोजी उपलब्ध माहिती पुरविण्यात आली. अपिलार्थी यांनी त्याची पोच दिनांक २०-०७-२०१० रोजी दिली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान झाले नाही असे अपिलार्थीने नमूद केले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावी लागली तरीही माहिती देण्याकरिता सकारात्मक भुमिका घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली आहे. आता अपिलार्थीस त्यांना नेमकी कोणती माहिती प्राप्त झाली नाही हे जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसात कळवावे लागेल व तदनंतर पुढील १५ दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने माहिती पुरवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे १५ दिवसात कळविल्यास तदनंतर पुढील १५ दिवसात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने माहिती विनामूल्य पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०६-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुशिलकुमार बालाजी दळवी, बसस्टँण्ड रोड, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण, उपविभाग पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण, विभाग परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.  निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोपाळ दत्तराव सोनटक्के, : अपीलकर्ता
व्दारा, सुशिलकुमार दळवी, बसस्टँण्ड रोड, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महावितरण, उपविभाग पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. महेश शंकरराव औरादे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महावितरण, परभणी - प्रतिनिधी - श्री. रंधे के. एस., सहायक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०८-२०१० च्या माहिती अर्जान्वये ऑक्टोबर २००९ ते जानेवारी २०१० या कालावधीतील विविध सहा मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्यातील बरीचशी माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. यासंदर्भात अपिलार्थीस दिनांक २४-०९-२०१० रोजी कळविण्यात आले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या माहितीच्या व्याख्येमध्ये देय होणार नाही. परंतु उर्वरीत माहिती देय आहे. ती एकत्र करण्याकरिता कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होणार आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळ दत्तराव सोनटक्के, व्दारा, सुशिलकुमार दळवी, बसस्टँण्ड रोड, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण, उपविभाग पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महावितरण, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अशोक मुंजाजी वायवळ,<br>रा.परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुनर्वसन अधिकारी, परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - (तत्कालीन)प्रभारी जिल्हा पुनर्वसन अधिकारी,परभणी - श्री. डी. एन.शास्त्री | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,परभणी - प्रतिनिधी - श्री. पी.पी.वाकोडकर, अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपिल प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पंचायत समिती व तहसील कार्यालय या दोनही कार्यालयाशी संबंधित आहे. पंचायत समिती कार्यालयामधून माहिती प्राप्त करुन घेण्यास कालावधी लागला आहे. माहिती प्राप्त करुन घेतल्यावर अपिलार्थी यांना पाठविण्याकरिता आवक-

जावक विभागामध्ये देण्यात आले होते. पुढे काय झाले, हे जन माहिती अधिकारी आयोगास सांगू शकत नाहीत. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन दि. ०८.१०.२०१० रोजी अपिलार्थी यांना मागितलेली माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यात यावी, असा निर्णय दिला आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना माहिती अद्यापि अप्राप्त आहे. अपिलार्थी हे मौजे मांगणगाव या गावचे रहिवाशी असून पुनर्वसन यादीत त्यांच्यासोबत इतर १०-१२ व्यक्तींची नावे नाहीत. याबाबत चौकशी करण्यास्तव त्यांनी अर्ज दिला आहे. त्या अर्जाच्या अहवालाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पुनर्वसनातील लाभार्थींना मिळणाऱ्या मोबदल्याबद्दल आहे. ती मिळाली नसल्याची गंभीर दखल आयोग घेत आहे. या प्रकरणाकडे जिल्हाधिकारी, परभणी यांना व्यक्तिशः लक्ष द्यावे लागेल व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती पाठविण्यास विलंब झाला आहे. तो विलंब हेतुपूरस्सर झाला किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी,परभणी यांना चौकशी करावी लागेल व दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यावर कार्यवाही करावी, अशी अधिनियमातील कलम २०(२) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जिल्हाधिकारी, परभणी यांनी प्रकरणात वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे चौकशी करुन पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. अशोक मुंजाजी वायवळ,रा.प्रियदर्शनीनगर,परभणी,ता.जि.परभणी

२.	जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भिमराव तुळशीराम साळवे, : अपीलकर्ता
रा.गंगाखेड, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
महसूल सहायक,
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भिमराव तुळशीराम साळवे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी - प्रतिनिधी - श्री. बी.एस.मस्के, अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, परभणी - प्रतिनिधी - श्री. पी.पी.वाकोडकर, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | पत्रावर दिनांक नाही |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दि.

२८.०७.२०१० रोजी झालेल्या सुनावणीनंतर दि. ३१.०७.२०१० रोजी निर्णय निर्गमित केला आहे. त्यामध्ये अपिलार्थीस मुद्दा क्र.२ बाबतची मुद्देसुद माहिती सात दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी, असे सूचित करण्यात आले आहे. तदनंतर अपिलार्थीस ही माहिती देण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांनी युक्तिवादात असे अवगत केले की, त्यांना मिळालेली माहिती मुद्दा क्र. २ च्या माहितीऐवजी दुसरी माहिती दिलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

"मा.तहसीलदार साहेब गंगाखेड यांचे चौकशी अहवाल पत्रक क्रं.२००९/ जमाबंदी/ बीडी/ दि.७.९.२००९ व मा. उपविभागीय अधिकारी परभणी यांचे चौकशी अवाल पत्रक जाक्र./जमा/प्र.क्र.दि.२१/११/२००९ चे आपणास प्राप्त असलेलेचे चौकशी अहवालाप्रमाणे त्यावर पुढील स्थरावर कोणती कार्यवाही केली यांचे उत्तर मिळावे."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, मुद्दा क्र.२ मध्ये संदर्भित केलेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांना मिळालेली आहे. तथापि या चौकशी अहवालाप्रमाणे पुढील स्तरावर कोणती कार्यवाही केली, याची सद्यपरिस्थिती त्यांना अवगत करण्यात आली नाही. ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत आहे. ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे सद्यस्थितीची माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भिमराव तुळशीराम साळवे, मु.पो.कृष्णानगर,कोद्रीरोड, गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पवार अनिल उत्तमराव, : अपीलकर्ता
रा.गंगाखेड, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
१) महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
२) तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी - प्रतिनिधी - श्री. एम.एस.शिनगारे, अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार गंगाखेड, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,परभणी- प्रतिनिधी -श्री. पी.पी.वाकोडकर, अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपिल प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे

ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवार अनिल उत्तमराव, यु.एस.पवार यांचे घर, योगेश्वर कॉलनी, गंगाखेड,ता.गंगाखेड,जि.परभणी - ४३१ ५१४.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जावेद अ.सत्तार, : अपीलकर्ता
रा.मानवत, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, मानवत, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, मानवत, जि.परभणी- श्रीमती संगिता सानप | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू,जि.परभणी -प्रतिनिधी- श्री.प्रकाश गोरे, नायब तहसीलदार, मानवत, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मानवत यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अधिनियमातील कलम

७(१) नुसार दि. १४.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस हस्तपोच पाठविण्यात आली असता, अपिलार्थी यांनी त्याचा स्वीकार केला नाही. त्यामुळे सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे दि. ०८.०८.२०१० रोजी पाठविण्यात आली आहे. ती अपिलार्थीस दि. १०.०८.२०१० रोजी मिळाली असून त्याबाबतची पोचपावती जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखावर आहे.उर्वरित दोन मुद्याद्वारे मानवत शहर व तालुक्यातील ग्रामीण विभागातील स्वस्तधान्य दुकानाच्या त्यांच्याकडून ऑक्टो,२००९ ते नोव्हेंबर,२००९ या कालावधीची बीलबुके व स्टॉक रजिस्टरच्या प्रती मागत आहेत. अशी दुकाने मानवत शहर व ग्रामीण विभाग अशी एकंदर सुमारे ८० असतील. या सर्व स्वस्तधान्य दुकानांच्या संदर्भातील माहिती पुरविण्यासाठी दि. १४.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना कळविण्यात आले आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती जी सुमारे ८० स्वस्तधान्य दुकानांकडून माहिती द्यावयाची आहे, ती संकलीत करण्यास विलंब लागत आहे. या माहितीची व्याप्ती पाहता अधिनियमातील कलम ७(९) मधील तरतूदी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात दोन दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस व संबंधित स्वस्त धान्य दुकानदारांना याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अ.सत्तार, तकिया मोहल्ला,नेताजी सुभाष विद्यालयाजवळ, मानवत, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मानवत, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितीन माणिकराव देशमुख, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नितीन माणिकराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,परभणी - श्री. रा.को. कोलगणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात नेमकी खालीलप्रमाणे माहिती अपेक्षित आहे, असे आयोगास आढळून आले आहे.

१) संदर्भित जागेचे चुकीचे रेखांकन झाले आहे. त्याकरिता जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम व पत्ता.

२) प्रस्तावित रस्त्यामधून (अतिक्रमणापूर्वीचा रस्ता ३०-४० वर्षापूर्वीचा) क्षेत्र कमी करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती. जसे - रस्त्याच्या भूसंपादनासाठी केलेल्या कार्यवाही दरम्यान निर्माण झालेली कागदपत्रे, निवाडयाच्या प्रती इ.

३) रस्त्यासाठी भूसंपादन करताना रस्त्याचे क्षेत्र संपादित केल्यावर क्षेत्र ७/१२ तून वगळण्यात येते, या बाबतचे शासनाचे निर्णय/परिपत्रकाच्या प्रती.

४) संदर्भित गटास जुळणारी योग्य ७/१२ ची प्रत - सद्यपरिस्थिती कळवावी.

५) दि. १६.०१.१९९७ रोजी सर्व्हे नंबर २२/१ बाबत ३८१ क्रमांकाचा फेरफार करण्यात आलेला आहे. यासंदर्भात संबंधित तलाठी,मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार यांची नावे व सध्याचा कार्यालयाचा पत्ता इ. तपशील.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल. यासाठी अपर जिल्हाधिकारी यांनी ही बाब व्यक्तिशः पहावी, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.अपर जिल्हाधिकारी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती पाठवतील, याकडे व्यक्तिशः पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन माणिकराव देशमुख,द्वारा ॲड. झरीकर, नारायण चाळ,परभणी ऱ ४३१४०१

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.) तहसील कार्यालय,परभणी यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायणराव तातेराव कदम, : अपीलकर्ता
रा.पूर्णा, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय, पूर्णा,
जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, पूर्णा, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय,पूर्णा, जि. परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,पूर्णा,जि.परभणी - श्री. कैलासचंद्र वाघमारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा प्रभारी तहसीलदार यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये पूर्णा तालुक्यातील रेशन दुकानदाराचे नावासह, दुकानाचे ठिकाणाचा पत्ता, रेशनकार्ड धारक

ग्राहकांना दरमहा किती गहु,तांदुळ,दाळ,साखर,तेल इ. दिले जाते, एप्रिल,२०१० ते जुलै,२०१० या चार महिन्यात किती धान्य दिले, वरील चार महिन्याचे पूर्णा शहरातील रेशन दुकानदारांच्या परवान्याच्या छायांकित प्रती,सन २००९-१० या कालावधीत बोगस कार्ड शोध मोहिम राबविण्यात आली होती यातील रद्द केलेल्या रेशनकार्डाबाबत दुकानदाराचे नाव व रद्द केलेल्या कार्डांची संख्येसह अन्नपूर्णा,अंत्योदय,बी.पी.एल.,ए.पी.एल. योजना इ. विविध विषयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. संपूर्ण माहिती संकलीत करण्याकरिता काही कालावधी लागला आहे. अपिलार्थीस सदरची माहिती दि. ०३.०१.२०११ देण्यात आली आहे व अपिलार्थीस ती प्राप्त झाली आहे, अशी अपिलार्थीने दि. ०३.०१.२०११ रोजीच्या पत्रान्वये पोच दिली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज दि. १८.११.२०१० रोजीचा आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस दि. ०३.०१.२०११ रोजी माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाल काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायणराव तातेराव कदम, शिवाजी रोड,महादेव मंदिराजवळ,पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय,पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पूर्णा,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. स.महेमुद अली अमिर अली,<br>रा.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. स.महेमुद अली अमिर अली | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,परभणी- प्रतिनिधी - श्री. के.एस.दुधमल,कार्यालय अधीक्षक तथा सहायक माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. ब्रिजेश लक्ष्मणराव जाधव, विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी व्यक्तिशः उपस्थित नाहीत. दोनही बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांची सेवानिवृत्ती, ग्रॅच्युईटी व इतर थकबाकीबाबत माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. याकरिता अपर निबंधक, सहकारी

संस्था,पुणे यांची विशेष साक्ष आयोगास आवश्यक वाटते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम १८ (३)(ङ) [Sec 18(3)(e)]) नुसार दिलेल्या अधिकाराचा वापर करुन वरील साक्षीसाठी त्यांना उपस्थित राहावे लागेल. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तसेच अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स.महेमुद अली अमिर अली, रामेश्वर नगर,मराठवाडा,प्लॉट,परभणी -४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे, मध्यवर्ती इमारत,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी.एल.भायेकर, : अपीलकर्ता
रा.पूर्णा, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद - श्री. ब्रिजेश लक्ष्मणराव जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्यासंदर्भात दि. १९.०४.२०१० रोजी त्यांना सद्यस्थिती कळविण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा दि. १९.०७.२०१० रोजी कळविण्यात आले

आहे व त्यासोबत माहिती पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांचे विचाराधीन द्वितीय अपील दि. ०४.१०.२०१० रोजीचे आहे. त्यामध्ये त्यांना माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. याकरिता संदर्भित चौकशी अहवालाची प्रत व कार्यवाहीशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पुन्हा विनामूल्य पाठवाव्या लागतील, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे पुन्हा विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी.एल.भायेकर, मु.पो.पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेश्वर माधवराव पारवेकर,<br>रा. परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी.<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी. | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेश्वर माधवराव पारवेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद, परभणी - श्री.करण स.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी - प्रतिनिधी - श्री.के.एम.जाधव,प्रशासकीय अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, दि. ०३.०५.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी खालील नेमकी माहिती आवश्यक आहे.

१) अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित घराच्या अनधिकृत बांधकामाची सद्यपरिस्थिती.

२) त्रयस्थ श्री. श्रीकांत हराळे यांच्या घर क्र. १६४ मध्ये रंगनाथनगर या नागरी वस्तीमध्ये ओम फायब्रोप्लास्ट दरवाजे तयार करण्याच्या कारखान्याकरिता परवाना मिळविण्यासाठी नगर परिषदेने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. ती अपिलार्थीस द्यावी लागेल.मुद्दा क्र. १ बाबतची सद्यपरिस्थितीची माहिती कळवावी लागेल. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ ची माहिती नगर परिषद, संकीर्ण (श्री.दरक, विभाग प्रमुख) विभागाकडे उपलब्ध असते, असे संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन दिसून येते. ती त्या विभागाकडून घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. यासाठी संकीर्ण विभाग प्रमुख श्री. दरक यांना ही माहिती त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तात्काळ द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेश्वर माधवराव पारवेकर,'श्रीयोगानंद',१९,रंगनाथनगर,श्री बेलेश्वर महादेव मार्ग, परभणी-४३१४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिनबंधु सुदामराव हत्तिअंबिरे,<br>रा.गंगाखेड, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सेलू, जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,सेलू,जि.परभणी-श्री. डी.टी.धारवाडकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - श्री. ए.टी.नवटाके | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सेलू, जि.परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी

यांनी मार्च,२००९ ते एप्रिल,२०१० या कालावधीतील सार्वजनिक बांधकाम विभाग, सेलूमध्ये झालेल्या कामाची कामनिहाय विविध विषयावरील एकूण १६ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती गोळा करण्यासाठी काही कालावधी लागला. दरम्यानच्या काळामध्ये त्यांना प्रकृतीच्या कारणामुळे (हृदय शस्त्रक्रिया) रजेवर जावे लागले. त्यांनी आयोगास पुढे अवगत केले की, अपिलार्थीस ते पाहणीकरिता ही माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनबंधु सुदामराव हत्तीअंबीरे, रा.महात्मा फुलेनगर, गंगाखेड, ता.गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितिन माणिकराव देशमुख, : अपीलकर्ता
व्दारा, ॲड झरीकर, नारायण चाळ, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूसंपादन अधिकारी (मकृवि), भूसंपादन कार्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नितिन माणिकराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी (मकृवि), भूसंपादन कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. ए. एम. कंदी, मंडळ अधिकारी, परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. पी. पी. वाकोडकर, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ३५/४० वर्षापूर्वीची आहे तिचा शोध घेण्यात येत आहे परंतु तिचा शोध लागत नाही,

ही बाब अपिलार्थीस दिनांक ०७-०९-२०१० रोजी कळविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस संचिका क्रमांक अथवा एखादा संदर्भ दिला असता तर संचिका शोधण्यास मदत झाली असती असे कळविले आहे. यावर आयोगाने असे मत व्यक्त केले की, अपिलार्थीने माहितीचा शोध घेण्याकरिता काही संदर्भ जो त्यांना ज्ञात आहे तो नमूद करावा म्हणजे संचिका शोधणे सुकर होईल. माहिती अधिकार अधिनियम २००५ कायदा हा सकारात्मक दृष्टीने राबविण्याच्या दृष्टीने अशी काही माहिती अपिलार्थी देऊ शकले तर त्यांना पाहिजे असलेली कागदपत्रे सत्त्वर शोधणे सोईचे होईल. यावर अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी अवगत केले की, त्यांनी मागितलेल्या भूसंपादनाच्या माहितीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. रस्त्याचे नांव - परभणी वसमत रोड राज्य रस्ता.

२. संदर्भ - जमीन ही परभणीच्या शिवेसमोरील कारेगांव गावामधील आहे. या जमिनीचा सर्व्हे नंबर २२/१ गट नंबर ८३ आहे.

३. भूसंपादनापूर्वी संदर्भाधीन जमिनीची मालकी प्रयागबाई भ्र. देविदासराव यांची होती.

**वरील संदर्भाधीन जमीनीबद्दल खालील माहिती आवश्यक आहे.**

१. गट नंबर ८३ मधून रस्त्याची किती जमीन भूसंपादन झाली.

२. किती मोबदला या संपादनात दिला.

३. भूसंपादन झाल्यावर रस्त्याकरिता जमीन हस्तांतरीत केल्यानंतर ७/१२ वरुन तितक्या जमिनीपुरती मालकी वगळण्यात येते. यासाठी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्ताव पत्राची प्रत.

४. जमीन भूसंपादन झाल्यानंतर मालकी हक्कामधून मालकी हक्क कमी करावयाच्या कार्यवाही बाबत शासनाचे नियम, आदेश व परिपत्रक इत्यादीची प्रत.

५. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळण्यासाठी जमिनीच्या भूसंपादनाबाबतचे निकष त्याची प्रत.

वरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार देय होत आहे. त्याचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस द्यावी लागेल. विशेष भूसंपादन अधिकारी यांनी प्रयत्न करुनही त्यांना ही बाब शक्य झालेली दिसत नाही. याकरिता जिल्हाधिकारी, परभणी यांचे या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांच्या कार्यालयातील दोन कर्मचारी यांचे एक पथक निर्माण करुन या माहितीचा दोन महिन्याच्या आत शोध घेण्यात यावा व या पथकाने केलेल्या प्रयत्नाची रोजनिशी ठेवण्यात यावी. कागदपत्रे प्राप्त झाल्याबरोबर अपिलार्थीस ही माहिती नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी. कागदपत्रे मिळाली नाहीत तर महाराष्ट्र अभिलेखे अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार हे अभिलेखे सांभाळण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे होती त्यांच्याविरुध्द चौकशी प्रक्रिया सुरु करावी असे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार आयोगास प्रदान केलेल्या अधिकारानुसार शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जिल्हाधिकारी, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितिन माणिकराव देशमुख, व्दारा, ॲड झरीकर, नारायण चाळ, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (मकृवि), भूसंपादन कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जावेद अ. सत्तार, : अपीलकर्ता

तकिय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय मार्ग, दैनिक विश्वमित्र, औरंगाबाद मानवत, तालुका कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख जावेद अ. सत्तार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. पी. एच. गोरे, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. पी. पी. वाकोडकर, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०६-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये त्रयस्थ शायेदा बेगम मुहम्मद अकबर अन्सारी, रा. मानवत यांच्यासंदर्भात विविध मुद्दयावर माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १७-०६-२०१० रोजी निर्णय दिला आहे. तथापि प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्रयस्थ यांची माहिती मागितली असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थास बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्याचे आढळून येत नाही. त्रयस्थ यांनी बाजू मांडल्यावर अधिनियमा-तील तरतुदीनुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर अपिलार्थीने मागितलेली माहिती द्यावयाची किंवा कसे याचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी घेणे अपेक्षित होते. त्याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची पुन्हा सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०६-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अ. सत्तार, तकिय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय मार्ग, दैनिक विश्वमित्र, औरंगाबाद मानवत, तालुका कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सेलू,

तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपीलकर्ता
बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- श्री. एस. डी. मांडवगडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. पी. पी. वाकोडकर, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकूण दहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. यातील बहुतांश मुद्दयावर प्रश्नार्थक माहिती विचारली

आहे. तथापि त्यांना आवश्यक असलेली जी माहिती त्यांना अभिप्रेत आहे त्याबद्दल एकूण रुपये ५४ एवढ्या शुल्काचा भरणा कार्यालयात करावा असे दिनांक ०१-०२-२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) प्रमाणे विहित मुदतीत कळविले आहे. या पत्रामध्ये कोणत्या लेखाशीर्षाखाली शुल्क भरावयाचे त्याची माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी २६ मार्च २०१० रोजी चलनाव्दारे रुपये ५४ इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक ०९-०४-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, त्यांना माहितीची कागदपत्रे देण्यात आली आहेत तथापि मुद्देनिहाय माहिती देण्यात आली नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येमध्ये खुलासे, स्पष्टीकरण व प्रश्नार्थक माहिती इत्यादी माहितीचा समावेश होत नाही. उपलब्ध माहितीच्या प्रती देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांना या माहितीमध्ये जर त्यांना काही माहिती अपूर्ण वाटत असेल तर ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विलास विष्णूदास मोरे,<br>मु. पो. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी - श्री. सी. के. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णूदास मोरे, मु. पो. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. शिला दत्तात्रय शेटे, : अपीलकर्ता
रेणुका माता मंदिर, शनिवार बाजार, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी, :
नगर परिषद कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, परभणी<br>- श्री. करण सखाराम गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. के. एस. जाधव, प्र. अ. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १३-०६-२०११ च्या पत्राने आयोगास विनंती केली आहे की, आज सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही तरी त्यांना सुनावणीसाठी पुढील तारीख वाढवून देण्यात यावी. अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करत असून सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील

तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. शिला दत्तात्रय शेटे, रेणुका माता मंदिर, शनिवार बाजार, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरे बालाजी माधवराव,<br>रा. डिग्रस, पो. फरकंडा, तालुका पालम, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कुरे बालाजी माधवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - ॲड श्री. एस. व्ही. जायगुडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - ॲड श्री. एस. व्ही. जायगुडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड श्री. एस. व्ही. जायगुडे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन आयोगास असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जामध्ये सन १९९१ ते २०१० असा माहितीचा कालावधी नमूद केला आहे व माहितीचे वर्णन / तपशीलामध्ये

" मुख्याध्यापकाचे पद रिक्त ठेवले आहे व ते सुध्दा गेली वीस वर्षापासून त्यामुळे जेष्ठ शिक्षकावर अन्याय झ ाला आहे असे करण्याचे कारण काय" असे नमूद केले आहे. ही मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्याचप्रमाणे माहितीचे स्वरुप प्रश्नार्थक आहे त्यामुळे माहिती देय होत नाही.

सुनावणीच्या वेळी असेही आढळून आले आहे की, अपिलार्थी यांना बालाजी विद्यालय, इसाद, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सन १९९१ ते २०१० या कालावधीमध्ये प्राचार्य / मुख्याध्यापक कोण होते याची माहिती पाहिजे आहे. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे ती जन माहिती अधिकारी तथा सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा. डिग्रस, पो. फरकंडा, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बालाजी किसनराव शिंदे,<br>आर्यवृत्त कॉलनी, प्लॉट नं. १५, जिंतूर रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, नांदेड विभाग, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी<br>- प्रतिनिधी - ॲड श्री. रामचंद्र शिवाजीराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, नांदेड विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲड श्री. रामचंद्र शिवाजीराव पाटील उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी किसनराव शिंदे, आर्यवृत्त कॉलनी, प्लॉट नं. १५, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी, उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख, : अपीलकर्ता

घर क्रमांक ७८७, प्लॉट नं. ०९, भाग्यलक्ष्मी नगर, शंकराचार्य मंदिरासमोर, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशु विज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>स्वीय सहायक लघुलेखक (व. श्रे.), कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर<br>- श्री. प्रमोद वि. खराबे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक शिक्षण व अधिष्ठाता (पशु विज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी प्रशासकीय अधिका-यांचे वैयक्तीक अधिकाराच्या कॉपी राईटबाबत चार मुद्दयावर माहिती मागितली आहे. अशा प्रकारचे प्रशासकीय अधिका-याच्या वैयक्तीक अधिकाराचे कॉपी राईट होत नसते व त्यामुळे ही माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे ही माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २२-०३-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अधिकारात विचारलेली माहिती ही कॉपी राईट केलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे कॉपी राईटची प्रत देऊ शकत नाहीत. प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील हे निकाली काढण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. यास्तव आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख, घर क्रमांक ७८७, प्लॉट नं. ०९, भाग्यलक्ष्मी नगर, शंकराचार्य मंदिरासमोर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक लघुलेखक (व. श्रे.), कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशु विज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय सोपानराव डावरे,<br>हडको कॉलनी, परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय सोपानराव डावरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>निरीक्षक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद - श्री. पोपट पुनाजी गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद - श्री. रोकडे सु. रा. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ३०-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २०-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, सम्राट अशोक वाचनालय, अचलेर, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यास शासनाचे प्रतिवर्षी सुमारे एक लाख रुपयाचे अनुदान आहे त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी या ग्रंथालयास लागू होतात. याकरिता अपिलार्थीस दिनांक ३०-०९-२००९ रोजी संबंधित ग्रंथालयाकडून माहिती घेण्यासाठी कळविण्यात आले होते. अपिलार्थी यांचा अर्ज दिनांक ३०-१२-२००९ रोजी सम्राट अशोक वाचनालय, अचलेर, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना पाठविला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२००९ ला माहिती पाठविल्याचे दिसून येते. त्या पत्राची व माहितीची एक प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना ही माहिती प्राप्त झालेली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची एक प्रत अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. माहिती प्राप्त झाल्यावर या माहितीची अपिलार्थी यांनी पाहणी करावी व त्यात काही माहिती अपूर्ण आढळल्यास पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व पुढील पंधरा दिवसाच्या आत सचिव, सम्राट अशोक वाचनालय, अचलेर, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुन्हा पाठवतील याची जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांनी खातरजमा करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा सचिव, सम्राट अशोक वाचनालय, अचलेर, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीचा एक संच नोंदणीकृत टपालाने विनामूल्य आयोगाचे आदेश प्राप्त होताच पाठवावा. तसेच अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच पुढील तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय सोपानराव डावरे, हडको कॉलनी, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सचिव, सम्राट अशोक वाचनालय, अचलेर, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विपूल नाथाजी देबाजे, : अपीलकर्ता
केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विपूल नाथाजी देबाजे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी - श्री. मीर बासीत अली | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सन २००० ते २००९ या कालावधीची तालुका सेलू जिल्हा परभणी अंतर्गत नाला सरळीकरण, सामुहिक शेततळे, शेततळे, हरितगृह इत्यादी योजनांची एकूण नऊ मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती एकत्र करुन अपिलार्थीस देण्याकरिता मोठ्या प्रमाणावर साधनसामग्री तसेच मनुष्यबळाचा वापर करावा लागणार आहे. त्यापैकी जी माहिती उपलब्ध होती ती दिनांक १५-१२-२००९ च्या पत्राने अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे व उर्वरीत माहिती अपिलार्थीस दाखविण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात माहिती दाखविण्यात आल्याचे मान्य केले तथापि त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाली नाही असे त्यांनी आयोगास अवगत केले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या प्रमाणावर नऊ वर्षाच्या कालावधीची विविध विकासाच्या कामावरची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधन-सामग्री व मनुष्यबळाचा वापर करावा लागणार आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो कारण अपिलार्थी यांनी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे व ही बाब अपेक्षित नाही. केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी शक्य होईल तेवढी माहिती अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी तीन दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात ही बाब संयुक्तीक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी तीन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विपूल नाथाजी देबाजे, केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.            निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपीलकर्ता
रा.पूर्णा, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग
सेलू,जि. परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,सेलू,जि.परभणी - श्री. डी. टी. धारवाडकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सेलू, जि.परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी

यांनी दि. २७.०४.२०१० रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती यापूर्वी देण्यात आली आहे, ही बाब दि. १३.०८.२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ ते ५ बाबत अपिलार्थीस जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, त्याबाबत कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांचे दि. १४.०६.२०११ रोजीच्या फॅक्सद्वारे प्राप्त झालेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, दि. १३.०८.२०१० रोजी त्यांना माहिती मिळालेली आहे. तथापि ती अपूर्ण आहे. अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.११.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे, असे नमूद केलेले आहे. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जी माहिती उपविभाग कार्यालयाकडे आहे, ती माहिती देण्यात आलेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाच्या स्तरावर अपील निकाली काढण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बी.एल.भायेकर,<br>रा.पूर्णा, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे<br>विभाग,वसमत,जि.हिंगोली<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग,वसमतनगर,जि.हिंगोली - प्रतिनिधी - श्री. एस.एस.लाटकर,उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड - प्रतिनिधी - श्री. एस.एस.हाशमी,सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता ₹ ६८/- इतके शुल्क भरणा करण्याकरिता त्यांना दि. ११.०२.२०१० रोजी कळविण्यात आले होते. अपिलार्थी यांनी दि.०२.०३.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेतली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, दि. २३.०३.२०१० रोजी सुनावणी घेऊन मुद्दा क्र. २ बाबतची माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांचे आत विनाशुल्क देण्यात यावी, असे आदेश देऊन अपील निकाली काढले आहे. त्यानंतर दि. ०६.०६.२०१० रोजी मुद्दा क्र. २ बाबतची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थीस मुद्दा क्र. १ ची माहिती दि. ०७.०६.२०११ रोजी व्यक्तिशः देण्यात आली आहे.

वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी.एल.भायेकर,यशोदिप, न्यु आदर्श कॉलनी, मु.पो.ता.पूर्णा,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दामोधर शंकरराव घुगे, : अपीलकर्ता
रा.पांगरी,ता.जिंतूर, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक संचालक,
सामाजिक वनीकरण,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण विभाग,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दामोधर शंकरराव घुगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक संचालक,सामाजिक वनीकरण विभाग, परभणी - श्री. जे.एस.शेरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,परभणी-डॉ.जे.बी.देसाई | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवादावरुन असे दिसून येते की, हिंगोली व परभणी या दोन जिल्हयाकरिता एकच उपसंचालक,सामाजिक वनीकरण कार्यालय कार्यरत होते. दि. १

जानेवारी,२०१० पासून हिंगोली व परभणी जिल्हयासाठी दोन स्वतंत्र उपसंचालक कार्यालये निर्माण झाली आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती एकूण ७ लागवड अधिकारी यांच्या कार्यकक्षेत येते. याकरिता अपिलार्थी यांना त्यांच्या दि. २३.०३.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीकरिता ७ लागवड अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या दि. ०३.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, असे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांना द्यावयाच्या माहितीकरिता आवश्यक असलेले शुल्क अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भरणा करावे, असे सातही लागवड अधिकारी यांनी (जिंतूर-दि.२७.०४.२०१०, सेलू-दि.२०.०४.२०१०, गंगाखेड- दि.१३.०४.२०१०, परभणी-दि. १९.०४.२०१०, वसमत-दि.१५.०४.२०१०,कळमनुरी-दि. २९.०४.२०१० व हिंगोली- दि. ०६.०५.२०१०) अपिलार्थीस कळविलेले आहे. अपिलार्थी यांना दोन लागवड अधिकारी - कळमनुरी व हिंगोली यांनी पोस्टाने माहिती पाठविली आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती मिळालेली नाही, असे त्यांच्या युक्तिवादावरुन दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता एक विशेष बाब म्हणून जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,हिंगोली व परभणी यांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या प्रत्येकी तीन व चार लागवड अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती संकलीत करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविली जाईल, अशी व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,हिंगोली व परभणी यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सात (अनुक्रमे तीन व चार) लागवड अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती संकलीत करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली जाईल, अशी व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर शंकरराव घुगे, रा.पांगरी,ता.जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,सामाजिक वनीकरण, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. माणिकराव माधवराव मुलगीर,<br>रा.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी,<br>समाजकल्याण कार्यालय,परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी,गट-अ,जिल्हा परिषद,परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माणिकराव माधवराव मुलगीर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, कार्यालय समाजकल्याण अधिकारी गट-अ,जिल्हा परिषद,परभणी- श्री. एस.ई.गोडगोडवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - समाजकल्याण अधिकारी गट - अ,जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या स्वत:च्या मुलाच्यासंदर्भात विविध मुद्यांवर माहिती

मागितलेली आहे. ही माहिती दि. ०१.०१.२००५ ते १५.०३.२०१० या कालखंडातील आहे. माहितीसाठी त्यांनी तक्ता तयार करुन मागितला आहे. माहिती तयार करुन देणे ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये येत नाही.त्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात दि. ०५.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे समाजकल्याण अधिकारी,गट-अ यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीची पाहणी करण्यात यावी, असे कळविलेले दिसून येत आहे. त्याचप्रमाणे समाजकल्याण अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, अर्जदारास आवश्यक ते रेकॉर्ड दाखविण्याची कार्यवाही अर्जदाराने संपर्क केल्यास त्वरित करावी, असा दि. २४.०५.२०१० रोजी निर्णय दिला आहे. तथापि या अभिलेखांची पाहणी झालेली आढळून येत नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर व मतीमंद मुलांचा प्रश्न असल्याकारणाने अभिलेख पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यासाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना तीन दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल. अपिलार्थीस अशाप्रकारे निश्चित केलेल्या तारखेस अभिलेखांची पाहणी मिळेल व पुढील यथोचित कार्यवाही होईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी श्री. डी. डी.वळवी यांना व्यक्तिशः पहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी तीन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.ही कार्यवाही विहित मुदतीत यथोचित होईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांनी व्यक्तिशः पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

प्रत,

१. श्री. माणिकराव माधवराव मुलगीर, द्वारा बी-५, पोलीस क्वॉर्टर, परभणी, जि.परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता,समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट -अ,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वि. गो.जोशी, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी-प्रतिनिधी- श्री. एस.जे.थोरात, व.स. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी-प्रतिनिधी- श्री. निलपत्रेवार डी.एल., शिक्षण विस्तार अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांची त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ.),जि.प.परभणी व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),जि.प.परभणी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर

प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वि.गो.जोशी, द्वारा करंजीकर निवास,भगवान वाघमारेच्या बाजूस, गणपती चौक,जिंतूर रोड,परभणी - ४३१ ४०१

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ.),जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुलाम अहमद गुलाम मुर्तुजा, : अपीलकर्ता
रा.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला,पाथरी,जि. परभणी.
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गुलाम अहमद गुलाम मुर्तुजा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,जिल्हा परिषद प्रशाला,पाथरी,जि.परभणी - श्रीमती शहेनशाह बेगम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.परभणी -प्रतिनिधी- श्री. निलपत्रेवार डी.एल., ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, पाथरी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन १९९४ ते ९६ या कालावधीची त्यांची वैयक्तिक माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली आहे. त्या माहितीचा त्यांच्या शाळेमध्ये

त्यांनी स्वतः शिवाय इतर चार शिक्षक व एक शिपाई यांचा गट तयार करुन माहितीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तथापि माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थी यांनी असे सांगितले की, त्यांना सेवानिवृत्त होऊन सुमारे आठ वर्षे झालेली आहेत. त्यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही.

आज रोजी आयोगापुढे केलेला युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद,पाथरी यांनी कसोशीने प्रयत्न करुनही कागदपत्र उपलब्ध झालेली नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सेवाविषयक आहे. ही कागदपत्रे जिल्हा परिषद,परभणी येथील सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापना शाखेकडे उपलब्ध होऊ शकतील, असे आयोगाचे मत आहे. याकरिता आयोग उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) जि.प.परभणी यांना जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करत आहे. यापुढे जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जि.प.परभणी यांना अपिलार्थी यांना दि. ३०.१२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीचा शोध घेऊन ही माहिती एक महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जि.प.परभणी यांनी अपिलार्थी यांना दि. ३०.१२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीचा शोध घेऊन ही माहिती एक महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम अहमद गुलाम मुर्तजा,रा.आखाडा मोहल्ला, मेनरोड पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जिल्हा परिषद प्रशाला,पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. खाडे किसनप्रसाद धोंडिबा, : अपीलकर्ता
रा.चारठाणा, ता.जिंतूर,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत पिंप्री बु.,
ता.सेलू, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खाडे किसनप्रसाद धोंडिबा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत पिंप्री बु., ता.सेलू, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. आर.व्ही.चौधरी, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या दि. २६.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि.परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि.परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खाडे किसनप्रसाद धोंडिबा,रा.चारठाणा, ता.जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत पिंप्री बु.,ता.सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने, : अपीलकर्ता
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत
कार्यालय,मुक्रमाबाद,ता.मुखेड,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,मुखेड,जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,मुक्रमाबाद,ता.मुखेड,जि.नांदेड- श्री. एस.जी.शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती, मुखेड, जि.नांदेड - प्रतिनिधी -श्री. डी. एन. चेपुरे, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,जि.नांदेड यांनी सुनावणी घेतलेली नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता त्यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.०५.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलिंगआप्पा बोधने,रा. प्रतापनगर, नांदखेडा रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मुक्रमाबाद, ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रामभाऊ भिवसेन आठवले,<br>रा.खेर्डा (दु.कि.),पो.मोरेगाव,ता.सेलू,जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी | : | उत्तरवादी |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत, खेर्डा(दु.कि.),ता.सेलू,जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी- प्रतिनिधी - श्री. आर.व्ही.चौधरी, कक्ष अधिकारी,पंचायत समिती,सेलू,जि.परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१०<br>(फेरसादर दि. ०६.०३.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.०८.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये सन १९८० ते २००९ अशी २९ वर्षांची खेर्डा (दु.कि.)गावातील सर्व करास पात्र असलेल्या जमिनी व इमारतींविषयी तसेच या कालावधीमध्ये काम केलेल्या ग्रामसेवकांचा तपशील, आकारणी केलेल्या प्रत्येक वर्षाच्या कराची रक्कम, खेर्डा या गावाच्या जमिनी किती आहेत, चतु:सिमा किती आहे, अशी ग्रापपंचायत कार्यालयाशी संबंधित जवळजवळ सर्व विषयांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती संकलीत करुन देण्याचा प्रयत्न केला परंतु जन माहिती अधिकारी यांना माहिती अजुनही एकत्रित करता आलेली नाही आणि अपिलार्थी यांचे वय वर्ष ८५ असून त्यांचे दि.२ फेब्रुवारी,२०१० रोजी देहावसान झालेले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.२९.०८.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे स्वरुप व २९ वर्षांचा कालावधी पाहता अपिलार्थीस सदरच्या माहितीतील जे अभिलेखे उपलब्ध आहेत, त्या अभिलेखांची पाहणी करण्याकरिता अधिनियमातील कलम ७(९) नुसार कार्यवाही करणे उचित ठरले असते. तथापि तसे झालेले आढळून येत नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता,आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन आज अपिलार्थी हयात नाहीत, असे दिसून येत असल्यामुळे अपील बंद करावे लागत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, खेर्डा(दु.कि.),ता.सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार, : अपीलकर्ता
रा.गंगाखेड, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं),
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. बी. एस. ठाकूर, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०१.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांचे दि. १३.०६.२०११ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये विचाराधीन प्रकरणाची आजची सुनावणी पुढे ढकलण्याबाबत विनंती

केलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार, द्वारा अरुण देवळे, देवळे जिनिंग, गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी, : अपीलकर्ता
बालाजी पान सेंटर, बसस्टँण्ड समोर, सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट साधन केंद्र, पंचायत समिती (सर्व शिक्षा अभियान), पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.), सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र, पंचायत समिती, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी<br>- श्री. रणमाळे डी. आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. ठाकरे सी. बी., समन्वयक पर्यायी शिक्षण, सर्व शिक्षा अभियान | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र, पाथरी, जिल्हा परभणी<br>- श्री. काळे एम. डी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२००९ |

फेरसादर दिनांक
०७-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-०२-२००८ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती दिनांक २७-०९-२००८ रोजी देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती उशिरा व अपुरी मिळाली आहे असे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे रुपये चाळीस इतके शुल्क अपिलार्थीने भरले आहे ही बाबही दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती पुन्हा एकदा विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी. त्याचप्रमाणे अपिलार्थीने माहितीपोटी भरलेले शुल्क रुपये चाळीस इतके अपिलार्थीस परत करण्यात यावे. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी रुपये चाळीस इतके माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस परत करावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणपत बापुआप्पा मिटकरी, बालाजी पान सेंटर, बसस्टॅण्ड समोर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र, पंचायत समिती, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पंढरीनाथ ग्यानोजी लाडे,<br>रा. बुध्दनगर, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लेखापाल, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत,<br>जिल्हा परभणी - श्री. उत्तम रामभाऊ दुधाने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी - श्री. जयवंत सोपानराव सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०५-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०५-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ ग्यानोजी लाडे, रा. बुध्दनगर, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विपुल नाथाजी देबाजी, : अपीलकर्ता
केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, पाथरी,
तालुका पाथरी, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा सह निबंधक, जिल्हा सह निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, पाथरी,<br>तालुका पाथरी, जिल्हा परभणी - श्री. डी. एम. देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, (नि. श्रे.), सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी<br>- श्री. एस. के. बोधगिरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०९-२००९ च्या अर्जान्वये एकूण १३ मुद्दयावर सन २००१ ते २००९ या कालावधी-तील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे आणि त्यातील बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारे इतर सेलू व मानवत या दोन तालुक्यांची माहिती दुस-या माहिती अर्जान्वये मागितलेली आहे. यापैकी उपलब्ध असलेली माहिती दिनांक २४-०९-२००९ रोजी कलम ७ (१) अन्वये विहित मुदतीत अपिलार्थीस देण्यात आली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय असलेल्या माहितीकरिता रुपये ६५० इतक्या शुल्काचा भरणा या कार्यालयात करावा याकरिता दिनांक २६-११-२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १९-११-२००९ रोजी निर्णय दिला आहे. त्यामध्ये अपिलार्थीस देय असलेली माहिती देण्यात आली आहे असे नमूद केले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना एका मुद्दयावरील म्हणजे नोंदणी झालेल्या मालमत्तेचे खरेदीखत, गहाणखत, मालमत्ता बाजारमुल्य, पाच लाखापासून पुढे नोंदणी बाबत माहिती मिळाली नाही असे असे व्दितीय अपिलावरुन दिसून येत आहे. ही माहिती मोघम स्वरुपाची मागितली असून नेमकी बाब नमूद केली नाही, नेमकी खरेदीदाराची नावे इत्यादी नमूद केलेली नाहीत. अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. तरीही अपिलार्थी यांनी दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन संबंधित अभिलेख्याचे तपासणीकरिता प्रतिवर्ष प्रतिनोंद रुपये पंचवीस प्रमाणे फीस शासनास जमा करुन अपिलार्थीस हव्या असलेल्या दस्तऐवजाची नक्कल प्रतिपेज रुपये वीस एवढी सह जिल्हा निबंधक यांच्या कार्यालयात जमा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात असा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिला आहे. ही फीस नोंदणी अधिनियम १९०८ कलम ५७ प्रमाणे आहे. ही बाब महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील तरतुदीनुसार योग्य ठरत आहे.

अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे अपील प्रकरण या स्तरावर बंद करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विपुल नाथाजी देबाजी, केशवराज बाबासाहेब मंदिर रोड, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, (नि. श्रे.), सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कुरे बालाजी माधवराव,<br>रा. डिग्रस, पो. फरकंडा, तालुका पालम, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम,<br>जिल्हा परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कुरे बालाजी माधवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - ॲड श्री. एस. व्ही. जायगुडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - ॲड श्री. एस. व्ही. जायगुडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड श्री. एस. व्ही. जायगुडे उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, परभणी यांना आयोग जन अपिलीय अधिकारी म्हणून घोषित करत आहे. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा. डिग्रस, पो. फरकंडा, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुकर दौलतराव वाव्हळे,<br>विश्वासनगर, वांगी रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी - श्री. दराडे राम खंडेराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी - श्री. हेमंत मनोहरराव खोरगडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०९-२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्या अधिपत्याखालील सहा उपविभाग व २७ शाखा

कार्यालयाकडे विभागली असल्याकारणाने देण्यासाठी काही कालावधी लागला व त्यानंतर दिनांक १७-११-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती व्यक्तिशः देण्यात आली आहे. अपिलार्थीने त्याची पोच दिली आहे ती त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे असे म्हणून अपील निकाली काढले आहे असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस देय असलेली माहिती देण्यात आलेली आहे असे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे प्रश्नार्थक स्वरुपाची / खुलासे स्वरुपाची माहिती देय होत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर दौलतराव वाव्हळे, विश्वासनगर, वांगी रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सय्यद अमजदअली स. याकुब अली,<br>युसुफिया कॉलनी (मदिना बेकरीसमोर), परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड - श्री. रमेश के. नेम्मानीवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | | अनुपस्थित |
| ३.४ | श्री. पी. डी. काळे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, जिल्हा नांदेड यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद अमजदअली स. याकुब अली, युसुफिया कॉलनी (मदिना बेकरीसमोर), परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहमद इरफान मोहमद ईकबाल, | : | अपीलकर्ता |
| ईकबाल नगर, व्दारा ताज दाल मिल, एम. आय. डी. सी. परभणी | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, परभणी | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| अधीक्षक, भूमि अभिलेख, परभणी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिरस्तेदार, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, परभणी - श्री. एस. डी. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी - (तत्कालीन)<br>- श्री. एम. ए. सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २७-०८-२०१० च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या प्रती अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२०१० रोजीच्या पत्राव्दारे कार्यालयात नियमाप्रमाणे फीस भरणा करुन प्राप्त करुन घेण्यासंदर्भात कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, परभणी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २५-१०-

२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांच्यातर्फे नियमाप्रमाणे संचिकेच्या नकलेची फीस भरण्यासाठी कार्यालयात कोणीही आले नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे रास्त आहे व त्यांनी माहिती देण्यास नकार दिला या अपिलार्थीच्या म्हणण्यात तथ्य नाही. अतः जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अमान्य केले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे विचारात घेऊन असे सूचित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) अन्वये एक दिवस निश्चित करुन, नोंदणीकृत पत्राने कळवून, पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील अपिलार्थीस काही आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील कलमानुसार सशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) अन्वये एक दिवस निश्चित करुन (वेळ स. ११ ते सायं. ५.००) उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील अपिलार्थीस काही आवश्यक कागदपत्रांच्या प्रती वर नमूद केल्याप्रमाणे सशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात. जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमद इरफान मोहमद ईकबाल, ईकबाल नगर, व्दारा ताज दाल मिल, एम. आय. डी. सी. परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामेश्वर काशिनाथ जिरवणकर, : अपीलकर्ता
घर क्रमांक ३६०, राहुल नगर, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामेश्वर काशिनाथ जिरवणकर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. पी. बी. यंदे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी श्री. पी. पी. वाकोडकर, अव्वल कारकून,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-११-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०९-२०१० च्या अर्जान्वये एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितलेली आहे. त्यापैकी पहिल्या

मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व मुद्दा क्रमांक २ ची माहिती प्रथम अपील सुनावणीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार तहसीलदार, परभणी यांच्या मार्फत देण्यात येणार आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती गोषवारा स्वरुपात उपलब्ध आहे ती आयोगाच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीस त्यांच्या मुद्दा क्रमांक ३ प्रमाणे त्यांना फुले कॉलनी येथील स्वस्त धान्य दुकानदाराने जून २०१० ते ०१ सप्टेबर २०१० या कालावधीत उचललेल्या मालाची नोंद केलेल्या रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती त्याचप्रमाणे स्वस्त धान्य दुकानदाराने वितरीत केलेल्या अन्नधान्य रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती अपेक्षित आहेत.

अपिलार्थीस वर नमूद केलेली माहिती देय होत आहे. ती जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना द्यावी लागेल. सदरची माहिती त्यांना तहसीलदाराकडून उपलब्ध करुन घेऊन ती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस एका महिन्याच्या आत पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक तीन मधील माल वितरण किती दिवसात करणे अपेक्षित आहे यासंबंधी कार्यप्रणालीची झेरॉक्स प्रत अपेक्षित आहे ती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामेश्वर काशिनाथ जिरवणकर, घर क्रमांक ३६०, राहुल नगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख अफसर शेख महंमद हाजी, : अपीलकर्ता
भंगी कॉलनी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, प्रशासकीय इमारत, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, प्रशासकीय इमारत, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख अफसर शेख महंमद हाजी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लिपिक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, प्रशासकीय इमारत, परभणी - श्री. मो. एजाजखान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, प्रशासकीय इमारत, परभणी<br>- श्री. एस. एम. चिलवंत | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-०७-२०१० च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या प्रती तयार करण्याकरिता रुपये १८००० /- इतक्या शुल्काची आवश्यकता आहे ही बाब अपिलार्थीस दिनांक ३०-०७-२०१० रोजी कळविण्यात आली. यावर अपिलार्थी यांनी त्यांनी मागितलेल्या माहिती अर्जातील माहिती स्वेच्छेने कमी केली व आवश्यक असलेल्या लाभार्थ्यांच्या यादीकरिता रुपये ४२५ च्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला. त्यानंतर अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२०१० रोजी माहिती देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाली आहे ही बाब मान्य केली आहे. तथापि त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण वाटते असे त्यांनी आयोगापुढे सांगितले व आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांच्याकडील एक संच उपलब्ध असल्यास त्याची माहिती द्यावी अशी आयोगास विनंती केली. ही विनंती आयोगाने मान्य केली व जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशी यादी (३० पृष्ठे) उपलब्ध आहे असे आढळून आल्यावर अपिलार्थीस देण्यात आली.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०६-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख महमंद हाजी, प्रदेश कोषाध्यक्ष, महाराष्ट्र मेहत्तर (भंगी) सफाई कामगार संघटना कार्यालय, भंगी कॉलनी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपिक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, प्रशासकीय इमारत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, प्रशासकीय इमारत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. स. जावेद स. वाजीद,<br>मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. स. जावेद स. वाजीद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,<br>तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी -<br>प्रतिनिधी - श्री. बी. एस. ठाकूर, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २४-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये माहिती लिखीत स्वरुपात मागितली आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती मागितली नसल्यामुळे त्यांना माहिती देय होत नाही, देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असा निर्णय जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प.), जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक ०६-

०९-२०१० रोजी घेतल्याचे दिसून येत आहे. या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते असेही दिसून येत आहे. अपिलार्थी यांना याबाबत विचारले असता सुनावणीच्या वेळी त्यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचे मौजे कौसडी, तालुका जिंतूर येथील घर आहे त्याचा क्रमांक ५९१ आहे व सिटी सर्व्हे नंबर ३३ आहे. या जागेमध्ये अतिक्रमण झालेले आहे तथापि ग्रामसेवकाच्या रेकॉर्डवरुन दिसून येत नाही. म्हणजे अतिक्रमण झालेले नाही असे अभिलेखावरुन दिसून येत आहे. याकरिता त्यांना त्यांच्या घराच्या संदर्भातील दस्तऐवजाची प्रत खोटी दिली आहे व नमुना नंबर ८ खोटा दिला आहे. अपिलार्थी यांच्या दिनांक २६-०४-२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची प्रत त्यांना आवश्यक आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता या प्रकरणामध्ये केलेल्या चौकशीचा अहवाल अपिलार्थीस देय होत आहे तो अपिलार्थीस देण्यात यावा असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स. जावेद स. वाजीद, मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजय मंकय्या कारेंगल्लु, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कर अधिकारी,नगर परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजय मंकय्या कारेंगल्लु | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कर अधीक्षक, नगर परिषद,परभणी-प्रतिनिधी-श्री.आनंद बी. मोरे, लिपीक(प्र.अ.का.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्याधिकारी,नगर परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री.उबेद बिनसालम, करनिर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी-क-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१०.२०१० रोजीच्या प्रथम

अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०४.१०.२०१०रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजय मंकय्या कारेंगल्लू,रा. बारादरी मश्जीदच्या बाजुला,सरकारी दवाखान्याजवळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिरसाट प्रभाकर तुळशीराम, : अपीलकर्ता
रा. सोनखेड, तालुका सोनपेठ, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी,परभणी - प्रतिनिधी - श्री. पी.बी.यंदे, सहा.जिल्हा पुरवठा अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर जिल्हाधिकारी,परभणी - प्रतिनिधी - श्री. पी.पी.वाकोडकर,अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०८.१०२० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.१०२० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांनी सुनावणी घेऊन दि. ०९.०९.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, जिल्हा पुरवठा अधिकारी,परभणी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सात दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती

अद्यापही अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिलेली असल्याने ही माहिती इतर तहसील कार्यालय,गंगाखेड अथवा सोनपेठ यांच्याकडे जरी उपलब्ध असली तरी जिल्हा पुरवठा अधिकारी यांना ती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस द्यावी लागेल. यास्तव अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी जेवढी माहिती उपलब्ध होईल, त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिरसाठ प्रभाकर तुळशीराम,मु.सोनखेड,पो.ता.सोनपेठ, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मक्सूदखान पिता वाहेदखान, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मक्सूदखान पिता वाहेदखान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक,नगर परिषद, परभणी-श्री. बी.एस.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी -प्रतिनिधी - श्री. उबेद बिन सालम,करनिर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी - क - २ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | ०३-११-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २६.०७.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये

मागितलेली माहिती त्यांना दि. १२.०८.२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली तथापि त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण मिळाली आहे, ती खालीलप्रमाणे आहे.

१) मुद्दा क्र.४: त्रयस्थ श्री.ए.बी.माळवदकर,अ.का.यांना सर्वसाधारण सभेमध्ये ठराव घेऊन कामावरुन कमी करण्यात आले/बडतर्फ करण्यात आले, त्या आदेशाची प्रत, तसेच याबाबत कोर्टाचा निर्णय झाला असल्यास त्याची प्रत.

२) मुद्दा क्र. ९: उप मुख्याधिकारी या पदाकरिता आवश्यक असलेल्या अर्हता तपशीलाबाबत शासन निर्णय/परिपत्रकाची प्रत.

वरील दोन मुद्यांवरील माहिती देय होत आहे. ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीच्या झेरॉक्स प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मक्सूदखान पिता वाहेदखान, सेवानिवृत्त विद्युत निरीक्षक, नगर परिषद,परभणी, म्युन्सीपल कॉलनी, दर्गारोड, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,नगर परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र बालारामजी लोढा,<br>रा.गंगाखेड, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,श्री सरस्वती विद्यालय<br>(मा),गंगाखेड,जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेंद्र बालारामजी लोढा | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे मदतनीस- श्री. श्रीनिवास अ.मुधळवाडकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,श्री सरस्वती विद्यालय (मा),गंगाखेड,जि.परभणी - श्री. राम कालीदास पाठक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा),जिल्हा परिषद, परभणी- प्रतिनिधी - श्री. एन.जी.ठाकूर, उप शिक्षणाधिकारी (मा.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे सहायक, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.आयोगापुढील युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सरस्वती विद्यालय,गंगाखेडबाबत सन २००८ ते ऑगस्ट,२०१० पर्यंतची एकूण १७ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती आज रोजी आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली. आयोगाचे सूचनेनुसार ती माहिती (एकूण ८५ पृष्ठे) अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित करण्यात आली. अपिलार्थीस त्याची पाहणी करावी लागेल. यावर काही अपूर्ण माहिती आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात कळविल्यास त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र बालारामजी लोढा, राजेंद्र कृषि केंद्र,गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री सरस्वती विद्यालय (मा), गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गुलाम अहमद गुलाम मुर्तुजा,<br>रा.पाथरी, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गुलाम अहमद गुलाम मुर्तुजा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण अधिकारी, जि.प.परभणी - श्री. एस.ई.गोडगोडवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, जिल्हा परिषद,परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचे मूळ सेवापुस्तक व पाचव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चितीनंतर फरकाचा तक्ता अशी माहिती

मागितलेली आहे. त्यावेळी मूळ सेवापुस्तिकेचा शोध घेऊनही ते उपलब्ध होऊ शकले नव्हते. आता त्या प्रतीचा शोध लागला आहे व सध्या वित्त विभागामध्ये आहे. अपिलार्थीच्या मूळ सेवापुस्तिकेवरुन प्रमाणित साक्षांकित प्रत अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत देण्यात येईल त्याचप्रमाणे पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनफरकाचा तक्ताही अभिलेखातील नोंदीनुसार तयार करुन पंधरा दिवसांच्या आत देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्यावेळी मान्य केली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम अहमद गुलाम मुर्तजा,आखाडा मोहल्ला, मेनरोड, पाथरी,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण अधिकारी, जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रंगनाथ नबाजी मोळे (गुरुदेव), : अपीलकर्ता
रा.सेलू, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, सेलू,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,सेलू,जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,सेलू,जि.परभणी - श्री. मीर बासीत अली | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, सेलू,जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१२.१०२० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १८.०८.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेल्या संपूर्ण माहितीची पाहणी दि. २२.११.२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी याबाबतचे पोचपत्र दि.२२.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी,तालुका कृषी

अधिकारी,सेलू यांना दिले असून त्यामध्ये नमूद केल्याचे दिसून येत आहे की, अर्जाद्वारे विचारलेली संपूर्ण माहिती पाहणी केली आहे व हवी असलेली महत्त्वाची माहिती उतरवून घेतली आहे. यावर समाधान झाले आहे. तेव्हा उक्त संदर्भिय अर्जावर त्यांचे काहीही म्हणणे नाही.त्याचप्रमाणे दि.१०.०५.२०११ रोजीच्या पत्रान्वये देखील त्यांना माहिती मिळाल्याचे नमूद केले असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रंगनाथ नबाजी मोळे उर्फ गुरुदेव, सुरज मोहल्ला, खेत्रेंचा वाडा,सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण शामराव जोशी, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक, भूमी अभिलेख,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण शामराव जोशी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक भूमी अभिलेख, परभणी - श्री. ए.एस.कदम | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, परभणी -श्री. एम.ए.सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास युक्तिवादात अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती, त्यांनी मागितलेल्या माहितीप्रमाणे नाही. त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती अपेक्षिलेली आहे.

१) मुद्दा क्र. १ : त्रयस्थ श्री. विष्णुपूरीकर यांचे घर आखीव पत्रिका क्र.१४०/९०६ चे एकूण क्षेत्रफळ ४५० चौ. मी. आहे. भूमी अभिलेख कार्यालयाने या घराचे जे क्षेत्र दाखविलेले दाखविले आहे त्यामध्ये ११७ चौ. मी. ची तफावत आहे. या तफावतीबाबतचे कागदपत्र. - यासंदर्भात आयोगाचे अभिप्राय आहेत की, क्षेत्रात तफावत कशी झाली,त्याबाबतच्या दस्तऐवजाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील.

२) ज्या कागदपत्रांच्या आधारे दि.२६.१०.२००५ रोजी फेरफार क्र. २९५३ मंजूर झाला आहे, त्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात आलेल्या नाहीत. - यासंदर्भात आयोगाचे अभिप्राय आहेत की, असा फेरफार झाला असल्यास मंजूरीच्या वेळी निर्माण झालेली सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागतील.

वरील दोनही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेल्या माहितीच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण शामराव जोशी,कृष्णाई, क्रांतीचौक, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक भूमी अभिलेख, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हातागळे कठाळू मारोती,<br>रा. सावरगाव खु. ता.मानवत, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हातागळे कठाळू मारोती | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सेलू, जि.प.परभणी - श्री. डी. आर.चिमनचोल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जि.प.परभणी - प्रतिनिधी- श्री.एस.के.आमराव,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सेलू यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी भारत निर्माण

प्रकल्प कार्यक्रमांतर्गत सावरगाव खु. ता. मानवत या गावातील कामाची एकूण ५ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. यामुळे या माहितीची पाहणी अपिलार्थीस कलम ७(९)नुसार दि. ०८.११.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे तसेच असेही कळविण्यात आले की, अपिलार्थीस नेमक्या कोणत्या मिटींगची व कोणत्या ग्रामसेवकाशी संबंधित माहिती हवी आहे,याबाबतचा तपशील दिल्यास माहिती देणे शक्य होईल. त्यामुळे ती माहिती देता येत नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले व या उर्वरित माहितीकरिता गट विकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळा अर्ज करतील, ही बाब त्यांनी मान्य केली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हातागळे कठाळु मारोती, रा.सावरगाव (खुर्द), पो.पालोदी,ता.मानवत,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सेलू, जि.प. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, : अपीलकर्ता
रा.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू,जि.परभणी -प्रतिनिधी - श्री. आर. व्ही. साळवे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन मानवत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस अधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता

जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

पोलीस अधीक्षक,परभणी अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२३.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०६-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, मु.पो.पाथरी (इंदिरानगर),ता.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुनिरोद्दीन शमशोद्दीन, : अपीलकर्ता
रा.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष लेखा परिक्षक वर्ग-१,
सहकारी संस्था (साखर), परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहसंचालक (साखर),नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख मुनिरोद्दीन शमशोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), परभणी - श्री. व्ही.पी.भोसले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक सहसंचालक (साखर),नांदेड - प्रतिनिधी - श्री. ए.यु. कोंडलवाडीकर, सहकार अधिकारी,श्रेणी-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखान्यामध्ये ते मोटार मेकॅनिक या पदावर कार्यरत आहेत. या पदावर कार्यरत असताना

एकूण सुमारे रु.१,८०,०००/- इतक्या रकमेची त्यांच्या वेतनातून वसूली करण्यात आली. या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती - सेवापुस्तिकेची प्रत, चौकशी अहवाल, खतावणी व डेबुक, व्हेईकल मधील डिझेल,ऑईल,पेट्रोल कंट्रोल रजिस्टर व दुरुस्ती कंट्रोल रजिस्टर इत्यादी कागदपत्रांची मागणी केलेली आहे. ही माहिती साखर कारखान्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक यांच्याकडून अद्यापही त्यांना प्राप्त झाली नाही.तदनंतर अपिलार्थी यांनी विशेष लेखा परीक्षक वर्ग-१ यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज दिलेला आहे. तथापि त्यानंतरही माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परीक्षक वर्ग-१ यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, सदरची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे देता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना, पाथरी अवसायनात गेला आहे व सध्या प्रशासक मंडळ कार्यरत आहे.

वरील बाब विचारात घेता या द्वितीय अपिलाच्या संदर्भातील जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अवसायक / गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना मर्यादित, यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावे लागतील व त्यातील माहिती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे अभिलेखे मिळवून माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-०६-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुनिरोद्दीन शमशोद्दीन, क्वीन इंग्लीश स्कुल, पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१,सहकारी संस्था (साखर), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.